


## बंधुत्त्वाची दोन वर्षे

# माणूस

३० मार्च १९६८ : चाळीस पैसे



# परान्नमुक्ती...

' विनायक !

निफाडला काहीतरी वेगळे घडले पाहिजे, घडवले पाहिजे.
तीन–चार हजार शेतकरी जमणार आहेत.
एखादा नवा संकल्प
अल्पशी का होईना, पण प्रत्यक्ष कृती
विचारप्रचाराला उपक्रमाची जोड
निफाडला या दृष्टीने एक पाऊल तरी उचलले गेले पाहिजे.
काय शक्य आहे ?
सरकारने परदेशी अन्नाची आयात बंद करावी,
पी. एल्. ४८० करार रद्द करावा
हे आपण इतके दिवस सभांतून सांगतोच आहोत.
लक्षावधी शेतकऱ्यांची आपण याला मान्यताही मिळवली आहे .
पण आपणच काही गावांतून परदेशी धान्याची
हकालपट्टी करून दाखवू शकलो तर !
हे अवघड नाही.
निफाड तालुका म्हणजे धान्याचे कोठार आहे
' महाराष्ट्राचा पंजाब ' म्हणून तो सर्वत्र ओळखला जातो.
तरीपण या तालुक्यात परदेशी गहू येतोच आहे.
काय करून दाखविणे शक्य आहे ? '– श्री. ग. मा.
' काही ग्रामपंचायतींचे आणि सोसायटयांचे ठरावच
तुमच्या हातात ठेवतो.
पंचवीस गावे अवघड नाही
पण अकरा गावे ताबडतोब शक्य आहे. ' – विनायक पाटील
आणि अकरा गावांचे ठराव झाले......
विषय : परान्नमुक्त गाव
ठराव : आमची संस्था अशी हमी देत आहे की–

[ कव्हर पान ३ पाहा

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : सातवे : अंक : चव्वेचाळिसावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

**संपादक**

**श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

**स. न.** **मार्च १८**

अन्नस्वतंत्रता संचलनाचा वृत्तान्त नेहमी वाचतो. आजच्या डळमळीत परिस्थितीत मनाला एकच दिलासा वाटतो तो म्हणजे तुमच्या या संचलनाला राजकारणाची दुर्गंधी नाही. तुम्ही अंगीकारलेल्या या कार्यामुळे आमच्यातला ' माणूस ' जागा होऊ पाहतोय.

**सुधाकर गांगुर्डे**
औरंगाबाद

**स. न.** **मार्च २०**

मी एक एस्. एस्. सी. चा विद्यार्थी आहे. माझी परीक्षा २२ मार्चला संपते. मला ' श्री कैलास ते सिंधुसागर ' या संचलनामध्ये सहभागी व्हायचे आहे. संचलनाचा मुक्काम दि. २४ ला कोठे असेल ते कळवावे. एका विद्यार्थ्याचा आपण विरस करणार नाही, अशी आशा आहे.

**श्री. श. बरवे**
मुंबई

आपल्या सोईचा पत्ता कळवला आहे.

सं०

**मूल्य चाळीस पैसे**
**४१९ नारायण,**
**पुणे २**
**दूरध्वनी : ५७३५९**

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पुन्हा एकदा आसाम

आसाम राज्यात काय चालले आहे यासंबंधी मागे एकदा लिहिले होते. आपल्या पूर्व सीमेवरचे हे राज्य भारत सरकारपासून छिनावून घेण्याच्या दृष्टीने पाकिस्तानच्या हालचाली गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू असून आता या हालचालींमध्ये बंडखोर नागा नेते आणि कम्युनिस्ट कार्यकर्ते सामील झालेले आहेत. आसामच्या भवितव्याच्या दृष्टीने अशी चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली असतानाही आपल्या केंद्र सरकारला फारशी जाग आलेली आहे असे दिसत नाही. आसाममध्ये ठिकठिकाणी पाकिस्तानी हस्तकांनी आपले अड्डे प्रस्थापित केले असून या अड्ड्यांमधून नागा बंडखोरांप्रमाणेच कम्युनिस्टांचाही संचार चालू असतो, अशा बातम्या वारंवार प्रसिद्ध होत असतानाही केंद्रीय गृहखात्याला या घटनेची दखल घेण्याची जरुरी भासलेली दिसत नाही.

गेल्या प्रजासत्ताक दिनी गौहत्तीमध्ये दंगल झाल्यानंतर केंद्रीय गृहमंत्र्यांनी आसामला तातडीची भेट दिलेली होती. 'आसाममध्ये आता सारं काही शांत आहे' असे त्यांनी गौहत्तीहून परत आल्यानंतर सांगितले होते. परंतु गेल्या आठवड्यात आसामचे अर्थमंत्री श्री. त्रिपाठी यांनी जी माहिती सांगितली त्यावरून केंद्र सरकारची आसामबाबतची आत्मसंतुष्ट वृत्ती परिणामी घातक ठरेल हे आता स्पष्ट होत चाललेले आहे. नागा बंडखोर आणि पाकिस्तानी हस्तक यांच्या मदतीने आसाममधील सध्याची प्रशासनयंत्रणा उलथवून पाडण्याचा प्रयत्न शिवसागर जिल्ह्यातील मार्क्सवादी कम्युनिस्टांनी करून पाहिल्याचे श्री. त्रिपाठी यांनी आपल्या भाषणात सांगितले. त्यांनी पुढे असेही सांगितले की स्थानिक जनतेत गोंधळ आणि घबराट निर्माण करून राज्ययंत्रणा ताब्यात घेण्याच्या आंतरराष्ट्रीय कटाचा हा एक भाग होता. नागा बंडखोर, पाकिस्तान आणि शक्य झाल्यास लाल चीन यांची मदत घेऊन भारताच्या पूर्व सीमेवर आपले वेगळे सार्वभौम सरकार प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने कम्युनिस्टांच्या या हालचाली चालू होत्या.

श्री. त्रिपाठी यांनी काही दिवसांपूर्वी झालेल्या या प्रकाराचा साद्यंत वृत्तान्त आसाम विधानसभेला कथन करून आसाममधील परिस्थितीबाबत आपण किती

— — — — —

**दिल्ली दरबार**

— — — — —

उदासीन आहोत, हेच सिद्ध केले आहे. गेल्या वीस वर्षांमध्ये आसामची विशिष्ट भौगोलिक रचना ध्यानात घेऊन संरक्षणाच्या दृष्टीने, तेथे काही निराळी व्यवस्था करावयास हवी, याची केंद्र सरकारने कधीच काळजी घेतलेली नाही; अर्थात आम्ही आमच्या कोणत्याच सीमाभागाकडे त्या दृष्टीने पाहात नाही हे चीन आणि पाकिस्तान यांच्या आक्रमणाच्या वेळी दिसून आलेले आहेच.

चीनमध्ये सत्तारूढ झालेला कम्युनिस्ट पक्ष भारताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्यास उत्सुक आहे, हे गोड स्वप्न आम्ही आमच्या मनात इतके रंगविले होते की, हिंदी चिनी भाई भाई ही चौ एन लायची घोषणा खरीच आहे असे आपण धरून चाललो होतो. भारत आणि चीन यांच्या मैत्रीचे आणि शांततामय जीवनाचे गोंडस चित्र रेखाटण्यात पं. नेहरूंपासून प्रत्येक लहानमोठ्या काँग्रेस कार्यकर्त्यांपर्यंत जणू चढाओढच लागलेली होती. कोणी एखादा राजकीय कार्यकर्ता इशारा देई– 'सांभाळा हं. चीनची दोस्ती खरी मानून चालू नका.' परंतु या इशाऱ्यातील कळकळ ध्यानात घेण्याऐवजी 'तुम्ही युद्धखोर आहात' अशी त्याची संभावना करून लाल चीनची आळवणी करण्यात आपले राज्यकर्ते मशगुल होऊन जात.

या इतिहासाची वारंवार आठवण करून देण्याची गरज यासाठी भासते, की अद्यापही चिनी संकटाची आम्ही आमच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नीट दखल घेतली आहे असे आढळून येत नाही. गेल्या पाच-सात वर्षांतल्या घटनांनी हे निर्विवाद रीतीने सिद्ध केले आहे की आपण शांततेचा कितीही मोठा नगारा पिटला तरी भारताशी वैर करणे हेच चीन आणि पाकिस्तान यांच्या परराष्ट्रीय धोरणाचे सूत्र आहे. भारताच्या सीमेवर सतत तंग वातावरण ठेवल्याने भारताला आपल्या संरक्षण खर्चात वाढ करावी लागेल आणि मग साहजिकच त्याचा विकासकार्यावर परिणाम होईल. निदान औद्योगिक विकासाची गती कुंठित होईल असा प्रयत्न बड्या राष्ट्रांकडून होत आहे. पाकिस्तान हे केवळ या सत्तागटाचे हस्तक असून हस्तकामार्फत कारवाया केल्याने आपल्याला नामानिराळे राहता येते या हेतूने ही बडी राष्ट्रे पाकिस्तानला चिथावणी देत असतात.

साऱ्या आशियाचे नेतृत्व आपल्याकडे यावे या महत्त्वाकांक्षेने पेटलेल्या चिनी लालभाईंनी भारताची अप्रतिष्ठा करण्यासाठी पाकिस्तानशी हातमिळवणी केली आहे. भारतापासून आपल्याला भय आहे असा कांगावा करून पकिस्तान, अमेरिका आणि चीन या दोन्ही राष्ट्रांकडून लष्करी मदत घेत असून या मदतीच्या बळावर तो भारतीय सीमेवर प्रक्षोभक कारवाया करीत आहे. कोणत्याही ठिकाणी गोंधळ निर्माण झाला तर तो कम्युनिस्टांना हवाच असतो. सत्ता हस्तगत करण्याचा तेवढाच

------

सदाशिव पेठकर

------

काय तो राजमार्ग त्यांना माहीत आहे. त्यामुळे साहजिकच पाकिस्तानच्या आक्रमक कारवायांना चीनचा सक्रिय आशीर्वाद असतो. १९६३ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केल्यापासून आसाम भागातील चीन-पाकिस्तान यांच्या जोड कारवायांना विशेष उधाण आले आहे. आसाममध्ये किती पाकिस्तानी नागरिक घुसले आहेत हे चालिहा-त्रिपाठी यांच्या सरकारलादेखील नेमके माहीत नाही अशी वस्तुस्थिती आहे.

या चीन–पाकिस्तान युतीत आता नागा बंडखोरही सामील झालेले आहेत. गेली तीन-चार वर्षे भारत सरकार या नागा बंडखोरांशी वाटाघाटी करीत आहे. परंतु या वाटाघाटींतून खरोखरच काही निष्पन्न झाले का ? आपल्या संघराज्याच्या मानचित्रात जो 'नागा प्रदेश' म्हणून दाखविला जातो तेथे प्रत्यक्षत: कोणाचे शासन चालू आहे हे एकदा जाऊन पाहिले म्हणजे मग दिल्लीत बसून 'आम्ही आमच्या सार्वभौमत्वाचे आणि प्रादेशिक अखंडत्वाचे रक्षण करू,' या आपल्या घोषणेला नागा बंडखोरांनी कसा सुरुंग लावला आहे, याचा प्रत्यय येतो.


पूर्व सीमेवरची ही चीन–पाकिस्तान–नागा युती आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी राबविण्याचा कम्युनिस्टांनी प्रयत्न न केला तरच नवल. आधीच कोणताही कम्युनिस्ट –मग तो डावा असो की उजवा असो–राष्ट्र वगैरे काहीही मानत नाही. त्यातून आपल्या देशातले डावे कम्युनिस्ट उघड उघड चीनवादी आहेत. पेकिंगमधल्या मुक्तिसेनेकडे ते मोठ्या आशाळभूतपणे पाहात असतात. लाल चिनी राजवटीच्या 'पुरोगामित्वा' चे गोडवे गाण्यात त्यांची चढाओढ सुरू असते. अर्थात चीनचे किंवा इतर कोणत्याही कम्युनिस्ट राजवटीचे 'पुरोगामित्व' कोणत्या स्वरूपाचे असते हे तिबेटी किंवा हंगेरियन जनतेने पुरेपूर अनुभवलेले आहे, ही गोष्ट वेगळी.

कम्युनिस्ट या घातपाती कारवाया करतात, असा केवळ कांगावा करून आसाममध्ये निर्माण झालेला गंभीर प्रश्न सुटणार नाही, हे ओळखण्याची वेळ आता खचित आलेली आहे. त्यांनी या असल्या कारवाया न केल्या तरच नवल. प्रश्न असा आहे की, कम्युनिस्टांचे आणि त्यांना चिथावणी देणाऱ्या आपल्या शेजारी राष्ट्रांचे धोरण पाहिल्यानंतर आपण काय करणार आहोत ? आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणीही कायम मित्र नसतो वा शत्रू नसतो. कायम असतात ते प्रत्येक राष्ट्राचे हितसंबंध. हे ध्यानात घेऊन आपण आपल्या हितसंबंधांना कसे जपायचे याचाच विचार व आचार व्हायला हवा. चिनी आक्रमण झाले की, कम्युनिस्टांची धरपकड करायची आणि पाकिस्तानी आक्रमण झाले की, जात्यंध मुसलमानांना तुरुंगात टाकायचे या असल्या थातुरमातुर उपायांनी तात्कालिक प्रश्न सुटत असले तरी राष्ट्रीय सार्वभौमत्वाशी प्रतिज्ञाबद्ध झालेल्या शासनयंत्रणेला याहून अधिक चिरस्थायी उपाय योजावयास हवेत, हेच आसाममधल्या ताज्या घटनांनी दाखवून दिले आहे.

– सदाशिव पेठकर

# तांदळापेक्षा अक्षता महाग असतात...

आम्ही
तुमच्या मुलीच्या लग्नाला
हमखास पैसे देऊ.


नवऱ्या मुलीच्या डोक्यावर सर्वांच्या शुभाशीर्वादाच्या चार अक्षता पडतात. त्या अक्षतांची किंमत भारी असते. लग्न म्हणजे खर्च आलाच. किती काटकसर केली तरी खर्च हा येणारच.
विमा उतरवून ह्या साऱ्या खर्चाची अगदी सहज आणि निश्चित सोय आता करता येते. आपली मुलगी लहान आहे तेव्हाच थोडक्या हप्त्याची पॉलिसी घ्या. म्हणजे ठराविक वेळी ठरलेले पैसे निश्चित मिळतील आणि लग्नाच्या खर्चाची काळजी राहणार नाही.
आजच तुमच्या विमा एजंटाला भेटा.

**आयुर्विम्याला पर्याय नाही**

PRATIBHA 673

# मु क्ता फ ळे !!

## ☐ इतिहास काय सांगतो ?

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा भीषण अंत झालेला पाहून कुणाला वाईट वाटणार नाही? आम्हांलाही वाटले. 'जनसंघ' हा पक्ष तावडतोब बरखास्त करणे हे किती आवश्यक आहे हे यावरून सर्वांच्या ध्यानात येईल. आपल्या देशातील बहुसंख्य हिंदूंच्या हिताला मानवेल त्याचाच पाठपुरावा करणे व अल्पसंख्याकांना, बहुसंख्याकांना आहेत त्यापेक्षा अधिक खास अधिकार नकोत, या सूत्रावर जो जो नेता देशात शुद्ध राष्ट्रीय राजकारण वा समाजकारण करून गेला, त्या सर्वांची अशीच भीषण वासलात आतापर्यंत लावण्यात आलेली आहे; हे सर्वांनी नीट ध्यानी घेतले तर असे प्रसंग यापुढे तरी येणार नाहीत. हिंदू समाजाची रचना अधिक शास्त्रशुद्ध पायावर करण्याचा अलीकडचा मोठा प्रयत्न आर्यसमाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती यांनी केला. हिंदू समाज आहे तसाच गलथान राहिला असता तर असे काय हो मोठे बिघडणार होते ? जोधपूरच्या महाराजांनी या स्वामींच्या उपदेशाने नन्नीजान या वेश्येला दिलेला आश्रय काढून घेतला. चिडलेल्या या मुसलमान वेश्येने दयानंदांच्या स्वैंपाक्याला वश करून, दयानंदांना विष दिले व ३०–१०–१८८३ या दिवशी दयानंद सरस्वती निजधामाला गेले. दयानंदांनी नन्नीजानच्या धंद्यावर पाय आणला म्हणूनच तिने दयानंदांचा खून केला नाही का ? दयानंदांच्या मृत्यूनंतर पंडित लेखराम यांनी प्रमुखत: दयानंद सरस्वतींच्या शुद्धिसंघटनेच्या कार्याची धुरा वाहण्यास सुरुवात केली. पंडित लेखरामांनी कुराणातील बाष्कळ विधानांचे खंडण करणारे पुस्तक लिहावयास घेतले आहे हे कळताच एका कुराण–भक्ताने त्यांचे शिष्यत्व पत्करले व ६–३–१८९७ या दिवशी पंडित लेखराम यांच्या पोटात सुरी खुपसून त्यांचा वध केला. पंडित लेखरामांचेच चुकले. त्यांनी एखादा निधर्मी व्यवसाय का पत्करला नाही ? लेखरामांनंतर आर्यसमाजाची जबाबदारी श्रद्धानंदांनी स्वीकारली. महात्मा गांधींना 'महात्मा' ही पदवी ज्यांनी दिली तेच हे स्वामीजी. श्रद्धानंदांनी देशांत मुसलमानांची मोठ्या प्रमाणावर सामुदायिक शुद्धीकरणे घडवून आणली. हिंदूंची लोकसंख्या कशी कमी करता येईल याचा विचार न करता श्रद्धानंदांनी ती वाढेल कशी हा नसता अव्यापारेषुव्यापार केला. मिशनरी व मुल्ला मौलवींनी हे असे काही करणे हे साहजिक होय. कारण अल्पसंख्य असल्याने

त्यांना सतत हिंदूंची भीती वाटते. [आधार : श्री.यदुनाथ थत्ते यांचा लेख–'महाराष्ट्र टाईम्स' ३१–१–१९६८ ] परंतु हिंदूपैकी एकानेच शुद्धिसंघटना करणे हा आम्ही तर म्हणू की अल्पसंख्याकांवर केवळ अत्याचार होय ! २० डिसेंबर १९२६ रोजी ते शांत चित्ताने अंथरुणावर बसलेले होते. अबदुल रशीद नावाच्या मुसलमानाने त्यांच्याशी चर्चा करण्याच्या निमित्ताने त्यांच्याजवळ येऊन त्याने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या व श्रद्धानंद स्वर्गवासी झाले. अबदुल रशीदला राग यावा अशीच त्यांची वागणूक होती, हे चाणाक्ष वाचकांनी नीट ध्यानी घ्यावे.

श्रद्धानंदांच्या शोकसभेत बोलताना, रत्नागिरी येथे स्वा. सावरकरांनी सांगितले, "त्यांच्या रक्ताच्या थेंबाथेंबागणिक लाखो श्रद्धानंद निर्माण करण्याची शक्ती माझ्या भारतमातेमध्ये आहे." स्फूर्तिदायक म्हणजे असेच काहीतरी बोलायचे असते. १९२६ सालच्या या अनुभवानंतर 'थेंबाथेंबागणिक' असे काही झाले असते तर भारताचे १९४७ साली तुकडे कशाला झाले असते ? परिणाम इतकाच झाला की, श्रद्धानंदांना आवडणारे राजकारण करू लागल्यावर, स्वातंत्र्यवीरांनी संरक्षणासाठी सतत गुरखे ठेवले. मोठमोठ्या विनोदी नेत्यांनी त्यांची टवाळी केली– "भित्रे कुठले ! गुरखे ठेवतात !!" परंतु सावरकरांनी कुणाचे ऐकले नाही.

सावरकर अशा एखाद्या मारेकऱ्यांचे धनी झाले नाहीत हा केवळ योगायोग नाही. याला कारण गुरखे ! परंतु जनसंघाची स्थापना होऊन तो बाळसे धरू लागताच श्यामाप्रसाद मुकर्जींना तर असे नाहीसे करण्यात आले की चौकशी नाही काही नाही ! आता पंडित दीनदयाळ यांचा पुन्हा खून झालेला आहे. खुनी सापडले तरी या खुनामागची "नन्नीजान" कदाचित सापडणारसुद्धा नाही. पुन्हा दीनदयाळजींना श्रद्धांजली वाहताना भाषणे झालीच – "रक्ताच्या थेंबाथेंबातून हजारो दीनदयाळ वगैरे–" स्फूर्तिदायक भाषण असेच करावे लागते. परंतु इतक्या वर्षांच्या अनुभवाने, 'जनसंघा'त वाट चुकून गेलेल्या तमाम हिंदूंनी कॉंग्रेसमध्ये दाखल व्हावे असे आम्हांस वाटते. स्वातंत्र्य मिळाल्यापासून एकाही कॉंग्रेसवाल्याचा खून वगैरे झालेला नाही. देशातील सर्व मिशनरी कॉंग्रेसवर प्रेम करतात. गावागावांतले सर्व मुसलमान, गावात 'मुस्लीम लीग' नसली तर कॉंग्रेसलाच मते देतात. देशात फक्त हिंदूंची लोकसंख्या कमी करण्याकरता डॉ. चंद्रशेखर नेमलेले आहेत. पाकिस्तानचे क्षेत्रफळ कसे वाढेल यासाठी कॉंग्रेस सतत धडपडत आलेली आहे, असा सर्वांगसुंदर व जिवाला यत्किंचितही धोका नसणारा पक्ष देशात असताना काही लोकांनी विपरीत वागून देशात पोलिसखात्याची कामे उगाच वाढवू नयेत. थेंबाथेंबागणिक वगैरे काहीही होत नाही–हा जुना अनुभव सर्वांनी ध्यानात घ्यावा. कॉंग्रेसचे दरवाजे सर्वांना उघडे आहेत ते काय फक्त बाहेर जाण्यासाठी ?

– ग्यानबा

# • समीर विचार वारे

## आजची इंग्लिश रंगभूमी

आतापर्यंत काही ब्रिटिश नाटक कंपन्या शेक्सपिअरच्या व इतर काही जुन्या नाटकांचे प्रयोग करण्यासाठी हिंदुस्थानात येऊन गेल्या आहेत. पण आजची इंग्लिश रंगभूमी कशी आहे याची भारतीय नाट्य-रसिकाला कल्पना यावी म्हणून " प्रॉस्पेक्ट प्रॉडक्शन्स " नावाची नाट्यसंस्था आधुनिक इंग्लिश नाटके घेऊन मागे भारतात आली होती, व तिचे दिग्दर्शक रिचर्ड कॉट्रेल यांनी दिल्लीच्या मुक्कामात आजच्या ब्रिटिश नाट्यजगताबद्दल थोडक्यात माहिती दिली होती.

इंग्लंडमध्ये धंदेवाईक नाटक-कंपन्या बऱ्याच आहेत व इंग्लंडमध्ये अभिनयाचे व दिग्दर्शनाचे शिक्षण देणाऱ्या नाट्यशाळाही खूप आहेत. तरीदेखील नाट्यक्षेत्रात यशस्वी व्हायला माणूस फार भाग्यवान असावा लागतो. " वस्तुस्थिती अशी आहे की नाटकाच्या धंद्यात माणसांची गर्दी फार झाली आहे, पगार कमी असतात, आणि प्रेक्षक बहुधा मध्यम वर्गातले व मध्यम वयाचे असतात. " टेलिव्हिजनमुळे लोक नाटकाला जायचे थांबले आहेत असे काही म्हणता येत नाही. पण टेलिव्हिजनमुळे नाटकाला नवीन प्रेक्षक-वर्ग मिळणे कठीण झाले आहे हे मात्र खरे. इंग्लंडच्या रंगभूमीला नवीन प्रकारचा प्रेक्षकवर्ग मिळाला पाहिजे याची आम्हा सर्वांना फार जाणीव आहे. जर रंगभूमी जगायची असेल तर तरुण प्रेक्षक मिळाला पाहिजे. पण त्याला वेळ लागेल व पैसाही लागेल. आमच्या कंपनीसारखी कंपनीदेखील सरकारी साहाय्याशिवाय जगू शकत नाही. "

## कामगार आणि संस्कृती

युगोस्लाव्हियामध्ये चित्रपट-निर्मितीच्या क्षेत्रात एक नवीन प्रयोग केला जात आहे अशी माहिती युगोस्लाव्ह सरकारच्या सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष डॉ. डुसाने व्हिज्नीव्हिक यांनी दिल्ली भेटीत दिली होती. हा प्रयोग म्हणजे चित्रपट तयार करण्यासाठी लागणारा पैसा उभारताना देशातल्या कामगार-समित्यांकडून वर्गणी घेऊन त्यांना नफ्यात भागीदार करण्यात येत आहे. सध्या दोनशे कोटी दिनार खर्चून एक प्रचंड चित्रपट तयार करण्यात येत आहे. त्याचे भांडवल याच पद्धतीने गोळा करण्यात आले आहे. या चित्रपटाच्या निर्मात्यांना सरकारकडून किंवा खासगी भांडवलदारांकडून पुरेसा पैसा मिळू शकला नाही, तेव्हा त्यांनी कामगार-समित्यांना मदतीची विनंती केली. चित्रपटाला लागणाऱ्या भांडवलापैकी अर्धे भांडवल कामगारांनी उभे केले आहे. या पद्धतीमुळे

चित्रपटांचा दर्जा वाढेल आणि उत्पादन दुप्पट होईल अशी अपेक्षा आहे.

### ☐ कर वसुलीचे आधुनिक तंत्र


हिंदुस्थानच्या अर्थव्यवस्थेची आज जी वाताहत झाली आहे तिचे एक मोठे कारण म्हणजे काळा पैसा. या छुप्या उत्पन्नावरची करवसुली न झाल्याने सरकारचे दरवर्षी कोटयवधी रुपयांचे नुकसान होत आहे. करवसुलीच्या विषयात सल्ला देण्यासाठी अमेरिकन तज्ज्ञांचे एक मंडळ नुकतेच भारत-भेट देऊन गेले. त्याचे नेते श्री. फिलिप चार्ल्स म्हणाले की, अमेरिकेत करवसुलीचे काम इतके प्रचंड वाढले आहे की तिकडे हिशेब करण्यासाठी स्वयंचलित यंत्रे वापरणे अपरिहार्य झाले आहे. अमेरिकेत सुमारे १० कोटी नागरिक कर भरणारे आहेत, त्यांतल्या प्रत्येकाला स्वतंत्र 'टॅक्स अकाउंट नंबर' देण्यात आला आहे. हा क्रमांक कधी बदलत नाही, त्यामुळे वर्षानुवर्षे त्या क्रमांकाच्या साहाय्याने त्या इसमाशी संबंध ठेवता येतो. कर-वसुलीचा हिशेब कॉम्प्युटर यंत्राच्या द्वारे करण्यात येत असल्याने प्रत्येक कर-दात्याचा हिशेब बिनचूक करण्यासाठी या क्रमांकाचा उपयोग करण्यात येतो. शिवाय क्रमांक देण्याच्या पद्धतीमुळे एकाच नावाच्या निरनिराळ्या कर-दात्यांच्या हिशेबात घोटाळा होत नाही.

### नवे जग

"वर्ल्ड लॉ फंड" नावाच्या एका आंतरराष्ट्रीय आदर्शवादी संस्थेचे कार्य-कर्ते व जर्मन विचारवंत हॉर्स्ट अफ्हेल्ट नुकतेच भारत–भेट देऊन गेले तेव्हा काही मूठभर मंडळी या संस्थेच्या द्वारे एक नवे जग निर्माण करण्याचा कसा जिद्दीने प्रयत्न करीत आहेत याची त्यांनी थोडक्यात माहिती दिली. ज्या जगात कोठल्याही प्रकारचा संघर्ष नाही, उलट शांततेचे साम्राज्य आहे अशा जगाची कल्पना पसरविणे हे या संस्थेचे ध्येय आहे. "जोपर्यंत नवे जग कसे असावे हे आपल्याला माहीत नाही तो-पर्यंत आपल्याला–सरकारांना काय किंवा लोकांना काय–तिकड जाता येणार नाही." या नव्या जगाचे वैचारिक 'नमुने' तयार करून हे अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न संस्थेतर्फे करण्यात येईल. शस्त्रहीन नवीन जगाचा एक नमुना म्हणजे जगातल्या देशांनी आपला शस्त्रसंभार काही अंशी कमी करावयाचा व युनोला सशस्त्र करावयाचे. हा नमुना कितपत व्यवहार्य आहे, त्याचे काय परिणाम होतील इत्यादी गोष्टींचा संस्थेचे सभासद विचार करतील. या बाबतीत संस्थेचे मूठभर लोक निरनिराळ्या देशांच्या सरकारचे मन वळवू शकतील काय? उत्तर: "हे विचार – उदा-हरणार्थ, निःशस्त्रीकरणाचा हा नमुना– स्वीकृत होण्याची शक्यता शून्य आहे." पण "कोठल्या परिस्थितीत हे विचार यशस्वी होऊ शकतील एवढेच फक्त संस्था पाहात आहे." "आमची संस्था म्हणजे विचारांचा कारखाना आहे. आजच्या राजकारणाचे बंधन न मानता उद्याच्या जगाचे अनिर्बंध आराखडे तयार करणे हे तिचे उद्दिष्ट आहे. विचार निर्माण करणे व त्याची चर्चा करणे हे तिचे कार्य आहे." ○

रा । त । रा । णी ।

वि ज य । तें डु ल क र




# गुंतागुंत

लीलाधर हेगडे

माझे एक व्यासंगी मित्र भेटले की मराठी साहित्यावर जोरदार हल्ला चढवून म्हणतात, तुमच्या मराठी साहित्यात अवसान जास्त, मजकूर कमी.

म्हणजे पानांच्या हिशेबाने मजकूर त्यांना अभिप्रेत नसतो– तसा मजकूर मराठीत कमी आहे असे कोण गाढव म्हणेल ?– पण त्यांचे म्हणणे असे की खरोखरच चांगले, भरीव असे हाती फार थोडे लागते. जे हाती घ्यावे त्यात कसल्या ना कसल्या अवसानावरच वेळ मारून नेण्याची शिताफी दिसते. शैलीचे अवसान, घाटाचे अवसान, वैचित्र्याचे अवसान, विनोदाचे अवसान, भावुकतेचे अवसान, प्रचाराचे अवसान,



'मी'ला भेटणाऱ्या निरनिराळ्या व्यक्तींचे एकच एक सामायिक वैशिष्टय आहे, ते म्हणजे ती सरळ नाहीत. प्रत्येकाला एक ना एक तिढा आहे. तो मुळात सापडणे व सापडला तरी सुटणे कठीण आहे. सोडवू जाणारा तिच्यात गुंतत जातो; गिळला जातो. पण 'मी' मात्र अजून शाबूत आहे, नव्हे आशावादी आहे....

वैचारिकतेचेही अवसानच. गाभ्यात काही आढळत नाही.

हे गृहस्थ फारच हुच्चे आहेत असे मराठी साहित्यातला एक 'धंदेवाला' म्हणून माझे त्यांच्याविषयीचे खासगी मत आहे. पण मध्यंतरी चुकून कोणाच्या तरी सांगण्यावरून एक पुस्तक मी वाचले आणि धावतच मी त्या गृहस्थांना गाठले. मला राहावलेच नाही. त्यांच्या आरोपाला इतके चोख उत्तर माझ्या हाती असे लागेल असे मला वाटले नव्हते.

हे पुस्तक वाचल्यापासून त्या गृहस्थांचे मराठी साहित्यावर हल्ला चढवणे कमी झाले आहे असे नाही; पण तूर्त आधी या पुस्तकाला सलाम करून ते मराठी साहित्यावर तोफा डागू लागतात.

मला तेवढेच जरा बरे वाटते.

मराठी साहित्यातले हे भाग्यवान पुस्तक शाहीर लीलाधर हेगडे यांचे 'गुंतागुंत'. ताज्या सरकारी पारितोषिकातदेखील (अहो आश्चर्यम्!) या पुस्तकाला एकदम दोन पारितोषिके मिळाली. या पुस्तकाला ती दिल्याने खरे म्हणजे परीक्षकांचाच सन्मान झाला. हे पुस्तक तर पारितोषिकांनी मोठे होण्यापलीकडे कसदार आणि गुणसंपन्न आहे असे माझे मत आहे.

माझ्या स्नेह्यांच्याच शब्दांत सांगायचे तर कसलेही 'अवसान' त्यात नाही. ते विलक्षण स्वाभाविकतेने ओथंबलेले आहे. आणि तरी अतिशय रसीले आहे. याचे कारण त्यात 'मजकूर' आहे– संपन्न जगणे आहे– आणि या सर्वस्वाने जगलेल्या 'जगण्या'तून स्वाभाविकपणे घडलेला एक निरोगी, निर्मळ, धीट, मिष्किल आणि विचारी दृष्टिकोन आहे. अनेक स्फुट लेखांच्या स्वरूपात आपल्या समाजातल्या मधल्या आणि खालच्या थराचे एक धावते, नेमके, जिवंत आणि जिव्हाळ्याने भरलेले चित्र ते रेखाटून जाते. पुस्तक वाचून संपते पण हे चित्र आणि त्याबरोबरची चुटपूट मनात रेंगाळत राहते– दीर्घ काळ.

पहिलाच लेख घेऊ, एकोणीसशे बेचाळीसच्या 'छोडो भारत' लढ्यावर तसे म्हटले तर काय कमी लिहिले गेले ? या लढ्याचा रौप्य-महोत्सवदेखील गुदस्ता साजरा झाला. परंतु या लढ्याविषयी कुणीही लिहिले–बोलले नाही ते या पहिल्याच लेखात सापडते. या लढ्याच्या पसाऱ्यात काही काळ भाव खाऊन गेलेल्या आपटे गुरुजीनामक एका बुजगावण्याचे बहारदार शब्दचित्र या लेखात हेगड्यांनी रंगवले आहे. या निमित्ताने या 'न्याऱ्या धुंदी' च्या म्हणजे 'केव्हाही हरताळ पाड, केव्हाही मिरवणूक काढ, नगरपालिकेचे दिवे फोड, शाळेवर तिरंगी झेंडा फडकावून मास्तरांची तिरपीट उडव' अशा बिन अभ्यासाच्या आणि देशभक्तीच्या रम्य विद्यार्थिदशेचेही निःसंकोच चित्रण त्यांनी केले आहे. 'क्रांतीचे अग्रदूत आहोत असे मानून मस्तीत हिंडणाऱ्या' या मध्यम वर्गीय पोरांचे क्रांतिविषयक ज्ञान रेल्वे पुलाखाली जाऊन येऊन आपण 'अंडरग्राउंड' झालो होतो असे मानण्याइतके अगाध असे. तरीही त्यांच्याकडे अंगचीच एक मध्यमवर्गीय हुशारीही असे. पोरेटोरे पाहून जर्मन कवी गटे याच्या नावाने काही तरी गोड गोड थापा झोकणाऱ्या बोगस आपटेगुरुजींच्या 'बौद्धिका' नंतर या लेखातल्या पोरसवदा 'मी'चा गुरुजीविषयीचा आदर त्याला जर्मनीमधल्या कवीचीही माहिती आहे हे ऐकून वाढतो. पण त्याच वेळी त्याला असेही वाटते की गटेने चंद्राबद्दल, तो अनेक ताऱ्यांचा मिळून झालेला आहे वगैरे लिहायला नको होते ! हे गुरुजी 'सबंध दिवस झोपत आणि लिहीत, लिहीत आणि झोपत. अंघोळ करीत नसत.' तसेच ते मुलींच्या स्वतंत्र बैठका घेत. त्यांना गुप्त बठकीसाठी रात्री गावाबाहेर नेण्याची कामगिरी 'मी'वर येते. वाटेत कुत्री भुंकताच गाळण उडालेले गुरुजी बरोबरच्या या शाळकरी पोरींना कुत्र्यांपुढे घालीत म्हणतात, 'मला गोळीबाराची नाही भीती वाटत. गोळी झेलीन छातीवर पण कुत्र्याची भीती वाटते.' यावर 'मी' पुढे लिहितो, कुत्र्यांचे भुंकणे छातीवर झेलीत मी आपटेगुरुजींना बैठकीच्या ठिकाणी पोहोचवले !

हा आपटेगुरुजी–तोच चंद्र, त्याच तारका, तोच गटे आणि तोच भाषणातील आशय सर्व ठिकाणी बोलणारा–या पाचसहा पोरांना 'सेवादलातील थोर सैनिकांनो' अशा मायन्याचे पत्र लिहून रात्री आठला एका पुलाखाली बोलावतो,

( ' तुमची वाट पाहीन. पाहीन हं वाट. निराश नका करू– ' गुरुजींचे शब्द. ) धडधडत्या छात्यांनी पोरं पुलाखाली हजर होतात. ('सॅबोटाजमध्ये तर गुंतवणार नसतील ?...घरदार सोडायला तर सांगणार नाहीत ? ' ) आणि गुरुजींनी ' नुसते एकमेकांवर प्रेम करणाऱ्या ' भ्रातृमंडळाची कल्पना गहिवरल्या स्वरात मांडताच ' आयला ! ' असा एक उद्गार शिंक आणि ढेकर मिळून जो आवेग निर्माण होईल त्या वेगाने ' मी 'च्या तोंडून निघून जातो. तो पुढे लिहितो, मला नुकतीच मिसरूड फुटली होती, तिने मला काय प्रकरण आहे ते झटकन सांगितले. मी माझ्या मित्रांना म्हणालो, ' ह्या माणसाचं आपण लवकर लग्न करून देऊ या. ' आणि आम्ही सर्वजण खो खो हसलो.

लेखाच्या शेवटी एक अर्थपूर्ण वाक्य आहे : अच्युतराव, अरुणाबाई, इतर भूमिगत कार्यकर्ते बाहेर आले पण आपटेगुरुजी अंडरग्राऊंड गेले ते कधी बाहेर आलेच नाहीत.

## ' आमच्या तमाशाचा तमाशा '

एका भ्रमनिरासाचा हा किशोरवयातला किस्सा कुठेही कडवटपणा येऊ न देता हा असा अत्यंत निरोगी वृत्तीने लीलाधर हेगडे लिहू शकतात. बेचाळीसच्या ओसरल्या खिलाडू चळवळीनंतर बाहेर आलेले भूमिगत पुढारी ' आता लवकरच एक मोठा आणि शेवटला लढा ब्रिटिश सरकारबरोबर द्यावा लागेल. ' असे जनतेला सतत सांगत होते त्याचा ' आमच्या तमाशाचा तमाशा ' या लेखातला उल्लेखही असाच भेदक परंतु कोणत्याही कटुतेविना केलेला दिसेल. उलट ही हुलकावणी मनाला लावून घेऊन प्रचारकी तमाशाचा फड उघडणाऱ्या स्वत: धरून काही उत्साही शहरी तरुणांच्या फजितीचीच मनमोकळी हकीकत पुढे हेगडयांनी अत्यंत खुसखुशीतपणे कथन केली आहे. दुसऱ्या दिवशी एकजण दुसऱ्याला सांगताना लेखातल्या ' मी ' ला ऐकू येतो. ' हीच ती कालची मंडळी. मायला, पैशे उकळायचे धंदे ! ह्यांच्या बापाने तरी तमाशा केलाय का ? '

यावर ' मी ' ऊर्फ लीलाधर हेगडे भरतवाक्य लिहितात. ' उत्तर काय देणार ! मनाशी म्हणालो, बापाने नाही केला पण आम्ही करणार आहोत. '

आधीच्या भाबडया उत्साहाप्रमाणे, देशभक्तीच्या रोमँटिक कल्पनांप्रमाणे मध्यमवर्गीय शंकेखोर वृत्तीप्रमाणे हा टगेपणाही ओढून ताणून आणलेला नव्हे, हाही अंगचा आहे आणि म्हणूनच विलोभनीय आहे.

याच टगेपणाने या पुस्तकात हेगडयांनी पुढारी, कार्यकर्ते आणि देशसेविका यांच्याविषयी काही अनुभवसिद्ध आणि मनोज्ञ ठोकताळे दिले आहेत. त्यांच्या मते निष्ठा म्हणजे कार्यकर्त्याचीच. ' निष्ठावान डॉक्टर, निष्ठावान हमाल, निष्ठावान भाजीवाला, फार काय निष्ठावान पुढारी हे कानाला ठीक वाटत नाही ! कानाला ठीक वाटते ते ' निष्ठावान ' किंवा ' निष्ठावंत ' कार्यकर्ता. 'असे लिहून ते म्हणतात, पुढाऱ्याला एखादे विशेषण लावायचे झाल्यास ' लोकप्रिय ' हेच लागू शकते. हे

विशेषण चिवडयापासून नटीपर्यंत सर्वांना चालू शकते पण ते कार्यकर्त्याला लावून पाहा. कानाच्या पडद्यावर नाद बरोबर निघत नाहीत.

'...कार्यकर्ता हा लोकप्रिय असू शकत नाही, तसा पुढारी निष्ठावान असू शकत नाही.' मग दोघांनाही फिट्ट विशेषण कोणते? हेगडे तत्काळ सांगतात, 'बेजबाबदार!'

यातला भेदक आशय कुणालाही जाणवेल परंतु हा मांडण्यात खुनशीपणा वा हेवादावा लवमात्र व्यक्त झालेला नाही. 'देशभक्ती आणि सुंदर मुली यांचे हाडवैर असावे असा मला संशय आहे.' या 'देशसेविका काळ्या आणि गोऱ्या' या लेखातील वाक्याइतकेच हेगडयांचे लेखन निर्मळ आणि पारदर्शक–क्वचित नको तेवढे पारदर्शक आहे. उदाहरणार्थ : ही गोरी देशसेविका काळ्या सेविकांत फार मिसळत नाही. तिला पुरुषवर्गातच मित्रपरिवार असतो...ही चिटुकली गोरी कोणाही पुढाऱ्यापुढे त्याच्या भाषणासंबंधी किंवा पक्षाच्या पॉलिसीसंबंधी त्याच्या तोंडावर नापसंती व्यक्त करू शकते. ती आम्हाला सांगते, 'मी हे त्यांच्या तोंडावर सांगितलं.' मात्र तिच्या या चिटुकलेपणामुळे तिला एक गालगुच्चा मिळाल्याचे ती सांगत नाही.

## उपरोधिक लिखाण

'अशीच एक श्राद्धसभा' या लेखात हेगडयांची मिश्किल आणि उपरोधिक लेखणी चळवळी, लढे असल्या उलथापालथींपासून बव्हंशी अलिप्त अशा स्वसंतुष्ट पांढरपेशा थराचा खमंग समाचार घेते. वडवलीनामक मुंबईनजीकच्या कारकुनांच्या एका फोफाटत्या गावातील एका श्राद्धसभेचा वृत्तान्त हेगडयांनी या अफलातून लेखात रंगवून खुलवून मर्मभेदक शैलीने लिहिला आहे. 'बहुतेकजण सुशिक्षित आणि प्रतिष्ठित आहेत त्यामुळे एकमेकांसंबंधी कधीही चांगले बोलत नाहीत' हे या लेखात जाता जाता गवसणाऱ्या मुक्ताफळांपैकी एक. या वर्गाचे किती अंगचेच ज्ञान हेगडयांना आहे याचे पुरावे या लेखात वाक्यावाक्यागणिक मिळत जातात. श्राद्धसभेला माणसेच नाहीत. तेव्हा गावातील ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. हजरनवीस आणि वृत्तीचाच चळवळ्या 'मी' माणसे गोळा करण्यासाठी गावात फिरू लागतात. हेगडे यानंतर लिहितात, 'कोणाची गाडी लेट होती' तर कोणाला 'ओव्हर टाइम' करावा लागला. एकाने डॉक्टरांना सांगितले की घरात जरा अडचण आहे. डॉक्टरांनी 'अडचणी'चा खुलासा विचारला. तेव्हा त्याने मंडळी 'ब्रिक आयडल' असल्याचे सांगितले. ...त्याच्या पुढील घरी आणखी घोटाळा झाला. ते गृहस्थ म्हणाले, 'डॉक्टर, तुम्ही देवासारखे आलात. मी तुमच्याकडेच निघालो होतो. आमचा चंदू सारखा हगतोय आणि ओकतोय. जरा बघा त्याला.'

अखेर माणसे जमतात. सभेत काळदाते नावाचे जाड भिंगांच्या चष्म्याचे गृहस्थ भाषण करताना मृताच्या औदार्याविषयी अभावितपणे सांगतात, 'मलासुद्धा त्यांनी

आमच्या संस्थेच्या मदतीसाठी रुपये एकावन्न देण्याचे कबूल केले होते. खरे म्हणजे आज ह्या प्रसंगी देण्याघेण्याच्या गोष्टी बोलू नयेत. परंतु ओघानेच आले म्हणून मला ही गोष्ट सांगितल्याशिवाय राहावत नाही.' दुसरे टेंगशे अडनावाचे 'कपाळावर रात्रीही शेंदूर असलेले' गृहस्थ खड्या आवाजात 'वासांसि जीर्णानि' हा श्लोक ओरडून म्हणतात, '...काकासाहेबांचे जीर्ण झालेले शरीर जरी आत्म्याने सोडले असले तरी आत्मा अमर असल्याने तो आपल्यातच वावरत असेल किंवा गावातच दुसरे कुठले तरी शरीर शोधत असेल किंवा आता बारा दिवस झाले असल्याने त्याने एखाद्या नवीन शरीरात प्रवेशही केला असेल.' यावर 'मी' शजारी बसलेल्या गुप्तेंकडे पाहून नुसता हसतो. गुप्तेची बायको नुकतीच बाळंत झालेली असते. गुप्ते 'मी'च्या कानाजवळ पुटपुटतो, 'चुकलं आमचं.'

रात्री दहाच्या या, ठरल्याप्रमाणे लांबलेल्या भाषणांच्या सभेत अध्यक्षांचे शेवटचे वाक्य बोलून होते न होते तोच सर्व लोक उठतात आणि बाहेर पडू लागतात. त्यांना सकाळी लवकरच्या गाड्या पकडून कचेऱ्या गाठण्याचे वेध लागलेले असतात. इतक्यात अध्यक्ष कोणाच्या तरी सूचनेवरून ओरडतात, 'थांबा, थांबा, एक महत्त्वाची गोष्ट राहिली.'

मृतात्म्याला शांती मिळो म्हणून सर्वांनी एक मिनिट स्तब्ध राहणेच राहून गेलेले असते !

समाजातल्या मधल्या थराची अशी निखळ निरागस खिल्ली उडवणारी हेगड्यांची लेखणी खालच्या थराला भिडते तेव्हाही इतकीच निरागसपणे खोचक-बोचक राहते. 'जय मार्क्स ! जय हिंदुधर्म ! जय लोकशाही !!!' 'हा ॲटम फोडला पाहिजे' 'पहारा' 'ह्या नसत्या भानगडी' 'गुंतागुंत' 'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' हे लेख या प्रकारचे आहे. गंमत म्हणजे या खालच्या थरात फिरतानाही हेगडे या थरांना निमित्ता-निमित्ताने एका ध्येयवादी धुंदीत भेटायला जाणाऱ्या मधल्या थराचे मिष्किल, मार्मिक चित्रण अंतर्मुखतेने करीतच राहतात. श्रमदानासाठी, निवडणूकप्रचारार्थ असा हा 'मधला थर' खेड्यापाड्यांत सटीसहामासी घुसतो. तो आला, त्याने पाहिले, त्याने जिंकले थाटात येऊन पोचणाऱ्या या काहीशा भावड्या ध्येयवादी तरुण मुलांना अज्ञानांधकारात बुडालेल्या गरीब जनतेऐवजी प्रत्यक्षात एक भली जटिल गुंतागुंत भेटते. या गुंत्याने ती बिचारी हडबडतात, गोंधळतात, पराभूत किंवा खजील मनांनी परत फिरतात. क्वचित चिकाटीने हा गुंता सोडविण्यासाठी, निदान समजून घेण्यासाठी धडपडतात. हेगडे हे सारे एक प्रकारे आपल्या आजच्या समाजस्थितीचेच वास्तव चित्र शब्दांत मांडताना ते कुठेही भावविवश किंवा प्रचारकी होऊ देत नाहीत. त्याला ते एक वेगळीच खुमारी आणतात. स्वतःला हसत राहतात, आपल्यालाही हसवीत ठेवतात. हसवता हसवताच अस्वस्थ करतात. 'पहारा'मध्ये श्रमदानाच्या उमाप उत्साहातल्या थकल्याभागल्या

'मी 'ला अपरात्री झोपेतून जाग येते. हेगडे लिहितात,

जागा झालो तेव्हा विठोबाला कोणीतरी हाक मारीत होते...विठोबाने 'ओ' दिली आणि तो परत गुरफटून झोपला... थोड्या वेळाने ते ओरडले, 'एऽ पांडा. पांडा'... कोणीतरी ओरडले, 'हाय रे बाबांनो' ...... विठोबा म्हणाला, 'पहारा चाललाय' असला पहारा मी कधी पाहिला नव्हता, ऐकला नव्हता. पहारेकरी पुन्हा कोणाच्या तरी नावाने पुकारू लागले आणि त्यातून एकदम भांडण उपटले. ......'हे भांडण कसलं चाललं ?' मी विठोबाला विचारले. मला एकूण हे प्रकरण काय आहे, याचा बोध होईना...विठोबाने स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला, 'आता पिकं आलेली आहेत. ती रातोरात नाहीशी होतात...म्हणून हा पहारा. 'पण तुम्हाला कशाला हाका मारताहेत ?' मी म्हणालो. 'सुक्याबरोबर ओलं पण जळतं......अहो, ही पिकं गावकरीच चोरतात. म्हणून आम्हीच पहारा सुरू केला. ... 'ओ' दिली नाही की तो घरी नाही असं समजायचं आणि चोरी झाली तर त्याच्यावर आळ घ्यायचा... पहारा सुरू केल्यापासून एकदाही चोरी झाली नाही.' विठोबा म्हणाला.

## 'या नुसत्या भानगडी'

त्या 'मी 'ची थोडी करमणूक होते पण झोप उडते. त्याला वाटते, 'ही माणसे आपण होऊन गावचा रस्ता करतात. पण एकमेकांची चोरीही करतात ! दिवसा खांद्याला खांदा लावून काम करतात पण रात्री दगलबाजी करतात !' जगातल्या कामगारांनो एक व्हा म्हणणाऱ्या लाल झेंड्याची गाणी म्हणून एका युनियनमध्ये काम करून पुन्हा आपल्यातील म्हारांची शिवाशिव कटाक्षाने टाळणारे खालचा थरवाले 'जय मार्क्स ! जय हिंदुधर्म !' मध्ये भेटतात. हुतात्म्यांची शपथ घालणाऱ्या संयुक्त महाराष्ट्र समितीला शंभर टक्के मतदान करून महार-मुसलमानांच्या पोरांना शाळेत आग्रहाने ओटचावर विभक्त बसवणारे गावकरी 'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे 'मध्ये आपल्या परिचयाचे होतात. काही तरी विधायक करण्याच्या प्रामाणिक ध्यासात एका गावात श्रमदानाने संडास बांधून घेणाऱ्या कार्यकर्त्यालाच ते संडास एकट्याने उपसावेही लागतात याचे विदारक आणि चुरचुरीत दर्शन 'ह्या नुसत्या भानगडी' मध्ये घडते. संडास होतात, पण हा कार्यकर्ता जाताच संडासांची वज कोणी ठेविनासे होते, गावभर त्यांची दुर्गंधी दरवळू लागते, कोणी त्यांत पाय ठेविनासे होते आणि कार्यकर्त्याला निरोप जातो, तावडतोब या. तो येताच गावकरी एकमुखाने म्हणतात, ही घाण गावात कशाला आनलीत ? ही घेऊन जावा. आता तो बिचारा ते संडास कुठे नेणार ? तो तडफेने म्हणतो, ते तुमचे आहेत, तुम्हीच त्यांची काळजी घेतली पाहिजे. कोणी ती घेत नाही. अखेर गावाचे श्रम आणि पैसे वाया जाऊ नयेत या आचेने तो कार्यकर्ताच संडास साफ करण्याला निघतो. त्याच्याविषयी सहानुभूती बाळगणारी गावातली एक म्हातारी, संडास साफ करण्यात


तो एकटाच गुंतला असता बाजूला उभी राहून सगळ्या गावाला तोंडाला येतील त्या शिव्या घालते; पण मदत मात्र करीत नाही.

कितीही कटू अनुभवांचे (ते पचवून अर्थात) असे मिष्किल, खेळकर, निरागस, नि:संकोच चित्रण करणारी हेगड्यांची लेखणी 'हा ॲटम फोडला पाहिजे 'मध्ये वेगळा रंग घेते आणि स्मित करते. रोजनिशीच्या स्वरूपात एका श्रमदान छावणीविषयी लिहिलेल्या या लेखात एक नोंद अशी आहे: 'काल अंगावर शहारे आणणारी घटना घडली. राम्याचा खून झाला...जखमी झालेल्या राम्याचा देह चारचौघांनी आणला...राम्याला कुऱ्हाडीने मारले होते...मी माणसाच्या अंगातला गिलावा पहिल्या प्रथमच पाहिला!...अशा वेळी तोंडाला पाणी का सुटते, कोण जाणे? माझ्यावर प्रसंग येता तर मात्र तें पळाले असते!'...राम्याने बाई ठेवली होती. राम्याला नव्हती बायको आणि त्या बाईला नव्हता नवरा. एकमेक एकमेकांना मदत करायला लागले. गावकऱ्यांना हे मान्य झाले नाही. राम्या म्हणाला, तुम्हाला काय पाहिजे ते करा. गावकऱ्यांपैकी शिवनाऱ्याने त्याला दारू पाजायला नेले आणि कुऱ्हाडीचे घाव घातले ('उगीच कोर्टात बिर्टात जावे कुणी?' असे यापुढचे वाक्य.) पोलिस पार्टी आली, शिवनाऱ्याला संशयावरून पकडून नेले, पुराव्या-अभावी तो सुटून आला. ('गावाची एकजूट भक्कम आहे. 'हेगडे लिहितात.) आणि नंतरची नोंद पुढीलप्रमाणे आहे: 'आज दुपारी जेवताना एक मेणचटलेली बाई येऊन उभी राहिली. तिच्या कडेवर आठ-दहा महिन्यांचे मूल होते. ते तिच्या शुष्क स्तनातून दूध मिळवण्याचा विफल प्रयत्न करीत होते...डोळे अस्वस्थ होते. अंगावर लक्तरे होती. आणि दुर्दैव असे की, ती पोटाशी असावी!...बऱ्याच दिव-सांची ती उपाशी असावी. मी श्रीपतला म्हणालो, 'तिला काहीतरी दे.' 'पायजे तर तुमी द्या' तो म्हणाला...मी म्हणालो 'ही कोण रे बाई?' 'राम्याची रखेली!' तो माझ्याकडे न बघता म्हणाला...मला बाईपेक्षा राम्याचाच किळस वाटला वाटले, आपला कार्यभाग उरकल्यावर राम्या तिच्यावर थुंकून दारू पिण्यासाठी जात असेल...राम्यापासून ही बाई गरोदर राहिली हे गावकऱ्यांना कळताच तिच्या-वर बहिष्कार पडला...राम्याचा निकाल लावण्यात आला...तिचा वाली गावात कुणीच राहिला नाही...जवळ मूल आणि शिवाय गरोदर असूनही कोणी चिट-पाखरू तिच्याकडे फिरकले नाही. ही काय माणुसकी आहे? गावातल्या बायका काय करतात?...मी श्रीपतला विचारले, 'आम्ही तिला अन्न दिले तर तुम्ही आमच्यावर बहिष्कार टाकणार का' तो म्हणाला, 'तुमी आमचं जातवालं थोडंच हात?'...खरे म्हणजे आम्ही कुदळ फावडे हातात घेऊन त्यांचे जातवाले बनून आलो होतो. पण ते त्यांच्या जातीत आम्हाला घ्यायला तयार नव्हते!...मला सर्वांत धक्का बसला एका गोष्टीमुळे. मला कळले की ती बाई श्रीपतीची चुलती आहे...संध्या-काळी ती बाई हद्दपार अठरा गावांच्या कक्षेपलीकडे कुठे तरी राहायला गेली.'

'गुंतागुंत' मधल्या 'मी' ला त्याच्या उत्साहापायी, सामाजिक तळमळीपायी मिळणाऱ्या अनुभवांचे स्वरूप एका अपरिहार्यपणे कमजास्त विषण्ण करणारे, उद्वेगजनकच आहे. वेगवेगळ्या स्थळी, वेगवेगळ्या निमित्तांनी त्याला भेटणाऱ्या विविध थरांतील माणसांचे एकच एक सामायिक वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे, ती सरळ–सोपी नाहीत. प्रत्येकाला एक ना एक तिढा आहेच. तो मुळात सापडणे आणि सापडला तरी सुटणे अशक्यप्राय आहे. माणूस भला तर भला नाही, दुष्ट तर सर्वस्वी दुष्टही नाही. अनेक विसंगतींचे तो बोचके आहे. हे बोचके कोणतीही विचारप्रणाली किंवा तत्त्वज्ञान पुरते पत्करीत नाही आणि सर्वस्वी टाकूनही देत नाही. आणि वर त्याविरुद्धदेखील काही तितक्याच आग्रहाने जपत, सांभाळीत राहते. 'मी' ला भेटणारा माणूस स्वार्थी आहे, गतानुगतिक आहे, ना–समज आहे, अंगचोर आहे, भ्याड आहे, क्षुद्र आहे. पण गंमत म्हणजे तो उदारही आहे, समंजस आणि कामसूही आहे, एखादा बदल आश्चर्यजनक वेगाने तो पचवू शकतो, तो शूर आहे, इतकेच नव्हे तर फार क्रूर आणि उफराटचा काळजाचा आहे. एका समाजात, किंबहुना एका देहातदेखील यातली परस्परविरुद्ध वैशिष्टचे गुण्यागोविंदाने सरमिसळ नांदत आहेत. म्हणजेच ही एक मोठी गुंतागुंतच आहे. कोणत्याही तर्कशास्त्रात वा तत्त्वप्रणालीत ही सोडविण्याचे बळ आढळत नाही. ही सोडवू जाणाराच हिच्यात अधिकाधिक गुंतत जातो, हिने गिळला जाऊ बघतो. किंवा वैफल्य पदरी घेऊन दूर होतो. भले भले हे असे या गुंतागुंतीचे बळी होत आहेत. परंतु 'गुंतागुंत' मधला 'मी' ह्या गुंतागुंतीला मिडूनही अद्याप शाबूत आहे इतकेच नव्हे तर प्रयत्नशील आणि आशावादी आहे. पराभवाने तो क्षणभर हतबल होतही असेल पण स्वतःच्या या अवस्थेला मुक्तपण हसून पुन्हा नव्याने प्रयत्नशील व्हावे हा त्याचा स्वभाव आहे. माणसांविषयीच्या कडवट अनुभवांनीच त्याला एक निखळ विनोदबुद्धी दिली आहे. अनुभवांतून जातानाच तो या विनोदबुद्धीने त्यातली गंमतही घेतो. आणि अनुभवाविषयी लिहिताना म्हणूनच अणूमात्र कडवट न होता विनोदबुद्धी जागी ठेवून तरीही एका सच्चा जिव्हाळ्याने लिहितो. याने 'गुंतागुंत' मधला विनोद स्वाभाविकपणे निर्माण होतो, कारुण्य प्रसंगोपात येते तेही स्वभाविकपणेच येते. हे सारे लिहिणाराचा आणि त्याच्या अनुभवविश्वाचा अंगभूत भाग ठरते आणि तुमच्या माझ्यासारख्या वाचकाला नेहमीहून एक निराळा आनंद देते, निराळीच चुटपूट लावते, निराळी बेचैनी देते. आपल्या सच्चेपणाने एरवीच्या साहित्याहून अधिक टिकाऊ असा ठसा ठेवून जाते.

असे काही नेहमी वाचायला मिळावे. मराठीत तरी असे एखादेच कधी तरी येते.


पण म्हणूनच त्याचे खूप कौतुक झाले पाहिजे. लिहिणारांची कधीच वाण नसते, वाण असते ती चांगल्या जगणाऱ्यांची आणि जगलेले सच्चेपणाने, तसेच निकोप, निरागस दृष्टिकोनातून लिहिणारांची. ○



# याला जीवन ऐसे नाव

जीवन जगायला काय लागत नाही ? सर्व काही लागते. पण जीवनात पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पाण्याचे दुसरे नाव जीवन. पाण्याबरोबरच इतर द्रव पदार्थांचे जीवनात कमी महत्त्व नाही.

पाण्याने सर्व चराचर सृष्टी व्यापली आहे. पाणी कोठे लागत नाही ? घरगुती उपयोगासाठी व पिण्यासाठी हरघडी पाणी लागते; शेती व उद्योगधंद्यांत तर अव्याहत पाण्याचा पुरवठा लागतो. तेव्हा त्यासाठी पाण्याची वाहतूक करावी लागते. काही विशिष्ट उद्योगधंद्यांत पाण्याप्रमाणेच रासायनिक द्रव्यांचीही वाहतूक करावी लागते. तसेच आरोग्य रक्षणासाठी पावसाचे पाणी अथवा सांडपाणी याचाही सतत निचरा करावा लागतो. पण ही कामे बिनबोभाट पार पाडण्याचे काम पंपाकडून केले जाते.



किर्लोस्कर पंपाकडून ही कामे अधिक जलद व विनासायास पार पाडता येतात.

सविस्तर माहितीसाठीं लिहा:


**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड,** किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली.



# कलावंत मनाची आस्वादक प्रतिबिंबे

अशीच नेहेमीची एक प्रसन्न संध्याकाळ. पण षण्मुखानंद सभागृहात मात्र ही संध्याकाळ वेगळेच सौंदर्य घेऊन प्रकटली होती. रूपवती केशसुंदरींचे मनोहारी संमेलन सभागृहात भरले होते. सनईची मंद सुरावट ऐकू येत होती. के. टी. डोंगरे आणि कंपनीने आयोजित केलेल्या 'अप्सरा, नववधू प्रियदर्शिनी' स्पर्धेचा सोहळा सुरू झाला होता. नानाप्रकारच्या चित्रविचित्र केशरचना सौंदर्याची नवीनवी रूपे दाखवीत होत्या. परीक्षकांपकी एक होते प्रा. अनंत काणेकर. त्यांच्या कलाप्रिय मनावर या केशरचना स्पर्धेची अनेक 'प्रतिबिंबे' उमटली. त्यातल्याच काही प्रतिबिंबांना शब्दरूप देण्याचा हा प्रयत्न.

सौंदर्य ही शब्दात न पकडता येणारी चीज आहे. कोणा एका आंग्ल साहित्यिकाला सौंदर्य म्हणजे काय असे विचारले असता त्याने दिलेले उत्तर अत्यंत मार्मिक आणि बोलके आहे. तो म्हणाला सौंदर्य म्हणजे काय ? असे तुम्ही विचारले तर मला ते सांगता यायचं नाही, परंतु तुम्ही तसे विचारले नाही तर मात्र मला ते (सौंदर्य) ठाऊक आहे ! ( इफ यू आस्क मी, आय डोण्ट नो; बट इफ यू डोण्ट आस्क मी, आय नो. ) असं हे सौंदर्य, व्यक्तिसापेक्ष, कोणाला चाफेकळीसारख्या नाकाची सुंदरी आवडावी तर कोणाला मीनाक्षी मदालसा पसंत पडावी, कोणाला मानेवर रूळणाऱ्या आखूड केसांची मुरळ पडावी तर कोणाला लांब विपुल केसांचा मोह असावा. प्रा. अनंत काणेकरांबद्दल बोलायचं तर त्यांना



'अप्सरा राणी' बक्षीस घेताना

विपुल, मुबलक केस आवडतात. "हवं तर जुन्या मताचा म्हणा मला, पण विपुल, भरपूर केस असणे हे मी स्त्रीच्या सौंदर्याचे महत्त्वाचे लक्षण मानतो" या शब्दांत ते आपली ही आवड प्रकट करतात.

छानदार केसांची टोपली किंवा घरटी करणे त्यांना मान्य नाही. लांडे 'मिनी' केसही त्यांना पसंत नाहीत. सौंदर्यवतीच्या विपुल, लांबसडक, सुरेख केशसंभारात त्यांना सौंदर्य आढळते.

परदेशप्रवासात अनंत माणसे प्रा. अनंत काणेकरांना भेटली. परंतु त्यांतल्या लक्षात राहिलेल्या थोडया व्यक्तींत लिली लिटलफील्ड नावाची स्त्री आहे. ही स्त्री त्यांच्या मनावर कोठेतरी कोरून राहण्याचे कारण म्हणजे त्या स्त्रीचा विपुल केशकलाप. प्रा. काणेकर चालले होते अथेन्सहून लिली लुलियानाला. वाटेत त्यांना ही भेटली. एलिपस अनाग्नॉस्तोपुलू हे तिचे माहेरचे अगडबंब नाव! तिचे सुरेख केस पाहून प्रा. काणेकर तिला म्हणाले, "तुझे हे विपुल सोनेरी केस कापून त्यांची शेपटं न करता किंवा झिपऱ्यांचं टोपलं न करता तसेच वळवून त्यांचा छानदार अंबाडा बांधलायस. युरोपातल्याच काय, पण आमच्या भारतातल्याही अद्ययावत मुली आता केसांचे डबे, टोपल्या तरी करू लागल्यात किंवा बीटनिक बीटल छाप, झिपऱ्याछपरं ठेवू लागल्यात!"

त्यांच्या या उद्गारांतूनच विपुल केसांतील सौंदर्याची त्यांच्या कलाप्रिय मनाला आवड आहे हे स्पष्ट व्हावे. 'अप्सरा नववधू प्रियदर्शिनी' स्पर्धेचे परीक्षकपद या

आवडीपायीच आपण स्वीकारले असे त्यांनी आरंभीच सांगून टाकले.

स्त्रियांनी अशा प्रकारच्या स्पर्धांत भाग घ्यावा किंवा नाही हा नेहेमी उपस्थित केला जाणारा प्रश्न. त्याचा उल्लेख होताच प्रा. काणेकर म्हणाले, स्त्रियांची संपूर्ण समता मान्य असताना या स्पर्धेत त्यांनी भाग घेऊ नये हे सांगणारे आम्ही कोण ? अशा सौंदर्य-प्रदर्शनाच्या स्पर्धेत भाग घेतल्याने म्हणे स्त्रिया बिघडतात. ज्या स्त्रिया बिघडण्यासारख्या असतात त्या चार भिंतीत राहूनही बिघडतातच. कलेची आवड असलेल्या स्त्रीने आपल्या कलेचं अवश्य प्रदर्शन करावं. मोहक, चांगली केशरचना करायची आणि डोक्यावरून पदर घ्यायचा याला काय अर्थ ? स्पर्धेत केसांची विविध रचना दाखवायची म्हणजे काही सौंदर्याचे बेढब प्रदर्शन नव्हे. अपोलो, व्हीनस यांचे पुतळे नग्न असतात ते काही केवळ नग्नतेसाठी नसतात. त्यांतील कोरीव शरीरसौष्ठव महत्त्वाचे असते. अशा प्रकारच्या स्पर्धेत भाग घेणारी स्त्री अधिक साहसी मनाची, असते एवढंच !

## दरबार इंद्राचा

षण्मुखानंद सभागृहात जो या स्पर्धेचा सोहळा होता तो मोठा अपूर्व होता. इंद्राचा दरबार भरावा तशी ही स्पर्धा झाली. अमीन सयानी यांचे रसीले निवेदन, परिणामकारक, वातावरण भारून टाकणारे मधुर पार्श्वसंगीत, व्यासपीठावर क्रमाक्रमाने एकेका स्पर्धक स्त्रीच्या रूपाने उधळत येणारे सौंदर्य यामुळे हा समारंभ मोठा बहारीचा झाला. स्पर्धेचा निर्णय देताना मुख्य भर दिला गेला तो स्पर्धक स्त्रीने नववधू करील तशी केशरचना केली आहे किंवा नाही हे पाहण्याकडे. प्रा. काणेकरांनी गप्पांच्या ओघात ही गोष्ट स्पष्ट केली. ते म्हणाले, " केवळ केसांची आकर्षक रचना असणे महत्त्वाचे नव्हते. विवाहाच्या वेळी नववधू ज्याप्रमाणे केशरचना व आनुषंगिक गोष्टी करील त्या गोष्टी तिने केल्या आहेत किंवा नाहीत हे आम्ही लक्षपूर्वक पाहिल्या. एका स्पर्धक-स्त्रीने केसांची रचना सुंदर केली होती. परंतु पायात चप्पल घालून ती आली. पतिघरी जाणारी नववधू पायांत चप्पल घालत नाही. ती अनवाणी पायानेच यायला हवी. या बाबीमुळे त्या स्त्रीला अर्थातच कमी गुण मिळाले. ' अप्सरा राणी ' ठरलेल्या कांतामणी कृष्णकुमार हिने अस्सल दाक्षिणात्य नववधूचा सारा नखरा, शृंगार सादर केला. दुसऱ्या क्रमांकाच्या सौ. जयश्री कीर्तने यांची महाराष्ट्रीय केशरचना म्हणजे आपला साधा खोपाच होता परंतु त्यातही त्यांची कल्पकता दिसत होती. नागासारखा आकार त्यांनी खोप्याला दिला होता. सौ. संघत यांची केशरचना अस्सल खानदानी गुजराती होती. "

सध्याचं जीवन हे महागाईने, नैराश्याने काळवंडून गेले आहे, वर्तमानपत्र उघडले की दंगल, मोर्चे, खून यांशिवाय इतर काही सुंदर, मंगल बातम्या नसतातच. अशा या भकास जीवनात काही आनंदाचे क्षण पुरवून जीवन काही काळ का होईना

प्रफुल्लित करण्याचे काम अशा स्पर्धा बजावतात या म्हणण्याला प्रा. काणेकरांनी पूर्णपणे पाठिंबा दिला.

या स्पर्धेच्या निमित्ताने प्रा. काणेकरांनी बोलायला सुरुवात केली खरी. परंतु हे बोलणे तेवढ्यापुरतेच मर्यादित राहिले नाही. त्यात अनंत विषय येऊन गेले. सौंदर्याविषयीचा मूलगामी विचारही त्यांनी आपल्या दिलखुलास शैलीत मांडला. " सौंदर्य म्हणजे परिपूर्णतेचीच प्रचीती असते आणि ती परिपूर्ण असते म्हणूनच ती स्वभावत: आनंददायी होते " अशी एक व्याख्यही त्यांनी सांगितली.

सौंदर्याच्या रुळावरून भरधाव सुटलेली त्यांच्या मनाची आगगाडी पुन्हा ' केशरचना–स्पर्धेच्या रुळावर ' आली. अशा या स्पर्धेच्या निमित्ताने तरी का होईना बायका आपल्या केसांकडे अधिक लक्ष पुरवितात. ' हेही नसे थोडके ' असे तात्पर्य त्यांनी काढले.

गप्पा संपल्या, खरं म्हणजे त्या कधी संपल्याच नसत्या, संपवायच्या भावनेने थांबवल्या एवढंच. प्रा. काणेकरांना विपुलकेशा सौंदर्यवती आवडते हे या गप्पातून निघालेलं मत. सौंदर्याचे उपासक असलेल्या प्रा. काणेकरांनी संवेदनाशील मनाने या स्पर्धा पाहिल्या. त्यांचा एक विशिष्ट ठसा मनावर उमटून गेला. गप्पा मारताना तो षण्मुखानंद सभागृहातला नक्षत्रासारखा सुंदर सोहळा पुन्हा उभा राहिला. जीवनात काही सुखाचे, सुंदर क्षण फुलविण्याचे सामर्थ्य त्या सोहळ्यात आहे हे पुन: पुन्हा वाटून गले. ◻


माजघरातील गप्पांत
ती खूप रागावली
मैत्रीणच ती
रोज दहा गोष्टींवरून रागावणार
पण गळ्यात गळे घालून
आम्ही एकमेकी बोलणार
मी जेव्हा माजघरात
" गोड आगमनाची " चाहूल
सांगितली तेव्हा तिने
माझ्या तब्बेतीसाठी आणि
बाळाच्या वाढीकरिता
हातात हात घेऊन
अनुभविक सल्ला दिला.

अर्कशालानिर्मित

**यु टो न**

रोज घेण्याचा
तज्ज्ञांनी प्रशंसिलेले गरोदरपणी घेण्याचे
एकमेव शक्तिवर्धक

**आयुर्वेदीय अर्कशाला लि.**

सातारा

# गनी

रामचंद, जैसा तुम सोचते हो, वैसा मै गिरा हुआ नहीं हूँ ! गनीचा आवाज अजीजीचा वाटत होता.

पण मी तुला वाईट समजत नाही, मी खोट बोलून गेलो.

मग तोंड का चुकवतोस ?

मी... मी... मुसलमान आहे....

**लछमन हर्दवाणी**

सुरुवातीला तो दारू फक्त पीत असे, पण दारूबंदी झाल्यावर मात्र तो दारू तयारही करू लागला. जोपर्यंत तो पीत होता तोपर्यंत तो बेकार होता पण ‘ पाजण्याची ’ कला अवगत झाल्यावर मात्र तो यशस्वी ठरला. थोड्याच दिवसांत तो पार बदलला. त्याच्या दृष्टिकोनातून सर्व काही बदलू लागलं.

त्याची मित्रमंडळी पुन्हा त्याच्याभोवती जमा होऊ लागली. खोटं स्मित करीत,लाळघोटेपणा करीत त्याच्याजवळ येऊ लागली. सुरुवातीला असे लोक त्याला कावेबाज भासू लागले. परंतु काही दिवसांनंतर त्याला आपला विचार बदलावा लागला. त्याला वाटलं, आपणदेखील कावेबाज नाही का ?

पूर्वी तगादा लावणारे लोक त्याला शिव्यांची खैरात करीत असत; आता तेच आपल्या आर्थिक परिस्थितीची त्याच्याजवळ रडगाणी गाऊ लागले. आपल्या कर्जाची



आठवण करून देत असताना काही त्याच्या समोर अक्षरशः रडलेदेखील.

त्याचं नाव होतं गनी. जातीनं तो मुसलमान होता. एके काळी जग गनीला लाथाडीत असे. आता सर्व त्याच्या पायाशी लोटांगण घालू लागले. गनीचा आत्मविश्वासही बळावला. पण त्याचबरोबर नवीन शक्तीचं व अस्तित्वाचं प्रदर्शन करण्याचा दुबळेपणाही त्याच्यात घर करू लागला.

एके दिवशी तो आपल्या घराच्या व्हरांड्यात उभा होता. मीही आपल्या चाळीत घराच्या खिडकीपाशी उभा होतो. एकाएकी आम्हा दोघांची दृष्टादृष्ट झाली. अंमळसं पाहून तो ओरडला—

"सिंधी बाबू, जरा इधर आव्."

मला किंचित गोंधळल्यासारखं झालं. पण लगेच स्वतःला सावरून खिडकीपासून दूर झालो. जावं की जाऊ नये? साला आम्हाला असं दमात खाऊन जाईल? शेवटी मनाचा हिय्या करून एक छोटासा चाकू रुमालात गुंडाळला व खिशात लपवून मी चालू लागलो. चेहरा अगदी गंभीर करून त्याच्याजवळ गेलो.

"तू व्यापारी आहेस?" —गनीनं करड्या आवाजात विचारलं.

"नाही." – मी एक आवंढा गिळला.

"मग? काम काय करतोस?"

"एका व्यापाऱ्याकडे नोकरीला आहे."

"पण तू तर शिकलेला दिसतोस." – त्याचे डोळे लकलकले.

"होय. मी कारकून आहे."

"अस्सं. म्हणजे केव्हाही पोलिसात अर्ज करून मला तुरुंगात पाठवू शकशील; नहीं क्या?" – तो छद्मीपणाने हसला.

क्षणभर माझा चेहरा पडला. एवढ्यात त्यानं हसणं बंद केलं. डोळे किलकिले करून त्याने खिशातून एक मोठा चाकू बाहेर काढला. डाव्या हातात चाकू धरून उजव्या हाताच्या एका बोटावर थुंकी लावून तो चाकू घासू लागला. मी थरारून गेलो. पण लगेच स्वतःला सावरून मीही रुमालात लपवलेला लहान चाकू बाहेर काढला. किंचित करड्या आवाजात म्हणालो–

"गनी भाई, आवो, आपण चाकूंची अदलाबदल करू या."

निमिषमात्र तो आ वासून माझ्या चेहऱ्याकडे पाहू लागला.

"अस्सं. म्हणजे मघाशी तू झूट बोललास!"

"काय?"

"तू कारकून आहेस म्हणून."

"नाही. मी खोटं बोललो नाही."

"मग, एवढी हिम्मत?"

"मला पगार पुरत नाही."

"म्हणजे?" –त्याला काहीच कळलं नाही.

"म्हणजे मी गरीब आहे. आणि गरिबाला तर स्वतःच्या प्राणाची विशेष पर्वा नसते. तो भ्याड होऊन बसला तर मेलाच म्हणून समजा."

"पण शिकलेले लोक बहुधा डरपोक असतात, नाही?"

"असतील. पण मी आधी गरीब आहे."

"हूँ! इतर शिकलेल्या लोकांपेक्षा तू जरा अधिक विचारवंत दिसतोस."

"गनी भाई, आपण दोघे शेजारी राहणारे. या नात्याने आपण जर दोस्तीने वागलो तर अधिक शहाणपणाचं नाही का ठरणार?"

यावर तो मोठ्याने हसला. चाकू बंद करून तो म्हणाला–

"मैं हार गया भाय्!" –अंमळसं थांबून तो म्हणाला–

"बरं, आता मला सांग, एखाद्या माणसापासून तुला काही त्रास तर होत नाही ना?"

मी स्मित केलं. तो म्हणाला– "तुमको तुमारे बगवान की कसम. कुठलंही काम अडलं तर मला सांगत जा. तुझ्यासाठी आपली जानदेखील देईन यार."

आणि मग तो जास्त वेळ न थांबता झरझर निघून गेला.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ऑफिसातून परत आलो. कपडे बदलीत असताना माझी पत्नी सुन्दरी म्हणाली–

"गनीची मुलगी आली होती."

"का?"

"तुमचं नाव विचारायला."

"मग?"

" सांगितलं."
" पुढं ? "
" ती गेली निघून."
" निघून गेली ? काही म्हणाली का ?"
" नाही. का ? काही झालंय का ?"
" नाही... पण... तू नाव विचारायचं कारण नाही विचारलंस ?"
" विचारायला हवं होत का ? विशेष काही... "
" बरं, जाऊदे ते... वाढ लवकर... "

जेवण उरकून फिरण्याच्या उद्देशाने बाहेर पडलो तो समोर गनी. झरझर तो जवळ आला.

" रामचंदजी, घूमने को निकले क्या ?"
" हाँ. "
" तुम्हाला काही वेळ असेल तर... "
" बोला. काही पत्र वगैरे लिहून पाहिजे का ? "

" अरे नहीं यार. त्याचं असं आहे. आज सिनेमा देखनेका इरादा है। ये देखो. दोन तिकिटंदेखील काढून ठेवली आहेत. शेवटच्या खेळाची आहेत. पहिल्या खेळाला तर तुम्ही येऊ शकणार नाही."

त्याच्या हातात सव्वा दोन रुपयांची दोन तिकिटं पाहून माझ्या काळजात धस्स झालं. माझ्या डोळ्यांसमोर कालची घटना तरळून गेली. सिनेमाला जायचं ? ..... गनीबरोबर ? ... तेही शेवटच्या खेळाला ? ... त्याने जर का ... माझ्या सर्वांगावर काटा उभा राहिला.

मी अळंटळं करीत म्हणालो – " गनी ... आलो असतो, पण मला एका नातेवाइकाकडे जायचंय ... दुसरं काही काम ....."

" अस्सं. म्हणजे शेजारचे नातेवाईक नसतात. असंच ना ? "–त्याला चीड आलेली होती. तो दातओठ खात धारदार शब्दांत म्हणाला. मग त्याने लगेच दोन्ही तिकिटे फाडून माझ्यासमोर फेकली आणि तो झपाझप पावले टाकीत समोरच्या गल्लीत दिसेनासा झाला.

त्यानंतर तोही माझ्याशी बोलला नाही व मलाही त्याच्याशी बोलण्याचं धैर्य होईना. मला पाहून तो तोंड वळवून निघून जायचा. त्याला पाहून मला गुदमरल्यासारखं वाटायचं. माझी मान आपोआप खाली व्हायची. अशा तऱ्हेने दोन-तीन आठवडे लोटले.

एका रात्रीची गोष्ट. जेवण करून जरा उशिराच मी फिरायला बाहेर पडलो. रस्त्यावर शुकशुकाट होता. अचानक कुणाची तरी चाहूल ऐकू आली. मागे वळून पाहिले; गनी माझ्या मागोमाग येत होता. माझा थरकाप उडाला. त्या दिवशी त्याने

एकफुटी चाकू दाखविला होता. आता जर तोच चाकू त्याने वापरला तर? ह्या दारूड्यावर काय विश्वास? पण लगेच काही निर्धार करून मी स्वतःला सावरलं. मला का म्हणून तो मारणार? स्वतःच्या कामासाठी जात असेल कदाचित. मग मला भिण्याचं काय कारण? समोरच इराण्याचं रेस्टॉरंट दिसलं. मी तडक आत शिरलो. मनात अजून भीती कायम होती. काउंटरजवळ पोचून मी हुकूम सोडला, "दोन बिस्कीट, एक चाय्."

इराणी ओरडला – "छोकराऽऽ, दोन बिस्कीट, एक चाय लाव." मला तेथेच थबकलेला पाहून इराणी माझ्याकडे टक लावून पाहू लागला. मीही त्याच्याकडे पाहू लागलो. माझ्या लक्षात आलं, मला ह्या इराण्याला नव्हे तर, गनीला पाहायचं होतं. गनी, त्याला मी सिनेमाला येण्यास नकार दिला होता, तो माझा पाठलाग करीत होता. आतापर्यंत तो पोचायला पाहिजे होता – गनी? पण गनी तर माझ्यासमोरच उभा होता!

रेस्टॉरंटच्या दाराजवळच उभा राहून तो माझ्याकडे किलकिलत्या डोळ्याने पाहात होता. दोघांची दृष्टादृष्ट झाली. माझ्या सर्वांगाला घाम फुटला. मी घाईने, खिशातून चार आणे काढून काउंटरवर टाकले व गनीकडे जायला निघालो. गनीच्या डोळ्यांत आज व्याकुळता व अजिजीचे भाव दिसत होते. तो बराच मलूल दिसत होता. डोळेही पाणावल्यासारखे झाले होते.

त्याच्याजवळ जाऊन मी त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणालो – "भाईजान काही खास काम?"

गनी दाटलेल्या गळ्याने हसण्याचा प्रयत्न करून म्हणाला – "भाईजान! मी तुमचा भाऊ कधीपासून झालोय?"

मी गप्प. मला काहीच बोलता येईना. त्याच्याकडे पाहण्याचंही धैर्य होईना. मी खाली पाहात होतो. माझा हात त्याच्या खांद्यावरून आपोआप खाली आला. त्याच्या डाव्या हातात माझ्या हाताची पकड घट्ट करून तसाच बाहेर पडलो. काहीच न बोलता आम्ही पुढं जात होतो. थोड्याच वेळात आम्ही माहिमच्या एका बागेत पोचलो. काही वेळ आम्ही गप्प होतो. तळ्याकडे पाहून अचानक तो पुटपुटला –

"रामचंद, जैसा तुम सोचते हो, वैसा मैं गिरा हुआ नहीं हूँ."

"पण गनीभाई, मी तुला काही वाईट समजत नाही."–मी उगीच खोटं बोलून गेलो.

"मग माझं तोंड का चुकवतोस? मी मुसलमान आहे म्हणून?"

"छे, छे, तसं नाही ....."

"मग काय कारण आहे?"

यावर मी गप्प. अमळशानं म्हणालो – "गनीभाई, तुझी काही हरकत नसली तर ..... एक विचारू? ..... माझ्याशी दोस्ती करायला तू एवढा उत्सुक का आहेस?"

माझा प्रश्न ऐकून काही वेळ तो गप्पच बसून राहिला. मग हळूच म्हणाला – "रामचंद, तुम्हीच एकदा म्हणाला होता ना आपण शेजारी शेजारी राहतो व या नात्याने आपण एकमेकांचे सहायक आहोत, आधार आहोत."

"म्हणालो होतो खरा, पण माझ्या म्हणण्याचा अर्थ ... संकटाच्या वेळेला आपण एकमेकांना साहाय्य करायला पाहिजे."

"अच्छा. माफ करो. मी दुसराच अर्थ काढला होता. तुम्ही सिंधी लोक म्हणजे जातीने वाणी. त्यांना समजावयाला वाण्यासारखाच दिमाख हवा."

'तुम्ही सिंधी लोक म्हणजे जातीने वाणी. त्यांना समजावयाला वाण्यासारखाच दिमाख हवा.' – गनीनं असं म्हणताना मला वाटलं, त्याने मला शिवीच हासडली होती. त्याचे शब्द माझ्या कानात घुमू लागले. त्याला तसली शिवी देण्यासाठी मीच नव्हती का संधी दिली? मीच कारणीभूत होतो. माझं मन बंड करून उठलं. गनीपासून दूर का म्हणून पळायचं? काय कारण होतं? मी आपल्या मनात कारण धुंडाळू लागलो. कदाचित त्या खऱ्या कारणापुढं माझी वाणिज्य-वृत्ती लुप्त झाली असावी. मी त्याला खरं कारण सांगणार होतो. – 'खरं म्हणजे मी तुला टाळतो ते मला तुझी भीती वाटते म्हणून. तू शराब पितोस, तयारही करतोस, कट्यारीसारखा चाकू बाळगतोस म्हणून .....'

पण तेवढ्यात तो उठून उभा राहिला. माझ्या खांद्यावर हलकेच थोपटून तो झपाझप पावले टाकीत दिसेनासा झाला.

काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

के. टी. डोंगरे अॅण्ड कं., प्रा. लि.,

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

डोंगरे बालामृताचे

वरील घटनेला दहा–पंधरा दिवस लोटले असतील. संध्याकाळी मी घरी आलो, तेव्हा गोपाळ माझीच वाट पाहात होता. गोपाळ माझा मित्र होता. मला पाहूनच तो भडकला. मला खोटारडा, बेशरम, नीच, वाटेल ते बोलू लागला. काही महिन्यांपूर्वी मी त्याच्याकडून चाळीस रुपये उसने घेतले होते. तेच पसे तो मागत होता व शिव्या देत होता. शेवटी त्याने माझ्या पूर्वजांचाही उद्धार केला. डोळे वटारून म्हणाला – "चाळीस रुपये मिळाल्याशिवाय हालणार नाही." मी अपमानित होऊन सारं ऐकत होतो. दुसरा मार्गच नव्हता.

इतक्यात गनी तेथे कसा अवतीर्ण झाला कुणास ठाऊक ! येताक्षणीच तो गोपाळच्या अंगावर धावला. त्याने गोपाळची गचांडी धरली. माझी बायको व मी शहारलो. गनीचे ओठ फडफडत होते, त्याचं रक्त जणू सळसळत होतं, डोळे लालभडक झाले होते. पण त्याच्या तोंडातून मात्र एकही शिवी बाहेर पडली नाही. त्याचे हात थरथर कापत होते. तो गोपाळची गचांडी धरून त्याला ओढत जिन्याच्या पाच–सहा पायऱ्या खाली उतरू लागला. मी सुषुप्तीतून जागा झालो. धावत जाऊन गनीजवळ पोचलो...

"गनीभाई त्याला मारू नकोस. अखेर दोस्तच आहे माझा."

गनीनं लगेच त्याला खाली ढकलून दिलं. तो धाड्दिशी खाली जाऊन पडला. गोपाळ उठण्यापूर्वी गनीने त्याची मान धरली. त्याचे डोळे बाहेर येऊ लागले. गनीनं मला विचारलं –

"हा कर्जाविषयी काय बडबडत होता ?"

मी मान खाली घालून स्तब्ध उभा होतो.

त्याने धारदार शब्दांत गोपाळला विचारले –

"क्यों बे, कितने पैसे हैं ?"

"चाळीस." – थरथर कापत गोपाळ म्हणाला.

गनीने आपला शर्ट वर केला. आपल्या जाड बनियनच्या खिशातून नोटांचा पुडका काढून त्याने चाळीस रुपये मोजले. त्याने त्या नोटा गोपाळच्या अंगावर भिरकावल्या. गोपाळने लगेच पळ काढला. क्षणभर माझ्याकडे पाहून व लगेच मान खाली घालून गनी एका गल्लीत दिसेनासा झाला.

मी गर्भगळित होऊन उभा होतो. मला काहीच सुचत नव्हतं. जिन्याच्या एका पायरीवर उभा राहून मी बायकोकडे पाहात होतो. ○

लेखक : सुगन आहुजा अनुवाद : लछमन हर्दवाणी

पुस्तके

## नाट्याचार्य देवल

# एक उठावदार चरित्र

हल्ली मराठी साहित्यात चरित्र, आत्मचरित्र आणि आठवणी अशा ग्रंथांची मौलिक भर पडत आहे. यापूर्वी 'माणूस' मधून मी 'स्मृतिधन' हे चापेकरांचे आत्मचरित्र आणि 'आदर्श भारत सेवक' हे गोपाळ कृष्ण गोखले यांचे फाटक यांनी लिहिलेले चरित्र या ग्रंथांची परीक्षणात्मक ओळख करून दिली आहे. १९६६–६७ सालात अशी किती तरी चरित्रे आणि आत्मचरित्रे मराठीत प्रकाशित झालेली आहेत.

नामवंत व्यक्तींची चरित्रे अथवा आत्मचरित्रे जेव्हा लिहिली जातात तेव्हा त्या व्यक्तींच्या जीवनाबरोबरच तत्कालीन समाजपरिस्थितीचे चित्रणही अशा ग्रंथांतून होत असते. म्हणजे जणू त्या त्या काळाचे चरित्रही अशा चरित्रांबरोबर आपोआपच लिहिले जात असते. काळ हा कोणाला पकडून ठेवता येत नाही असे म्हटले जाते. परंतु अशा विचारांच्या संदर्भात, चरित्रकारांनी आणि आत्मचरित्र लेखकांनी काळाचेही चरित्र किती उत्तम रेखाटलेले असते ही गोष्ट लक्षात येते !

प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी लिहिलेले नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल यांचे चरित्र नुकतेच वाचण्यात आले. त्या वेळी चरित्रनायकाचे जीवन आणि काळाचे जीवन यांचा संबंध आणि स्वरूपाची जाणीव मला प्रकर्षाने झाली. १८५५ साली देवल जन्मले आणि १९१६ मध्ये त्यांचे देहावसान झाले. वयाच्या तिसाव्या

वि. शं. पारगावकर

वर्षी देवल यांची पहिली आणि स्वतंत्र नाट्यकृती जन्माला आली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठीत किर्लोस्कर आणि देवल हे दोन महान नाटककार आपल्या नाट्यकृती सादर करून गेले. हा काळ मराठी नाट्यकलेच्या आणि नाट्यवाङमयाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. 'नाट्याचार्य देवल' या चरित्र-ग्रंथाच्या निमित्ताने बनहट्टींनी त्या काळातील नाट्यकृतींचा आणि मराठी रंग-भूमीचा इतिहास मराठी वाचकांस सादर केला आहे.

असा इतिहास सादर करताना त्यांनी इतिहासाच्या साधनांचा फार काटेकोरपणे, संयमाने आणि सडेतोडपणे उपयोग केलेला आहे.

## अधुनिक दृष्टिकोन

देवलांचे चरित्र सिद्ध करीत असताना त्यांनी उपलब्ध पुराव्याची छाननी फार काळजीपूर्वक केलेली आढळते. काव्यविहारीने नाट्याचार्यांचे जे चरित्र लिहिले आहे त्यातील तर्काला न पटणाऱ्या गोष्टी बनहट्टी यांनी बाद केलेल्या आहेत. परंतु अशा घटना बाद करतानादेखील त्यांनी अस्सल पुरावे उपलब्ध करण्यासाठी जे श्रम घेतले आहेत ते विशेष उल्लेखनीय आहेत. यावरून चरित्रनायकाचे जीवन शोध-ण्याची तळमळ जशी व्यक्त होते तसेच चरित्रलेखनाचा आधुनिक दृष्टिकोणही व्यक्त होतो.

'नाट्याचार्य देवल' या ग्रंथात बनहट्टी यांनी देवलांचे अधिकृत चरित्र सिद्ध करण्याचा जसा प्रयत्न केला आहे, तसाच त्यांच्या नाट्यकृतीपाठीमागील इति-हासाचा मागोवा घेऊन नाट्यकृतीचेही विश्लेषण त्यांनी केलेले आहे. त्या दृष्टीने या चरित्राचे दोन भाग पडतात. एक व्यक्तीच्या चरित्राचा आणि दुसरा तिने लिहि-लेल्या नाट्यकृतींच्या विश्लेषणाचा.

आजच्या पिढीला देवल म्हणजे 'संशयकल्लोळ' असेच समीकरण पाठ आहे. देवल म्हणजे 'शारदा' हे समीकरण जरी प्रभावी आणि स्वाभाविक असले तरी देवलांच्या शारदेचो आजच्या नाट्यरसिकाला आणि वाचकाला फारशी ओळख नाही. खरी गोष्ट अशी की शारदा ही देवलांची पहिलीवहिली स्वतंत्र नाट्यकृती केवळ यासाठीच नव्हे तर तिच्यामधून व्यक्त झालेल्या नाट्यगुणांसाठी आणि तिने त्या काळच्या समाजमनावर केलेल्या परिणामासाठीही 'शारदे'चे महत्त्व मोठेच म्हणावे लागेल.

अर्थात या ठिकाणी पुन्हा 'शारदे'च्या संदर्भात नेहमीचाच प्रश्न उपस्थित होतो. तो म्हणजे 'कलाकृती आपल्या सामर्थ्याने समाजपरिवर्तन घडवून आणू शकते काय?' अर्थात याचे उत्तर 'होय' म्हणून जसे देता येणार नाही तसेच तडकाफडकी 'नाही' म्हणूनदेखील देता येणार नाही. कारण हे प्रमेय (१+१=२) या गणिताइतके सरळ, साधे आणि सोपे नाही.

प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी 'नाट्याचार्य देवल' या आपल्या ग्रंथातील


सात

# प्रतिपच्चंद्रलेखेव

## संगमनेर


नगराध्यक्ष श्री. बाळासाहेब ढाके वेशीवर उपस्थित होते.





'केसरी'चे सहसंपादक श्री. वि. स. वाळिंबे आणि
पुण्याच्या कॉंटिनेंटल प्रकाशनाचे चालक
श्री. अनंतराव कुलकर्णी, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे
यांना घेऊन संगमनेरला हजर होते.

नासिकची पत्रकार परिषद आटोपून
'साधना' साप्ताहिकाचे संपादक श्री. यदुनाथ थत्ते
संचलन कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी
संगमनेरला थांबले होते.







नेहरू चौकातील रात्रीच्या जाहीर सभेत
डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे.






आमदार श्री. रामभाऊ म्हाळगींचे
भाषण ऐकण्यासाठी संगमनेरच्या
आसपासच्या पाच-पंचवीस गावातून शेकडो मंडळी
सभेसाठी जमली होती.




**सिन्नर** चिकणी आणि नांदूरशिंगोटे ही वाटेतील
गावे घेऊन
संचलन सिन्नरला दाखल आले तेव्हा.

**मदत झुगारा। भा**
ही एक नवीन घोषणा
वेशीवरून निघालेल्या मिरवणुकीत





सिन्नरचा कार्यक्रम या सर्वांनी यशस्वी केला

नाशिक रोडच्या श्रेयाचे प्रमुख
प्रा. चंद्रकांत वर्तक, बरकतभाई
प्रा. दि. के. बेडेकर आणि श्री.
यांची खास उपस्थिती






## उभारा

दुमदुमली.

वाटेतील चर्चा—
प्रा. दि. के. बेडेकर
आर. के. पाटील






नकर्गा
आणि श्री. कुलकर्णी
आर. के. पाटील

## नासिकरोड ते नासिक

वाटेवरील स्वागत
आयोजक : श्री पाठक

## नासिक आले....







**ध्येय प्रेम, आशा यांची**
**होतसे का कधी पूर्ती**
**वेड्यापरी पूजितो या**
**आम्ही भंगणाऱ्या मूर्ती**

**कुसुमाग्रज**






नासिक नगरपालिका अध्यक्ष श्री. उत्तमराव ढिकले.



रात्रीच्या सभेतील स्वातंत्र्यवीर सावरकरांचे
स्वतंत्रता स्तोत्र ... जयोस्तु ते....
गायक : श्री. बाळ भाटे



'गावकरी'चे संपादक
श्री. दादासाहेब पोतनीस










# आमचे आम्ही जगाचे स्वामी

आमचे आम्ही केले तर जगाचे स्वामी
ठरू शकतो हे नासिकजवळच्या
उंबरखेडने सिद्ध केले
तीन वर्षांत संपूर्ण जिरायती गाव बागायती
करून दाखविले.
उंबरखेडचा हा पराक्रम दिल्लीला कळावा
यासाठी ग्रामस्थांनी नासिकच्या सभेत
गव्हाचे एक पोते. अमेरिकेला पाठविण्यासाठी
अन्नस्वतंत्रता संचलन समितीच्या स्वाधीन केले.



दि. १४ मार्च : दैनिक गावकरी कार्यालय. दोन तास चाललेल्या चर्चेचा समारोप करताना पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. वि. म. दांडेकर



रात्रीच्या सभेचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य गोसावी....

**'हे संचलन। हे स्वयंचलन। सर्वांनी यशस्वी केले पाहिजे.'**

परिशिष्टात पान २७३ वर 'शारदेच्या सुरस कथा' दिल्या आहेत. यावरून एवढेच कळते की, 'शारदे'च्या प्रयोगामुळे त्या वेळच्या समाजात 'जरठ-कुमारी विवाहाविरुद्ध' चांगलेच काहूर माजलेले होते. खुद्द हरिपूर क्षेत्राजवळील त्या काळचे वृद्ध श्रीमंत गृहस्थ तात्यासाहेब सांगलीकर यांच्या मनावरही या नाटकाने परिणाम केलेला होता. त्यातही महत्त्वाची गोष्ट अशी की या गृहस्थाने 'शारदा' नाटक पाहिलेले नव्हते ! फक्त त्यामधील विषय त्याला माहीत होता !

जसे गडकरी यांचे 'एकच प्याला' नाटक वाचून अथवा पाहून तत्कालीन जन-मनाच्याच नव्हे तर आजच्या वाचकावरदेखील दारूच्या दुष्परिणामांचा पगडा बसलेला आहे ! निदान दारू पिणाऱ्या माणसाला त्याची सुशिक्षित असलेली बायको-देखील गडकऱ्यांच्या 'एकच प्याल्या'ची आठवण करून देते. हे विषयांतर करण्याचे कारण म्हणजे कलाकृती समाजमनात परिवर्तन घडवून आणते किंवा नाही याचे उत्तर देण्याचा प्रयत्न म्हणून नव्हे पण कलाकृती समाजमनावर परिणाम निश्चितपणे घडवून आणते याची जाणीव देण्याचा इथे प्रयत्न आहे.

प्रा. बनहट्टींचे 'नाटचाचार्य देवल' वाचताना आपोआपच त्या काळाचे चित्रण झालेले आहे, त्यावरून तत्कालीन नाटचकृतींच्या यशापयशांचे मूल्यमापन सहजपणे होऊ शकते. इतकेच नव्हे तर काळाला भेदून एखाद्या तीरासारख्या काही नाटच-कृती आजच्या काळातही येऊन पोहोचलेल्या दिसतात. यामागील रहस्य उकलण्यास बनहट्टींच्या या ग्रंथाचा चांगलाच उपयोग होतो. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाचा भेद करून जसे एखादे आकाशयान गतिमान होते तसेच काही कलाकृतींचेही असते. या कलाकृती आपल्या वेळच्या सामाजिक गुरुत्वाकर्षणाचा भेद करून मुक्तपणे स्वतःचे दर्शन घडवीत असतात.

कालिदास–शेक्स्पीअरची नाटके, बाणभट्टाची कादंबरी तसेच आण्णा किर्लोस्कर–देवलांची नाटके या, मी वर सांगितलेल्या निकषांवर उतरलेल्या दिसतात. यातही पुन्हा आणखी एक भेद असा करता येतो, तो असा की कालिदास, शेक्स्पीअर, किर्लोस्कर आणि देवल यांच्या अनेक नाटकांपैकी शाकुंतल, हॅम्लेट, सौभद्र आणि शारदाच केवळ काळाच्या कसोटीस उतरलेल्या कलाकृती आहेत असे म्हणावे लागते. याचे रहस्य तरी काय आहे ? प्रा. श्री. ना. बनहट्टींनी आपल्या चरित्र-नायकाच्या कलाकृतींच्या संदर्भात वरील प्रश्न उपस्थित केला असता आणि त्याचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला असता तर या चरित्रग्रंथाचे मोल आणखी वाढले असते. देवलांचे जीवनकार्य शोधण्याचा बनहट्टींचा प्रयत्न स्तुत्य आहे इतकेच नव्हे तर अशा चरित्रलेखनाच्या यशाला तो प्रयत्न अत्यंत आवश्यक आहे.

'शारदा' नाटकावर इंग्रजी नाटचकलेचा प्रभाव कसा पडलेला आहे याचे विश्लेषण करताना बनहट्टी म्हणतात, "देवलांच्या रचनाकौशल्याची पूर्ण आणि खुली कसोटी 'शारदा'मध्ये लागली. तिला ते उत्तम रीतीने उतरले. 'शारदाची

रचना संस्कृत नाटयाच्या धर्तीवर केलेली आहे,' असे काही टीकाकारांनी म्हटले आहे. खरी गोष्ट ही आहे की इंग्रजी नाटयकलेचा चांगला व्यासंग असलेल्या गृहस्थाखेरीज इतर कोणाच्या हातून 'शारदा' नाटक रचले जाणे शक्य नव्हते. वास्तविक इंग्रजी नाटयरचनेची कला आणि संस्कृतातील नाटयरचनेची कला यांमध्ये जमीन–अस्मानाचा किंवा मूलगामी फरक आहे असे नाही; पण शारदेच्या कथानकाची गुंफण, विषयाच्या उपन्यासाची तऱ्हा, सुष्टदुष्ट पक्ष अशी मांडणी आणि त्यांच्यातील संघर्षनिकराच्या बिंदूपर्यंत चढवीत नेणारी रचना, इत्यादी गोष्टी इंग्रजी नाटयकलेचा प्रभाव स्पष्टपणे दर्शवितात."

## इंग्रजी नाटयकलेचा प्रभाव

शेवटी ते म्हणतात की देवलांच्या शारदेवर इंग्रजी नाटयकलेचा प्रभाव दिसून येतो याचे कारण इंग्रजी नाटय त्यांच्या बुद्धीत व्यासंगाने मुरलेले होते. मात्र माझ्या मते ही गोष्ट केवळ देवल यांच्याच बाबतीत खरी आहे असे नाही तर मराठीतील यच्चयावत नाटकांवर इंग्रजी नाटयकलेचीच नव्हे तर इंग्रजी विचारांचीदेखील छाप पडलेली आहे. पूर्वीच्या बऱ्याचशा नाटकांच्या बाबतीत ही गोष्ट सहजतेने आपल्या लक्षात येत नाही याचे कारण पूर्वीच्या नाटककारांनी आपल्या नाटकासाठी जे विषय निवडले ते बहुतांशाने संस्कृत वाङमयातील कथांवर अथवा रामायण महाभारतांमधील कथांवर आधारलेले आहेत. आजचे मराठीतील नाटककार जेव्हा सामाजिक विषयांवर नाटके लिहितात तेव्हा एक तर ती चक्क विलायती नाटकांवर आधारलेली असतात, नाही तर अनुवादित तरी असतात. जिथे असे काही उघड उघड कबूल केलेले नसते अशा नाटकांच्या बाबतीतील चोरी पुढे उघड होते इतकेच !

मात्र याचा अर्थ असा नव्हे की मराठीतील सर्वच नाटके परतंत्र असतात ! परंतु 'ज्योत्स्ना आणि ज्योती' सारखी जी नाटके स्वतंत्र असतात तिला फारसे व्यावहारिक यश मिळत नाही.

मराठी नाटककारांचा आणि मराठी नाटकांचा असा सर्वगामी इतिहास लिहिला जाणे म्हणूनच फार आवश्यक आहे. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी 'नाटयाचार्य देवल' हा ग्रंथ लिहून वाचकांच्या मनाला वरील विचारांची जणू चालनाच दिलेली आहे. एवढा हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. ¤

**नाटयाचार्य देवल, लेखक : श्री. ना. बनहट्टी, प्रकाशक श्री. ना. बनहट्टी : किंमत आठ रुपये : पृ. ३२० (डेमी)**


शेतीसाठीं
महाराष्ट्र बँक सहाय्य करते.
आपल्या नजिकच्या शाखेस भेट द्या
दि बँक ऑफ
महाराष्ट्र लि.
११९ शाखासह आपल्या सेवेस सिद्ध
खते
बीयाणे

# व्होल्गा जेव्हां लाल होते

१ मार्च १९२१ रोजी क्रोन्स्टाट येथील खलाशांनी लेनिनविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला.

याच खलाशांनी १९१७ च्या जुलैमध्ये केरेन्स्की राजवटीविरुद्ध उठाव केला होता आणि नोव्हेंबरमध्ये विंटर पॅलेसवर हल्ला चढवून लेनिनची बोल्शेव्हिक क्रांती यशस्वी केली होती. जनरल युडेनेचच्या सैन्याने पेट्रोग्राडच्या रोखाने धडक घेताच याच खलाशांनी सोव्हिएट राजवटीच्या संरक्षणासाठी आपल्या छातीचा कोट उभा केला होता. आणि हेच खलाशी आता लेनिनविरुद्ध चवताळून उभे ठाकले होते.

क्रोनस्टाट येथे उभ्या असलेल्या जहाजांवरील पंधरा हजार खलाशांनी सभा भरवून सर्व समाजवादी पक्षांना भाषण-मुद्रण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे अशी मागणी केली. सोव्हिएटच्या ताबडतोब निवडणुका घ्याव्यात आणि त्याही गुप्त मतदान पद्धतीने, कामगार आणि शेतकरी यांना संघटना-स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, पायदळ आणि नौदल यातील कम्युनिस्ट पक्षाची हस्तकयंत्रणा रद्द करावी, धान्य जप्त करणारी पथके विसर्जित करण्यात यावीत आणि अन्नधान्याचा खुला व्यापार सुरू व्हावयास हवा अशा या खलाशांच्या इतर मागण्या होत्या.



# १० वि. स. वाळिंबे

बोल्शेव्हिक राजवट प्रस्थापित झाल्यापासून सर्वसामान्य रशियन नागरिकांची इतकी दुरवस्था झाली होती की ठिकठिकाणी या राजवटीविरुद्ध निदर्शने आणि दंगली चालूच होत्या. क्रोन्स्टाट येथील खलाशांचे बंड या संतप्त मनःस्थितीचा प्रखर उद्रेक होता. या नव्या यादवी युद्धात कोणत्याही परकीय सत्तेचा हात नव्हता. श्वेतसेनेचा १९१९ च्या हिवाळ्यात निर्णायक पराभव झाल्यानंतर बोल्शेव्हिक राजवटीला परकीय हस्तक्षेपाचे भय उरलेले नव्हते.

१९१९ आणि १९२० या दोन वर्षांत दुष्काळ, रोगराई, थंडी आदी कारणांमुळे जवळ जवळ नव्वद लाख रशियन नागरिक मृत्युमुखी पडले होते. यादवी युद्धात बळी पडलेल्यांच्या संख्या जमेस धरता या दोन वर्षांतील मनुष्यहानीचा आकडा जवळ जवळ एक कोटीच्या घरात गेला होता. रशियन कामगारांच्या दैन्यावस्थेला पारावार उरला नव्हता. औद्योगिक उत्पादन एवढे मंदावले होते की सर्वच जीवनावश्यक वस्तूंची वाढती चणचण जाणवत होती. अन्नधान्य आणि कापड यांच्या किमती इतक्या चढल्या होत्या की सर्वसामान्य नागरिकावर उपासमारीची आणि पुरेशा कपड्या-अभावी थंडीत कुडकुडत बसण्याची पाळी आलेली होती. कागदी चलनाची

सामर्थ्यशाली लालसेनेने क्रोस्टाट येथील खलाशांचा उठाव अखेर मोडून काढला. या नंतर मात्र रशियन जनतेचा आवाज बंद जो झाला तो कायमचाच. लेनिनची पोलादी पकड आता घट्ट झाली होती.

किंमत प्रतिदिनी घसरत होती. १९२१ च्या जानेवारीमध्ये पंचवीस हजार कागदी रूबल्सना सोन्याचा एक रूबल मिळत होता. बेकारीला कंटाळून असंख्य कामगार शहरे सोडून शेती करण्यासाठी खेड्यात जात होते.

शेतकऱ्यांकडून धान्य मिळविण्यासाठी सक्ती केली जात होती. परंतु औद्योगिक उत्पादन मंदावल्यामुळे धान्याच्या बदली शेतकऱ्यांना काय द्यायचे या प्रश्नाने सरकारला भंडावून सोडले होते. त्यामुळे शेतकरी आपल्या गरजेइतकेच धान्य पिकवू लागले. शेतकऱ्यांनी अधिक धान्य पिकविले पाहिजे असा हुकूम निघू लागताच शेतकऱ्यांचे उठाव सुरू झाले. १९२० च्या जुलैमध्ये समारा येथे शेतकऱ्यांचा जो पहिला उठाव झाला त्याचे नेतृत्व लाल सैन्याच्या एका कम्युनिस्ट सेनानीनेच केले होते. समारा येथील शेतकऱ्यांचा उठाव पाहून इतर ठिकाणचे शेतकरीही सरकारी हुकूम धाब्यावर बसवू लागले. धान्य वसुलीसाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांवर हल्ले करून त्यांना परतवून लावण्यासाठी शेतकऱ्यांनी आपापल्या गावासाठी गस्ती पथके उभारली. मध्य रशियातील तांबोव्ह प्रांतामध्ये शेतकऱ्यांच्या उठावाने इतके गंभीर स्वरूप धारण केले की त्याचा बीमोड करण्यासाठी लेनिनला लाल सैन्याची आणि 'चेका' पोलिसांची खास पथके धाडावी लागली. एवढे करूनही शेतकरी नमत नाहीत असे आढळून आल्यानंतर १४ फेब्रुवारी १९२१ रोजी लेनिनला या भागातील धान्य वसुलीचा आपला पहिला हुकूम रद्द करावा लागला.

शेतकरी वर्ग सरकारला धाब्यावर बसवीत आहे हे पाहिल्यानंतर शहरातील कामगारवर्गालाही उठावाची प्रेरणा मिळाली. या हादऱ्यांमुळे कम्युनिस्ट पक्षालाही तडे जाऊ लागले. श्लिआपनिकोव्ह आणि अॅलेक्झांड्रा कोलोन्ताय यांसारखे लेनिनचे सहकारीही या उठावांना उत्तेजन देऊ लागले. २४ फेब्रुवारी १९२१ रोजी तर सरकारी कारखान्यातील कामगार संपावर गेले. कामगारवर्गाचे हे निदर्शन ठेचून काढण्यासाठी लेनिनने या सरकारी कारखान्यांच्या परिसरात लष्करी कायदा जारी केला. संपावर गेलेल्या कामगारांची सामुदायिक धरपकड सुरू झाली. एवढे अनेक उपाय योजले जात असतानाही रशियन कामगारवर्ग सरकारपुढे नमला नाही. सरकारने लष्करी कायदा पुकारताच या कामगारवर्गातर्फे जाहीर करण्यात आलेल्या पत्रकात म्हटले होते– 'सरकारच्या धोरणात आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. कामगारांना आणि शेतकऱ्यांना स्वातंत्र्य मिळाले पाहिजे ही आमची पहिली आणि सर्वांत महत्त्वाची मागणी आहे. बोलशेव्हिक सरकारच्या हुकमांच्या चौकटीत स्वतःला डांबून घेणे कामगारवर्गाला बिलकूल मंजूर नाही. आपले भवितव्य आपणच ठरविले पाहिजे असे प्रत्येक कामगाराला वाटते. सर्व कामगारांची मुक्तता होईपर्यंत आणि लष्करी कायदा रद्द होईपर्यंत कामगारांचा लढा चालूच राहील. भाषण, मुद्रण आणि संघटना स्वातंत्र्यप्राप्त होईपर्यंत कामगारवर्ग स्वस्थ बसणार नाही.'

एके काळी ' चिरस्थायी शांतता, पुरेसे अन्नधान्य आणि पुरेशी जमीन ' या लेनिनच्या घोषवाक्यामुळे त्याच्याभोवती जमलेले सैनिक, कामगार आणि शेतकरी बोल्शेव्हिक राजवटीच्या तीन वर्षांच्या अनुभवानंतर लेनिनची राजवट खाली खेचण्यासाठी अधीर झाले होते.

पेट्रोग्राड आपल्या हातातून जाते की काय अशी झिनोव्हेव्हला भीती वाटू लागली आणि म्हणून त्याने पेट्रोग्राडमधल्या प्रत्येक पुलावर लष्करी पहारा बसविला. क्रोन्स्टाट बेटावर जाणारे सर्व पूल रोखून धरण्यात आले आहेत असे आढळून आल्यानंतर कामगार नदीच्या बर्फमय पृष्ठभागावरून क्रोन्स्टाटकडे जाऊ लागले.

लेनिनच्या राजवटीला संतप्त लोकमानसाची धग जाणवू लागली होती.

पेट्रोग्राडमधील परिस्थिती आपल्या आटोक्याबाहेर जात आहे याचा अंदाज आल्यानंतर झिनोव्हेव्हने लेनिन आणि ट्रॉटस्की यांना तारा करून लष्करातील सैन्य तातडतोब पेट्रोग्राडला पाठविण्याची मागणी केली. झिनोव्हेव्हची तार मिळताच ट्रॉटस्कीने जनरल तुखाचेव्हस्की याला पेट्रोग्राडला रवाना केले. केवळ लष्करी बळावर पेट्रोग्राडमधील उठावाचा बंदोबस्त करता येणार नाही हे लेनिनला माहीत होते आणि म्हणून त्याने क्रोन्स्टाट येथील खलाश्यांशी वाटाघाटी करण्यासाठी मिखाईल कालिनिन याला तिकडे धाडले. कालिनिनने क्रोन्स्टाट बेटावर जाऊन खलाश्यांची बैठक बोलाविली. ' खलाशांनी संतापून जाऊन कोणतेही अविचारी कृत्य करू नये ' हे शब्द कालिनिनने उच्चारताच खलाश्यांनी एकच आरडाओरडा सुरू केला.

खलाशी त्याला विचारू लागले, ' खेडेगावात राहणाऱ्या आमच्या बांधवांना का ठार मारण्यात येत आहे याचा खुलासा झाला पाहिजे. तुमचं ठीक आहे. सगळे मंत्री राजवाड्यामध्ये मोठ्या चैनीत राहात आहेत. आमची दुःखं, आमचे हाल तुम्हाला कसे समजणार ?'

कालिनिनच्या शेजारी उभ्या असलेल्या सेनाधिकाऱ्याला खलाशांनी उचलून दूर ठेवले आणि आपल्या एका सहकाऱ्याला व्यासपीठावर आणून उभे केले. आपल्या हातातील टोपी हलवीत तो खलाशी म्हणाला, ' बांधवहो, जरा डोळे उघडून नीट पाहा म्हणजे आपली किती फसवणूक करण्यात आली आहे हे तुम्हांला कळून येईल. कम्युनिस्ट नेत्यांनी गोड गोड आश्वासनं देऊन आपल्याला कोणत्या मृगजळाच्या मागे धावायला लावलं हे आता तरी समजून घ्या. या कम्युनिस्टांनी स्वतःची घरं तेवढी भरली आहेत. मीही एके काळी कम्युनिस्ट होतो आणि म्हणून मी काय सांगतो याकडे नीट लक्ष द्या. कामगाराविरुद्ध शेतकऱ्याला आणि शेतकऱ्याविरुद्ध कामगाराला झुंजविणाऱ्या या कम्युनिस्टांच्या काव्याला आपण यापुढे बळी पडता कामा नये. आतापर्यंत आपल्या बांधवांचं काही कमी

शिरकाण झालेलं नाही. बस्स. झालं एवढं खूप झालं. आता तरी आपण कम्युनिस्टांविरुद्ध लढायला उभं राहायला हवं.'

इतर खलाशांनी टाळ्या वाजवून आपल्या सहकाऱ्याच्या भाषणाचे स्वागत केले. एवढ्यात पेट्रेचेन्को या खलाश्याने व्यासपीठावर उडी मारून कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या हत्याकांडाला जबाबदार असलेल्या कम्युनिस्ट राजवटीचा धिक्कार करणाऱ्या घोषणा करावयास प्रारंभ केला. पेट्रेचेन्को म्हणाला, 'या कम्युनिस्ट राजवटीने आपल्या स्वतःच्या संरक्षणासाठी झारशाहीच्या काळातल्या सेनाधिकाऱ्यांना मोठमोठ्या हुद्द्यांवर नेमलं आहे.' एवढे बोलून पेट्रेचेन्कोने सोव्हिएट हुकूमशाहीला खलाशांचा विरोध आहे अशा आशयाचा ठराव मांडला. सर्व खलाश्यांनी हात वर करून हा ठराव आपल्याला संमत असल्याचे जाहीर केले.

हा सारा प्रकार पाहून कालिनिन भयभीत झाला होता. एवढ्यात 'पकडा त्याला ' असा खलाश्यांनी एकच गिल्ला केला. हे पाहून कालिनिनने तेथून पोबारा केला.

क्रोन्स्टाटच्या खलाश्यांनी कालिनिनची फजिती केल्याचे पाहून लेनिन संतापला नसता तरच नवल. त्याने २ मार्च रोजी एक पत्रक प्रसिद्ध करून क्रोन्स्टाट येथील खलाशी जुन्या झारशाहीतील सेनाधिकाऱ्यांचे हस्तक असल्याचा आरोप केला. ज्यांना रशियात सोव्हिएट राजवट स्थापन झालेली पाहावत नाही अशा राष्ट्रांकडून या खलाश्यांना चिथावणी मिळत असल्याचे ट्रॉटस्कीने सांगितले. कसेही करून या खलाश्यांना बदनाम केले पाहिजे या विचाराने लेनिन–ट्रॉटस्की यांनी प्रचाराची ही दिशा स्वीकारली होती.

पेट्रोग्राडला वेढा घालून सरकारविरोधी निदर्शने मोडून काढा असा झिनोव्हेव्हने लाल सेनेला आदेश दिला. लागलीच सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी व मेन्शेव्हिक पक्षांच्या कार्यकर्त्यांची धरपकड सुरू झाली. खलाश्यांच्या निदर्शनांचा फायदा घेऊन आपल्या उरल्यासुरल्या विरोधकांना नष्ट करण्याच्या कारवाया चालू असताना, कामगारांना शांत करण्यासाठी कम्युनिस्ट राजवटीने कामगारांच्या अन्नधान्याच्या परिमाणात वाढ केली.

तरीदेखील क्रोन्स्टाट येथील खलाशी शांत झाले नव्हते.

५ मार्च १९२१ रोजी त्यांनी क्रांतिवादी समिती स्थापन केली. या समितीत नऊ खलाशी, चार कामगार, एक कारकून व एक शिक्षक या पंधराजणांचा समावेश करण्यात आला होता. या समितीचे नेतृत्व पेट्रेचेन्को याने स्वीकारले. पेट्रेचेन्कोच्या बंडाचा बीमोड करण्यासाठी जनरल तुखाचेव्हस्की मॉस्कोहून पेट्रोग्राडला आलेला होता. त्याने क्रोन्स्टाटच्या खलाश्यांना उद्देशून ट्रॉटस्कीने काढलेला हुकूम वाचून दाखविला. या हुकमात म्हटले होते, ' क्रोन्स्टाटमधील बंडखोरांनो, तुम्ही सर्वांनी आपली शस्त्रे खाली ठेवून क्रोन्स्टाट बंदरात उभी असलेली जहाजे सोव्हिएट

सरकारच्या स्वाधीन केली पाहिजेत. जे कोणी हा हुकूम मानणार नाहीत त्यांना अटक करून सोव्हिएट अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करा. जे खलाशी बिनशर्त शरण येतील त्यांनाच आम्ही दया दाखवू. अद्यापही ज्यांना बंडाची खुमखुमी असेल त्यांचा विनाश करण्याचा आम्ही सेनेस हुकूम दिलेला आहे. यामुळे येथे जर काही रक्तपात झाला तर त्याची जबाबदारी बंडखोरांवर राहील हे लोकांनी ध्यानात घ्यावे. हा शेवटचा इशारा आहे. यानंतर पुन्हा कोणतेही आवाहन न करता सरळ लष्करी कारवाई केली जाईल.'

या हुकमाखाली ट्रॉटस्कीने सोव्हिएट प्रजासत्ताकाच्या क्रांतिकारी लष्करी समितीचा अध्यक्ष म्हणून स्वाक्षरी केली होती.

ट्रॉटस्कीचा हा निर्वाणीचा इशारा ऐकल्यानंतर क्रोन्स्टाट बंदरात उभ्या असलेल्या जहाजावरील अधिकाऱ्यांनी खलाश्यांना सांगितले–' जर सोव्हिएट सरकारविरुद्ध तुम्हांला लढा द्यायचा असेल तर तो आताच करा. आता जर का उशीर झाला तर तुम्ही ही लढाई हरलात म्हणून समजा. ' परंतु अधिकाऱ्यांचा हा सल्ला खलाश्यांना मान्य झाला नाही. ते म्हणाले, ' आम्हाला अकारण रक्तपात करायचा नाही. जर ट्रॉटस्कीनं आपली धमकी प्रत्यक्षात उतरविण्याचं ठरविलं तर आम्ही आमच्या संरक्षणाची सारी व्यवस्था केली आहे. ट्रॉटस्की काय करतो ते पाहू या.'

पण ट्रॉटस्की आता थांबायला तयार नव्हता. जर बंडखोर शरण येत नसतील तर त्यांना धडाधड गोळ्या घाला असे त्याने तुखाचेव्हस्की याला सांगितले. ट्रॉटस्कीचा हा हुकूम ऐकूनही खलाशी शरण यायला तयार नव्हते. ६ मार्च रोजी तुखाचेव्हस्कीची विमाने फिनलंडच्या आखातावर घिरट्या घालून क्रोन्स्टाटवरील खलाश्यांवर बॉम्बवर्षाव करू लागली.

आणखी दोन-तीन आठवड्यांच्या आत बर्फ वितळायला लागेल आणि मग क्रोन्स्टाटवर चालून जाणे शक्य होणार नाही हे ट्रॉटस्की आणि तुखाचेव्हस्की यांना माहीत होते. इतकेच नव्हे तर बर्फ वितळताच क्रोन्स्टाट येथील युद्धनौका पेट्रोग्राडपर्यंत येऊन आग ओकू लागतील हाही धोका त्यांना स्पष्ट दिसत होता. ७ मार्चपासून तुखाचेव्हस्कीचा तोफखाना क्रोन्स्टाटवर मारा करू लागला. तुखाचेव्हस्कीचा पहिला गोळा क्रोन्स्टाटवर पडताच तेथल्या क्रांतिवादी समितीने साऱ्या जगाला उद्देशून आपली भूमिका विशद केली. पेट्रेचेन्कोने म्हटले होते, ' बोल्शेव्हिक राजवटीने आमच्यावर हल्ला चढविला आहे. सोव्हिएटची खरीखुरी सत्ता प्रस्थापित व्हावी या एकाच हेतूने क्रोन्स्टाटने कम्युनिस्ट सरकारविरुद्ध बंड पुकारले असून कामगारांच्या हिताचा पुकारा करणाऱ्या ट्रॉटस्कीनं आपले रक्तपिपासू हात आमच्याभोवती पसरण्यास प्रारंभ केला आहे. श्रमिक जनतेच्या हितासाठी आम्ही शेवटपर्यंत लढणार आहोत. या लढाईत एक तर आम्ही विजयी होऊ किंवा क्रोन्स्टाटबरोबर आम्हीही नष्ट होऊन जाऊ.'

ट्रॉटस्कीच्या निर्वाणीच्या इशाऱ्याची मुदत टळून जाताच तुखाचेव्हस्कीने आपल्या साठ हजार सैन्याला क्रोन्स्टाटवर चालून जाण्याचा हुकूम दिला.

पांढऱ्या शुभ्र वेशातील कम्युनिस्ट सैन्य बर्फ तुडवीत क्रोन्स्टाटच्या रोखाने निघाले. या सैन्याच्या मागोमाग मशिनगन घेतलेले 'चेका' चे पोलिस वाटचाल करीत होते. क्रोन्स्टाट बंदरात उभ्या असलेल्या जहाजावरून तुखाचेव्हस्कीच्या सैन्यावर तोफगोळे आदळू लागले. क्रोन्स्टाट येथल्या खलाश्यांनी अशा काही निर्धाराने प्रतिकार सुरू केला होता की त्यापुढे तुखाचेव्हस्कीच्या सेनेची मात्रा चालेना. कोणताही सैनिक पुढे जाण्यास तयार होईना. तेव्हा तुखाचेव्हस्की म्हणाला, 'कम्युनिस्ट पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी इथं येऊन आपल्या सैनिकांना धीर दिला तरच ही चढाई यशस्वी होईल.'

या वेळी मॉस्को येथे कम्युनिस्ट पक्षाची दहावी परिषद सुरू होती. तुखाचेव्हस्कीचा निरोप येताच या परिषदेला आलेले तीनशे कम्युनिस्ट कार्यकर्ते पेट्रोग्राडकडे निघाले. या कार्यकर्त्यांना निरोप देताना लेनिन म्हणाला,' क्रोन्स्टाट येथे आता नेमकी परिस्थिती कशी आहे हे मला माहीत नसलं तरी हे बंड काही दिवसांच्या आतच मोडले जाईल या विषयी मला खात्री आहे.'

१६ मार्चपासून तुखाचेव्हस्कीने पुन्हा चढाईला प्रारंभ केला. आपल्या तोफदलाच्या माऱ्याला क्रोन्स्टाट दाद देत नाही हे पाहिल्यानंतर दुसऱ्या दिवशी तुखाचेव्हस्की याने विमानातून क्रोन्स्टाटच्या किल्ल्यावर बॉम्बची वृष्टी केली.

ट्रॉटस्कीने आपला शब्द खरा करून दाखविला होता. दोन दिवसांच्या अवधीत त्याने अक्षरश: हजारो खलाश्यांना ठार केले होते.

क्रोन्स्टाट येथील हत्याकांडाबद्दल लिहिताना तुखाचेव्हस्की म्हणतो, 'मी पाच वर्षे युद्धाच्या धामधुमीत ऐन आघाडीवर होतो. परंतु अशा तऱ्हेचे हत्याकांड तेव्हा मी कधीच पाहिलं नव्हतं. ही लढाई नव्हती. हा शुद्ध नरक होता. क्रोन्स्टाटवरचे खलाशी खूप शर्थीनं लढले. त्यांना एवढी शक्ती कोठून आली होती हेच मला कळत नाही. क्रोन्स्टाटवरचे प्रत्येक घर लढत होते. एक घर ताब्यात घ्यायला आमच्या शंभर सैनिकांना बरोबर एक तास लागला. आम्ही त्या घरात प्रवेश केला तेव्हा तेथे अवघे दोन–तीनच खलाशी असलेले आम्हांला आढळले. मशिनगन बंद पडल्यामुळे त्यांचा निरुपाय झाला होता. त्यांच्या अंगावर अनेक जखमा झाल्या होत्या. तशाही परिस्थितीत आमचे सनिक आत शिरताच त्या खलाश्यांनी खिशातून पिस्तूल काढून 'थांबा बदमाषांनो, आम्ही तुमचा समाचार घेतो,' असे त्वेषाचे उद्‌गार काढून आमच्या सैनिकांच्या रोखाने झेप घेतली.'

क्रोन्स्टाट येथील खलाश्यांचा हा अतुल पराक्रम पाहून तुखाचेव्हस्कीसारख्या अनुभवी सेनाधिकाऱ्यालाही थक्क व्हावे लागले.

१७ मार्च रोजी तुखाचेव्हस्की याने लेनिनला कळविले– 'क्रोन्स्टाट आता शांत झाले आहे. तेथले जवळ जवळ सर्व खलाशी ठार झाले आहेत.' जे काही खलाशी वाचले होते त्यातील फारच थोड्या जणांना फिनलंडमध्ये पळून जाण्याइतकी सवड मिळाली. उरलेल्यांना समोर उभे करून 'चेंका'च्या पोलिसांनी गोळ्या घालून ठार केले. ज्यांनी गयावया केली त्यांची दूरवरच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली.

क्रोन्स्टाट येथील झुंजार खलाश्यांचा निःपात करण्यात लेनिनला यश लाभले असले तरी आपल्या राजवटीविरुद्धच्या या प्रखर सशस्त्र उठावाने त्याला एक घडा शिकविला. केवळ सामर्थ्याच्या बळावर संतप्त लोकमताची फार उपेक्षा करून चालत नाही हे या हुकूमशहाला कळून चुकले. आपल्याला जर सत्ता टिकवायची असेल तर थोडीशी तडजोड करायलाच हवी, हा विचार सदैव आपल्याच तंद्रीत वावरत असलेल्या लेनिनच्या मनात प्रथमच येत होता.

आपल्या काही सहकाऱ्यांचा विरोध पत्करूनही लेनिनने १९२१ च्या मध्यास आपले नवे आर्थिक धोरण जाहीर केले.

कम्युनिस्ट राजवटीत खाजगी व्यापाराला स्थान नसते असे तो १९१८ मध्ये मानत होता. १९२१ मध्ये त्याचे हे मत बदलले होते. रशियाची ढासळलेली अर्थव्यवस्था सावरण्यासाठी खाजगी व्यापार आवश्यक आहे अशी भाषा १९२१ मध्ये त्याच्या तोंडून निघत होती. शेतकऱ्यांचा मालकी हक्क त्याला मान्य करावा लागला. आपले हे नवीन आर्थिक धोरण जाहीर करून लेनिनने शेतकऱ्यांची मागणी मान्य केली आणि अशा रीतीने प्रथमच त्याने मतांत बदल करून ग्रामीण भागातील यादवी युद्धाचा अंत घडवून आणला.

कम्युनिस्ट पक्षाच्या दहाव्या परिषदेत बोलताना लेनिन म्हणाला, 'आपल्या राजवटीविरुद्ध चिडलेल्या शेतकऱ्यांच्या मागण्या आपण मान्य करावयास हव्यात. एक तर शेतकऱ्यानं काय पिकवावे याबद्दल आपण त्याला स्वातंत्र्य द्यायला हवं. दुसरी गोष्ट अशी की शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या वस्तू त्यांना मिळतील अशीही आपण तरतूद करायला हवी.'

कम्युनिस्ट सिद्धान्ताच्या आग्रहापेक्षा उत्पादनवाढ हेच लेनिनच्या नव्या आर्थिक धोरणाचे प्रमुख सूत्र होते. १९२१ च्या ऑक्टोबरमध्ये मॉस्कोतील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांपुढे बोलताना तो म्हणाला, 'आताच लोकांवर साम्यवाद लादणं ही घोडचूक ठरणार आहे. आपल्या पहिल्या कल्पना चुकीच्या होत्या हे आजपर्यंतच्या अनुभवावरून आढळून आलेलं आहे. आपले जुने मार्ग चुकीचे होते हेच नव्या आर्थिक धोरणाने सिद्ध केलेले आहे. आता पद्धतशीर माघार घेतली पाहिजे. नाहीतर आपण मार खाऊ. आपण आपल्या शत्रूशी लढताना जेवढे पराभूत झालो नाही तेवढा पराभव आपण आर्थिक आघाडीवर सहन केला आहे. उत्पादन आणि

वाटप या क्षेत्रात आपण कम्युनिस्ट पद्धत अवलंबण्याचा आग्रह धरल्यामुळे आपलं उत्पादन मंदावलं आणि त्यामुळेच गेल्या एप्रिलमध्ये आपल्याला फार मोठ्या आर्थिक आणि राजकीय अरिष्टास तोंड द्यावं लागलं.

खाजगी व्यापाराचे तत्त्व प्रथम शेतीबाबत आणि नंतर छोट्या उद्योगधंद्याबाबत लागू करावे असे लेनिनने ठरविले. अवजड उद्योगधंदे, वाहतूक आणि आयातनिर्यात व्यापार सरकारच्याच हाती असावयास हवा असा त्याचा आग्रह होता. अशा तऱ्हेच्या संमिश्र अर्थव्यवस्थेमुळे मांडवलशाहीचा धोका टाळणे सहज शक्य होईल हे त्याला माहीत होते.

आणि म्हणूनच लेनिनने आपल्या नव्या आर्थिक धोरणाचे नामकरण केले—'सरकारी भांडवलशाही'

'सरकारी भांडवलशाही'चे समर्थन करताना लेनिन म्हणतो, 'सर्व उद्योग-व्यवसायांचे सरकारीकरण करून आपण पहिल्या उत्साहाच्या भरात साम्यवाद साकार करण्याचा प्रयत्न केला. परंतु तसं करणं चूक होतं हे आता अनुभवावरून कळून चुकलं आहे. प्रथम सरकारी भांडवलशाही, त्यानंतर समाजवाद अशाच मार्गाने आपल्याला साम्यवादाकडे जाता येईल.

आपल्या नव्या आर्थिक धोरणामुळे रशिया समाजवादाच्या रोखाने प्रवास करीत आहे अशी लेनिनची खात्री होती. तो म्हणाला, 'समाजवाद आता फार दूर राहिलेला नाही. आपल्या मार्गात अनेक अडचणी येतील ही गोष्ट खरी असली तरी काही वर्षांच्या आतच नव्या आर्थिक धोरणामुळे आपण समाजवादी रशिया निर्माण करू शकू याविषयी मला किंचितही शंका नाही.'

परंतु वर्षभरानंतर लेनिन समाजवादी रशियासंबंधी पहिल्याइतका आत्म-विश्वासाने बोलत नव्हता हे ध्यानात घेण्याजोगे आहे. नव्या आर्थिक धोरणाच्या प्रारंभीच्या अनुभवानंतर बोलताना तो म्हणाला, अद्याप आपण समाजवादी अर्थ-व्यवस्थेचा पाया घातलेला नाही. मरू घातलेली भांडवलशाही पुन्हा आपलं डोकं वर काढणारच नाही असं सांगता येत नाही ही गोष्ट आपण मोकळेपणानं मान्य करायला हवी. केवळ भलत्या भ्रमात वावरणं अधिक धोकादायक असते. मात्र त्या-मुळें आपण निराश व्हायचं कारण नाही; कारण अखेरीस समाजवादच विजयी होणार आहे याबद्दल कोणीही शंकाकुल राहण्याचे कारण नाही.'

१९२१ च्या उन्हाळ्यात कॉमिटर्नची तिसरी परिषद भरली असताना लेनिनने सांगितले—'आंतरराष्ट्रीय क्रांतीच्या रोखानं आपण प्रगती करीत असलो तरी या प्रगतीचा वेग अपेक्षेइतका नाही हे मान्य करायला हवं. कारण जगात इतरही शक्ती कार्य करीतच असतात. त्यामुळे काही वेळेला सरळ रस्त्यानं न जाता इतिहासाच्या नागमोडी वळणावरूनच आपल्याला वाटचाल करावी लागते.'

नवे आर्थिक धोरण जाहीर करण्यात लेनिनला थोडासा उशीर झाला होता. त्या-मुळे त्याला १९२१ मधला दुष्काळ टाळता आला नाही. रशियातील अडीच

कोटी लोक उपासमारीच्या तडाख्यात सापडले असल्याची 'प्रावदा'नेच आपल्या २६ जून १९२१ च्या अंकात कबुली दिलेली आहे. या काळात रशियाने अमेरिकेकडून बरीच धान्यमदत घेतली. तरीदेखील १९२१ व १९२२ या दोन वर्षांत पन्नास लाख रशियन नागरिक उपासमारीमुळे मरण पावले.

शेतकऱ्यांची बंडे, कामगारांचे संप आणि क्रोन्स्टाट येथील खलाशयांचा उठाव यामुळे लेनिनने आपल्या आर्थिक धोरणात बदल केले असले तरी त्याचे राजकीय धोरण मात्र किंचितही बदलले नाही. उलटपक्षी शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या उठावांचा फायदा घेऊन त्याने आपले उरलेसुरले राजकीय प्रतिस्पर्धी नष्ट करून टाकले. आपल्या या कृत्याचे समर्थन करताना लेनिन लिहितो– 'कम्युनिस्ट राजवटीला विरोध करणाऱ्याना तुरुंगाशिवाय दुसरी जागा देता येत नाही. जोपर्यंत राजकीय विरोधक अस्तित्वात आहेत तोपर्यंत दहशतवाद हेच कम्युनिस्ट राजवटीचे मुख्य सूत्र असते.


कामगारांना स्वातंत्र्य देता कामा नये हा लेनिनचा आग्रह शेवटपर्यंत कायम होता. कम्युनिस्ट पक्ष यंत्रणेचा एक भाग म्हणूनच कामगार संघटनांनी वावरले पाहिजे असे तो वारंवार प्रतिपादन करीत असे. कामगार संघटनांमध्ये कम्युनिस्टांशिवाय इतर कोणालाही प्रवेश मिळता कामा नये यासंबंधी दक्षता बाळगा असे तो आपल्या कार्यकर्त्यांना बजावत होता. आपला हा उद्देश सफल व्हावा म्हणून त्याने कामगारांच्या स्वतंत्र सहकारी संघटना नष्ट करून टाकल्या.

केवळ आपल्या पक्षातील लोकच तेवढे अधिकारावर राहावयास हवेत या आग्रहापायी लेनिनने साऱ्या देशभर हेरांचे जाळे पसरून कोण काय करीत आहे याची तपशीलवार बातमी मिळविण्याची व्यवस्था केली होती. झारशाहीच्या काळातल्या 'ओखराना' पेक्षाही लेनिनची 'चेका' ही संघटना सर्वांच्या हालचालीवर गुप्त पाळत ठेवत होती. जो कोणी लेनिनच्या धोरणाविरुद्ध शब्द उच्चारील त्याची मुस्कटदाबी करण्याची जय्यत व्यवस्था करण्यात आली होती. वृत्तपत्रे, नभोवाणी, चित्रपट, नाटके – सर्व काही सरकारी प्रचारासाठीच राबविण्याचा कम्युनिस्ट राज्यकर्त्यांचा अट्टाहास सुरू होता. झारच्या काळात नव्हते एवढे राजबंदी म्युनिस्टांच्या तुरुंगात खितपत पडले होते, अमानुष छळ सहन करीत होते.

माणसाच्या स्वातंत्र्यावर प्रहार करणाऱ्या सर्वंकष कम्युनिस्ट हुकूमशाहीला विरोध करणारा रशियन जनतेचा शेवटचा प्रयत्न म्हणून क्रोन्स्टाट येथील उठावाचा उल्लेख करावा लागेल.

क्रोन्स्टाट येथील स्वातंत्र्यप्रिय खलाशी सामर्थ्यशाली लाल सेनेपुढे पराभूत झाले आणि त्यानंतर रशियन जनतेचा आवाज बंद झाला तो कायमचा.

कम्युनिस्ट हुकूमशाहीची रशियावर पोलादी पकड बसविण्याचे कार्य लेनिनने पार पाडले होते. (क्रमशः)




# क्रीडा लेखकांची संघटना

मुंबईनंतर पुण्याने आता एक नवीन उपक्रम चालू केला आहे. १७ मार्च रोजी पुण्यामधील क्रीडाविषयक लिखाण करणाऱ्या खेळाडू, संघटक व लेखकांची एक सभा भरून 'पुणे जिल्हा क्रीडा-लेखकांची संस्था ' अधिकृतरीत्या स्थापन करण्यात आली. या सभेला हरिभाऊ साने, मधू रेगे, बाळ पंडित, एबल डेव्हिड, मीना परांडे, अशोक सिधये असे लेखक, खेळाडू उपस्थित होते. या संस्थेचे संयुक्त चिटणीस म्हणून मधू रेगे व नाना शितोळे, खजिनदार—दा. शं. चासकर, अध्यक्ष— ए. डेव्हिड आणि कार्यकारी सदस्य म्हणून बाळ पंडित व प्रताप पटवर्धन यांची नेमणूक करण्यात आली. या संघटनेचे अस्तित्व कशासाठी आणि कार्य काय हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

आज तीस-बत्तीस खेळ अस्तित्वात आहेत. त्यांचे खेळाडू, कार्यकर्ते, पदाधिकारी आपापल्या कुवतीनुसार काम करीत असतात. त्यांच्या कार्याला प्रसिद्धी मिळणे आवश्यक असते. पण इतक्या खेळांच्या संघटनांना प्रसिद्धी देणे एकटचा-दुकटचा लेखकाचे काम नाही. आणि वृत्तपत्रांत, साप्ताहिकांत, पाक्षिकांत किंवा मासिकांत तितकी संधीही त्यांना मिळू शकत नाही. कुणीतरी लेखक आपल्या आवडीनुसार, अभ्यासानुसार आणि गरजेनुसार क्रीडा-लेखन करीत असतो. त्याला कुणी मार्गदर्शक नसतो. त्याच्या वैयक्तिक गुणांवर आणि विकसित कर्तृत्वावर तो पुढे चाललेला असतो. त्याला विचारांची निश्चित बैठक असतेच असे नाही. त्याला संधी मिळाली तर ठीक नाहीतर त्याची प्रगती खुंटते. क्रीडा-लेखनातून तो नाहीसाही होण्याची शक्यता असते. या सर्व गोष्टी विचारात घेता या संस्थेने जर कार्य केले तर क्रीडा-लेखनात पुष्कळच क्रांती होऊ शकेल असा विश्वास वाटतो.

**म नो ह र रे गे**

या संस्थेच्या स्थापनेने नव्या-जुन्या खेळाडू-लेखकांचा परिचय होईल. जुन्यांची विचारसरणी, त्यांचा अनुभव, त्यांची लिहिण्याची हातोटी नवोदितांना कळू शकेल. बाळ पंडित गेली चौदा वर्षे आकाशवाणीवर क्रिकेटविषयक विचार मांडीत आहेत. उदयोन्मुख लेखकाला जर क्रीडा-वक्तृत्वाकडे वळावयाचे असेल तर त्यांचे मार्गदर्शन त्याला या संस्थेच्या निमित्ताने होऊ शकेल. हरिभाऊ साने कबड्डीच्या गेल्या चाळीस वर्षांचा इतिहास हा खेळ अधिक लोकप्रिय करण्याच्या उद्देशाने इतर लेखकांना सांगू शकतील. 'पूना हेरल्ड' चे संपादक एबल डेव्हिड मी बातमीदाराचा संपादक होताना काय कष्ट घेतले याची उद्बोधक हकीकत देऊ शकतील. मीना परांडे मी अखिल भारतीय टेबल-टेनिसपटू कशी झाले त्यामागचे परिश्रम समजावून देऊ शकतील. क्रिकेटचे तंत्र रसिकांना देताना खेळाडू आणि वाचकांच्या मानसिक प्रवृत्तींना मी कसा उजळा देतो हे मधू रेगे सांगू शकतील. या सर्व हकीकती नव्या अभ्यासकांना अगदी रेडिमेड मिळू शकतील.

सध्या वृत्तपत्रांपासून मासिकांपर्यंत सर्वत्र निरनिराळ्या खेळांची प्रत्यक्ष वर्णने व इतर हकीकती यांना हळूहळू चांगले स्थान मिळत आहे. क्रीडा–विषयक लिखाण दिवसेंदिवस आवश्यक आणि मान्यवर होत आहे. अशा प्रसंगी अधिक लेखक तयार होणे जरुरीचे आहे. काय वाचावे, कसे वाचावे, काय लिहावे आणि कसे लिहावे याचे काही खास तंत्र असते. प्रत्येक लेखकाच्या काही विशिष्ट लकबी, स्वभाव-विशेष असतात. त्यांचे प्रतिबिंब अधिक प्रभावीपणे आणि स्वाभाविकतेने क्रीडा-लेखनात येण्यासाठी ही संस्था उत्तमरीत्या मार्गदर्शन करू शकेल असे वाटते. क्रीडा–लेखकांच्या संघटनेच्या सुरुवातीला बरेच कष्ट आणि दूरदृष्टी ठेवावी लागणार आहे. स्वतंत्र जागा, वाचनालय, वारंवार सभा आणि विचारांची एकत्र देवघेव आणि विशेष म्हणजे विधायक दृष्टिकोनाची भासणारी निकड या संस्थेला करावी लागणार आहे.

महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी यांना बोलावून त्यांच्याशी क्रीडाविषयक चर्चा आणि मुलाखती घेण्याचा कार्यक्रम ही संस्था प्रथम हाती घेणार आहे. ही मोठीच शुभसूचक घटना ठरेल. कारण शिक्षणखात्याच्या अधिकारातच खेळ येतात. श्री. चौधरींचे मार्गदर्शन या संस्थेला चांगले होऊ शकेल.

आज क्रीडा–क्षेत्राला खरी गरज बुद्धिमान आणि निःस्वार्थी पदाधिकाऱ्यांची आहे. कबड्डीपासून क्रिकेटपर्यंत बाजारबुणग्या कार्यकर्त्यांचे पेव फुटलेले आढळते. तिथे अनेक राजकारणे खेळली जातात. निरनिराळे वाईट मार्ग चोखाळले जातात. बुद्धिमत्तेने जाणारे निरपेक्ष व्यक्तिमत्त्व तिथे थांबूच शकत नाही. अशा लोकांना हुडकून काढून त्यांना क्रीडा–क्षितिजावर आणणे आणि त्यांच्या कार्याचे कौतुक करणे, त्याचप्रमाणे वाईट प्रवृत्तींशी झगडत राहून त्यांना नामोहरम करणे हे काम फक्त क्रीडालेखकांचे आहे. ही संस्था ते काम ईर्षेने आणि हिरिरीने करील असा मला भरवसा वाटतो.

३० मार्च १९६८



# मॉन्टीज डबल

जेम्सने ते निवेदन व्यवस्थित वाचण्याचा यत्न केला. पण त्याच्या डोक्यात अनेक उलटसुलट विचारांनी काहूर माजवले होते. गुप्ततेच्या शपथेचा आणि आपल्यासारख्या य:कश्चित लेफ्टनंटचा संबंध काय, असा प्रश्न त्याला पडला होता. त्याच्या लेखी कर्नल लेस्टरभोवती एक गूढतेचे वलय निर्माण झाले होते. अद्‌भुत कथांमधून आढळणारी एखादी गूढ अधिकारी व्यक्ती ज्याप्रमाणे निष्पाप जीवांना मोहिनीविद्येने भारावून टाकून त्यांच्याकडून अचाट कामगिरी करून घेते, त्याप्रमाणे आपल्याकडून काही करवून घेण्याचा कर्नल लेस्टरचा इरादा असावा, असे जेम्सला वाटले. मनाच्या या संकुल अवस्थेत जेम्सने शपथपत्रिकेवर स्वाक्षरी केली. इतक्यात कर्नल लेस्टर म्हणाला,

अनुवाद

अनंत भावे

**अखेर जेम्स हा रंगभूमिवरील एक नट होता. प्रत्येक नटाला कठीण भूमिका स्वीकारण्याची एक प्रकारची जिद्द असते. म्हणूनच जेम्सने ही कामगिरी स्वीकारली व तो निघाला.**

" जेम्स तू कोणासारखा दिसतोस हे तुला ठाऊक असेल नाही ? "

" नाही. मला नाही ठाऊक. " जेम्स काही न कळून उद्गारला.

" जेम्स, तू हुबेहूब जनरल मॉंटगोमेरी—किंवा ज्याला सारेजण ' मॉंटी ' म्हणतात त्याच्यासारखा दिसतोस. "

लेस्टरचे वाक्य ऐकल्यानंतर, काही वर्षांपूर्वी आपण केलेल्या आगळिकीबद्दल होणाऱ्या शिक्षेची ही नांदी आहे, असे जेम्सला वाटले. जनरल मॉंटगोमेरीची अश्लाघ्य नक्कल केल्याबद्दल आपल्यावर ' कोर्ट मार्शल ' केले जाणार याची खात्री वाटून जेम्स अगदी भयाकुल झाला.

लेस्टरच्या पुढील बोलण्याने मात्र त्याला धीर आला. लेस्टर म्हणाला " जेम्स, सैनिकी चित्रपटांशी माझा काही एक संबंध नाही. तशी तुझी कल्पना करून दिल्याबद्दल मी तुझी माफी चाहतो. मी ब्रिटिश गुप्तहेरखात्यातला अधिकारी आहे. "

गुप्तहेरखात्यातील या अधिकाऱ्याने ज्याअर्थी आपली माफी मागितली त्याअर्थी आपल्याला शिक्षा करण्याचा यांचा इरादा नसावा असे जेम्सला वाटले. तो थोडा स्वस्थचित्त झाला परंतु लेस्टरच्या पुढील बोलण्याने मात्र त्याला आयुष्यात कधीही बसला नव्हता एवढा आश्चर्याचा प्रचंड धक्का बसला.

लेस्टर म्हणाला, " डी-दिनाच्या मोहिमेपूर्वी, मॉंटगोमेरीचा तोतया म्हणून काम करण्यासाठी आम्ही तुझी निवड निश्चित केली आहे. या योजनेची व्यवस्था मी पाहतो आहे. या योजनेनुसार शत्रूला फसवण्यात आपण यशस्वी झालो तर हजारो दोस्तसैनिकांचे प्राण वाचतील. "

२

जेम्सला एकाएकी फार भीती वाटू लागली. आपल्यासारख्या सामान्य माणसावर पडलेली ही हजारो बांधवांना वाचवण्याची जबाबदारी पार कशी पडेल याची चिंता तो करू लागला.

कर्नल लेस्टरने त्याला मॉंटगोमेरीचा तोतया शोधताना किती अडचणी आल्या ते सांगितले आणि त्याचबरोबर जेम्स

ही भूमिका उत्कृष्ट वठवू शकेल असा विश्वासदेखील प्रकट केला.

परंतु या भूमिकेचा अभ्यास करण्यासाठी फार अवधीदेखील नव्हता. लेस्टर म्हणाला, " आक्रमणाची नेमकी तारीख मला माहीत नाही. परंतु वेळ थोडा आहे हे निश्चित. ही कामगिरी पार पाडण्यासाठी आवश्यक ती तालीम आम्ही तुला देऊ; आणि त्यानंतर प्रत्यक्ष वेळ येईल तेव्हा तू साक्षात जनरल माँटगोमेरी म्हणूनच वावरशील. "

लेस्टर पुढे म्हणाला, " तू या शपथपत्रिकेवर जी स्वाक्षरी केलीस त्याचा अर्थ तुला माहीत आहे असं मी धरून चालतो. यापुढं या सर्व प्रकारावाबत तू संपूर्ण गुप्तता पाळली पाहिजेस. माझ्या अधिकाराखाली असताना दुसऱ्या कोणाशीही तुझे संबंध असता कामा नयेत. ही कामगिरी संपेपर्यंत तू लंडनमध्येच राहशील आणि दररोज सकाळी नऊ वाजता न चुकता मला फोन करशील."

एवढे म्हणून लेस्टरने आपली हॅट उचलली आणि तो जायला निघाला. दरवाजाशी गेल्यानंतर मागे वळून तो म्हणाला, " जेम्स, माझ्या करडेपणाबद्दल तू मला माफ करशील. पण अशा प्रकारच्या कामात तसं वागण्याशिवाय गत्यंतरच नसतं. बरी आठवण झाली. खालच्या मजल्यावर तुझी बायकोच वाट पाहते आहे ना ?"

" होय. "

लेस्टर जेम्सजवळ आला आणि निग्रहाने म्हणाला, " जेम्स, माझा आणखी एक हुकूम पाळला पाहिजे. तुझ्या बायकोलासुद्धा यांतलं एक अक्षर समजता कामा नये. तू तिला काय वाटेल ते सांग; फक्त सत्य सांगू नकोस आणि शक्यतोवर तिला ताबडतोब लिसेस्टरला पाठवून दे. "

## आव्हानात्मक भूमिका

'हो' म्हणण्याशिवाय जम्सला गत्यंतरच नव्हते. कितीतरी वेळ एकटाच त्या खोलीत बसला होता. त्याच्या मनात अनेक विलक्षण विचारांनी थमान घातले होते. नकळतच तो जनरल माँटगोमेरी आणि ले. क्लिफ्टन जेम्स यांची तुलना करीत होता. ती तुलना केल्यानंतर, या कामगिरीत आपण निश्चितच अयशस्वी होणार असे त्याला वाटू लागले.

प्रत्येक अभिनेत्याच्या मनामध्ये एखाद्या अत्यंत बिकट, अवघड भूमिकेचे आकर्षण असते. आपल्या अंगचे सारे कौशल्य पणाला लावून ती भूमिका वठवावी अशी त्याची महत्त्वाकांक्षा असते. परंतु एका त्रिखंडख्यात सेनापतीची भूमिका, प्रत्यक्ष जीवनात, तो जिवंत असतानाच वठविण्याची मोठी चमत्कारिक कामगिरी जेम्सवर पडली होती. परंतु आजवर केलेल्या इतर अनेक भूमिकांसारखीच जनरल माँटगो-मेरीची भूमिकासुद्धा आपल्याला पार पाडता येईल कदाचित. हा विचार मनात आल्यावर जेम्सची भीती थोडी शमली. ही सर्व योजना म्हणजे एक अनेकपात्री, अनेकप्रवेशी रोमांचकारी नाटक आहे; आणि त्यात प्रमुख व्यक्तीचा बदल

म्हणून आपल्याला काम करायचे आहे, असा विचार जेम्स करू लागला. अर्थात रंग-मंचावर एखाद्या नाटकात भूमिका करणे आणि प्रत्यक्ष जीवनात एखाद्या समर-प्रसंगात भूमिका करणे या दोन गोष्टींमध्ये मोठाच फरक होता. नाटकात कामे करताना, दिग्दर्शकांनी, श्रेष्ठ नटाचे अनुकरण करू नकोस, स्वतंत्रपणे आपली भूमिका कर, असा सल्ला जेम्सला पुनः पुन्हा दिलेला होता. परंतु नेमकी या सल्ल्याविरुद्ध गोष्ट प्रस्तुत कामगिरीत जेम्सला करायची होती. तो प्रतिमाँटगोमेरी शोभेल असे जनरल माँटगोमेरीचे तंतोतंत अनुकरण त्याला करायचे होते !

अशा विचारात गढून गेलेला असताना अचानक त्याला आपल्या एकटेपणाची जाणीव झाली. मग घाईघाईने उठून तो खोलीबाहेर पडला आणि जिना उतरून खालच्या मजल्यावर आला.

ईव्ह त्याची वाट पाहात तेथे बसली होती. जेम्सला पाहताच ती ताडकन उठली आणि त्याच्याजवळ गेली. काही तरी विलक्षण घडले आहे असे जेम्सच्या चेहऱ्यावरून तिला वाटले असले पाहिजे. कारण ती म्हणाली, " जेम्स, काय झालं ? तू भ्यालेला का दिसतोस ?"

जेम्सने तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, " छे छे मला काहीच झालेलं नाही. गुप्त अस्त्रांसंबंधीच्या काही चित्रपटांचं काम करायचं आहे. त्याबद्दल अगदी संपूर्ण गुप्तता पाळली पाहिजे मला. तुलादेखील लिसेस्टरला परत पाठवून द्यावं म्हणतो मी. "

जेम्सच्या स्पष्टीकरणावर ईव्हचा विश्वास बसत नव्हता. जेम्स कसल्या तरी भयंकर संकटात सापडला आहे आणि आपल्याला यत्किंचित मनस्ताप सोसावा लागू नये याकरिता आपल्याला दूर पाठवून एकटाच तो ते दिव्य सहन करणार आहे असे ईव्हला वाटले. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या.

जेम्सची अवस्था मोठी चमत्कारिक झाली. ईव्हवर त्याचे आत्यंतिक प्रेम होते. परंतु गुप्तहेरखात्याच्या योजनेबद्दल तिला काहीही सांगणे, घतलेल्या शपथेमुळे त्याला अशक्य झाले होते आणि त्याबद्दल गुप्तहेरखात्याच्या नावाने बोटे मोडणेही योग्य नव्हते. कारण या धाडसी योजनेबद्दल आत्यंतिक गुप्तता राखल्याखेरीज ती यशस्वी होणे शक्यच नव्हते.

दुसऱ्या दिवशी सकाळी, ठरल्याप्रमाणे कर्नल लेस्टरला फोन करण्यासाठी जेम्स चोरपावलांनी हॉलमधील फोनपाशी गेला. फोनवरून लेस्टरने त्याला ताबडतोब कार्यालयात येण्यास सांगितले.

फोन खाली ठेवून जेम्स मागे वळला तो तेथे ईव्ह उभी होती. तिने विचारले, " कोणाला फोन करीत होतास तू जेम्स ?"

" या नव्या कामाबद्दल साहेब काही सूचना देणार होते. "

" अस्सं ? कोण हे साहेब ? आणि कसल्या कामाबद्दल सूचना ? आणि काम

आहे कुठं आणि केव्हा ? जेम्स, आजपर्यंत आपण एकमेकांपासून कोणतीही गोष्ट लपवली नव्हती. आणि कालपासून अचानक तू अशी गूढ लपवालपवी का करू लागलास ?"

"लपवाछपवी कसली यात ? मी तुला खरं तेच सांगितलं. त्यावर तुझा विश्वास बसत नाही त्याला मी काय करणार ?"

"माझा काय, कोणाचाच विश्वास बसणार नाही तुझ्या सांगण्यावर."

"त्याला माझा नाइलाज आहे ईव्ह. बरं पण आता मला कामावर निघालंच पाहिजे."

ईव्ह स्फुंदून स्फुंदून रडू लागली आणि जेम्सनेदेखील काहीशा उद्विग्न मनस्थितीतच तेथून काढता पाय घेतला. त्याची अत्यंत लाडकी पत्नीच आज त्याच्या दृष्टीने जगातली सर्वांत धोकेबाज गोष्ट होऊन बसली होती. ◻

लेस्टरच्या कार्यालयात जाताना, आपल्याला हे माँटीचा तोतया होण्याचे काम जमणार नाही असे जेम्सला पुन्हा वाटू लागले. पहिल्यापासूनच जेम्सला अधिकाऱ्यांची, वरिष्ठांची, मोठ्या लोकांची, अत्यंत भीती वाटत असे. पहिल्या महायुद्धात जवान असताना अनेक कर्नल आणि जनरल जेम्सने, अर्थात दुरून, पाहिले होते. त्यांच्याबद्दल त्याला आदरयुक्त भीती वाटे. कदाचित लहानपणी त्याने पाहिलेल्या कर्नल माँटेग्यू जेम्स या त्याच्या विक्षिप्त चुलत्यामध्ये या भीतीचे मूळ असावे.

जेम्सचे वडील लहानपणीच वारले होते, आणि जेम्सचा आणि त्याच्या भावंडांचा प्रतिपाळ त्याच्या आत्याने केला होता. दांडगाई केली म्हणजे आत्या त्यांना कर्नल माँटेग्यूचा धाक घाली. कर्नल माँटेग्यू जम्स हा मोठा करारी असामी होता. हम करेसो कायदा अशी प्रत्येक गोष्टीबाबत याची वृत्ती असे. लहान मुलेच काय, पण वडीलमाणसेदेखील त्याला भीत असत, आणि त्याच्यापुढे खालमानेने वावरत. जेम्सलासुद्धा कर्नल माँटेग्यूची अत्यंत भीती वाटायची; आणि पुढे सैन्यातला कोणताही अधिकारी पाहिला म्हणजे तो माँटेग्यूकाकासारखाच तिरसिंगराव असणार, असे त्याला वाटायचे.

कर्नल माँटेग्यू आणि कर्नल लेस्टर यांची मनातल्या मनात तुलना करीत जेम्स युद्धखात्याच्या इमारतीपाशी येऊन पोहोचला. तेथे जाऊन प्रतिक्षालयात तो बसला असताना एका शिपायाने एका कागदावर त्याचे नाव वगैरे माहिती लिहून घेतली, आणि कागद घेऊन तो शिपाई निघून गेला. युद्धखात्याच्या कार्यालयात शेकडो वेगवेगळ्या प्रकारच्या माणसांची वर्दळ सतत चालू असताना हे सामान्य शिपाई कधी न कावता, न रागावता, कामचुकारपणा न करता, हसतमुखाने सगळी कामे कशी करतात याचे जेम्सला आश्चर्य वाटले. हे शिपाई कमालीचे तटस्थ होते आणि ज्याप्रमाणे कोणालाही ते हलके समजून वागवीत नसत त्याप्रमाणे कोणाकडे ते

विशेष लक्षदेखील पुरवत नसत. समजा, जेम्सने जर त्यांच्यापैकी एखाद्याला आपण जनरल मॉंटगोमेरीचा तोतया म्हणून एका महत्त्वाच्या मोहिमेत भाग घेणार आहोत असे सांगितले असते तर त्या शिपायाने बहुधा निर्विकारपणे म्हटले असते: "असं का? अच्छा. बसा इथं. आज पावसानं भारीच पिरपिर लावली आहे नाही?"

काही वेळानंतर शिपायाने जेम्सला खुणावले. त्याच्यामागून जात कित्येक दालने ओलांडून जेम्स एका सुबक खोलीत येऊन पोहोचला.

## मुलाखतीची पहिली फेरी

गुप्तहेरखात्याच्या कार्यालयाबद्दल जेम्सची कल्पना अर्थात वेगळी होती. हेरकथा, त्यातील हेर, त्यांनी दिलेले शह-प्रतिशह यांच्या वाचनाने त्या कल्पनेला खतपाणी मिळाले होते. गुप्तहेरखात्यात अनेक अंधारी दालने असतील, त्या दालनांमधून बुरखाधारी माणसे गूढपणे वावरत असतील, अनेक प्रकारच्या यांत्रिक करामती तेथे केलेल्या असतील, असे साहजिकच जेम्सला वाटले होते. परंतु तो ज्या खोलीत आता बसला होता ती कोणत्याही संभावित मनुष्याच्या निवासस्थानातील खोलीसारखी होती. त्याच्या कल्पनेतल्या वातावरणाचा मागमूसही तेथे नव्हता.

खोलीत जाताच कर्नल लेस्टरने त्याचे स्वागत केले आणि कॅ. स्टीफन वॅट्स व ले. जॅक हेरवे या आपल्या सहकाऱ्यांची ओळख करून दिली.

स्टीफन वॅट्स आणि जॅक हेरवे क्लिफ्टन-जेम्सकडे रोखून पाहात होते. त्यामुळे त्याला प्रथमतः काहीसे गांगरल्यासारखे झाले. परंतु थोड्याच वेळात तो त्यांच्याशी मोकळेपणाने बोलू लागला. कर्नल लेस्टर आणि त्याचे हे दोघे सहकारी मिळून होणाऱ्या त्रिकुटावर, प्रस्तुत मोहिमेची जबाबदारी पडलेली होती. त्यात कर्नल लेस्टर हा निर्मात्यासारखा होता आणि वॅट्स व हेरवे व्यवस्थापकांसारखे होते. मौजेची गोष्ट अशी की या तिघांनाही रंगभूमीची चांगलीच माहिती होती. आणि जेम्स करीत असलेल्या भूमिकेबद्दल त्यांनी वेळोवेळी मोठ्या मौलिक सूचना केल्या.

त्या तिघांच्या संबंधात आणखी ज्या एका गोष्टीचे जेम्सला आकर्षण वाटले ती गोष्ट म्हणजे त्यांची अभिजात विनोदबुद्धी. गुप्तहेरखात्याच्या अधिकाऱ्यांत असली विनोदबुद्धी आढळणे हा मोठा चमत्कारच म्हटला पाहिजे.

या पहिल्या भेटीतच कर्नल लेस्टरने योजनेचा आराखडा जेम्सला समजावून सांगायला सुरुवात केली. तो म्हणाला, "जेम्स, आपण एखादं नाटकच सादर करीत आहो अशी तू कल्पना कर. आमच्या मेळाव्यातला तू एक धंदेवाईक नट आहेस, आणि रंगभूमीच्या इतिहासातली सर्वांत महान भूमिका तुला करायची आहे. आपले प्रेक्षक आणि टीकाकार मात्र साधे नाहीत. जर्मन युद्धयंत्रणेपुढं हा नाट्य-प्रयोग सादर व्हायचा आहे!

"आणखी दोन-तीन दिवस विचारविनिमयासाठी, सल्लामसलतीसाठी तू इथंच ये. त्यानंतर तुझी मॉंटीच्या नोकरचाकरांच्या परिवारात एक-दोन दिवस राहण्याची

व्यवस्था आपण करू. म्हणजे अगदी जवळून तुला मॉंटीचा आवाज, हावभाव आणि लकबी पाहता येतील."

लेस्टरने काही फोटो जेम्सच्या हातात ठेवीत पुढे म्हटले, "हे पाहा मॉंटीचे काही फोटो मी आणले आहेत."

फोटो पाहताना जेम्सला जनरल मॉंटगोमेरी आणि त्याच्यामधील साम्य चांगलेच जाणवले, मॉंटगोमेरी त्याच्यापेक्षा वयाने थोडा मोठा होता आणि तसा तो दिसायचादेखील. परंतु त्याची खास बरेट चढवल्यानंतर अगदी थोड्या रंगरंगोटीच्या साहाय्याने जेम्स हुबेहूब जनरल मॉंटगोमेरीसारखा दिसला असता. लेस्टर, स्टीफन वॅट्स आणि जॅक हेरवे यांनादेखील तसेच वाटले होते.

वॅट्स गमतीने म्हणाला, "जेम्स, मला वाटतं बर्लिनमध्ये तुला चांगलीच प्रसिद्धी मिळेल."

जेम्सलासुद्धा आता थोडा आत्मविश्वास वाटू लागला. पण त्याला दुसऱ्याच एका गोष्टीची चिंता पडली होती. त्याला सात दिवसांचीच रजा मिळाली होती. त्यातले दोन दिवस संपले होते. आणि लेस्टरच्या या मोहिमेत सामील झाल्यानंतर आपल्या कामावर रुजू होणे कित्येक महिनेपर्यंत त्याला अशक्य होते. मग नोकरी सोडून पळालेला इसम म्हणून त्याच्या वरिष्ठांनी त्याचा निश्चितच शोध केला असता.

आपल्या मनातली ही भीती त्याने कर्नल लेस्टरला सांगितली. लेस्टरने थोडा विचार केला आणि म्हटले, "मी पगारखात्याच्या प्रमुखांना तुझ्या वरिष्ठांना कळवायला सांगतो की विशेष पगारकामासाठी ले. क्लिफ्टन जेम्सला हवी तेवढी रजा मंजूर करण्यात यावी." थोडे थांबून तो मिष्किलपणे म्हणाला, "'विशेष पगारकाम' म्हणजे काय ते मलासुद्धा माहीत नाही. पण असेलसुद्धा अशा प्रकारचं एखादं काम! त्याबद्दल कोणीही चौकशी करणार नाही. तू अगदी निर्धास्त राहा."

## छायाचित्रकार का पत्रकार

रजेचा प्रश्न निकालात काढल्यावर लेस्टरने दुसऱ्या एका महत्त्वाच्या प्रश्नाला हात घातला. तो म्हणाला, "मॉंटगोमेरीच्या परिवारात तुला वावरता येईल अशी काहीतरी व्यवस्था आपल्याला करायला पाहिजे. पुन्हा, त्याबद्दल कोणाला संशय येता उपयोगी नाही...हे कसं करावं?"

"मला वाटतं, अधिकृत छायाचित्रकार म्हणून जेम्सला तिकडे पाठवता येईल." स्टीफन वॅट्सने सूचना केली.

"चांगली आहे ही सूचना." लेस्टर म्हणाला, "तुला काय वाटतं जेम्स? छायाचित्रकार म्हणून तू तिथं सहज वावरशील आणि कोणी तुला भलतेसलते प्रश्न विचारून सतावणारदेखील नाही."

"सूचना तशी चांगली आहे. फक्त एक महत्त्वाची गोष्ट आपण लक्षात घ्यायला पाहिजे." जेम्स गंभीरपणे म्हणाला, "मला छाया–चित्रणकलेतलं काही म्हटल्या

काहीसुद्धा कळत नाही आणि कोणी त्याबद्दल बोलायला सुरुवात केली म्हणजे कसं व्हायचं आमचं ?"

"छे छे छे छे, तो धोका आपल्याला पत्करता येणार नाही." तिघेही तत्परतेने म्हणाले.

"मग जेम्सला वार्ताहर म्हणून का नये पाठवू ?" जॅक हेरवेने सुचवले

परंतु स्टीफन वॅट्सला ही कल्पना पसंत पडली नाही. तो म्हणाला, "वार्ताहर म्हणून जेम्सला पाठवणं तर फारच धोक्याचं आहे. जनरल मॉंटगोमेरीबरोबर वार्ताहर नसतातच आणि त्यामुळं जर एखादा वार्ताहर त्यांच्या परिवारात वावरतो आहे ही बातमी वर्तमानपत्रवाल्यांमध्ये फुटली तर तर ते नुसता हलकल्लोळ उठवतील. वार्ताहरांचे जथेच्या जथे पाठवतील तिकडे. नकोच ते."

"मला वाटतं, मला एक नामी शक्कल सुचली आहे." कर्नल लेस्टर स्वतःवर खुष होत म्हणाला, "जेम्सला आपण गुप्तहेरखात्याचाच अधिकारी (सार्जंट) म्हणून पाठवू. एकतर त्यामुळं त्याचा कोणालाच संशय येणार नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे गुप्तहेरखात्यातल्या माणसाला प्रश्न विचारायला कोणी फारसं धजावणार नाही."

सर्वानुमते ही योजना निश्चित केली गेली. आणि तिची तपशीलवार आखणी झाल्यानंतरच कर्नल लेस्टरने जेम्सला जाण्याची परवानगी दिली.

जेम्स आता दिवसभर मोकळा होता. काय हवे ते करू शकत होता. परंतु लेस्टरने सुचवल्याप्रमाणे तो सिनेमाला जाऊन बसला. कारण मुख्य सिनेमाच्या आधी मॉंटगोमेरीबद्दलचा लहानसा वार्तापट दाखविण्यात येत होता. वार्तापट पाहताना पुन्हा एकदा जनरल मॉंटगोमेरी आणि स्वतःमधले आश्चर्यकारक साम्य जेम्सला जाणवले. अर्थात हे साम्य दर्शनी रूपापुरतेच होते. कारण मॉंटगोमेरीची ऐट, त्याचा तोरा, त्याचे एकंदर व्यक्तिमत्त्वच इतके विलक्षण होते की त्याची नक्कल कशी जमणार असे जेम्सला वाटले. ¤

ईव्हचा विचार मनात असल्यामुळे चित्रपटाकडे जेम्सचे नीट लक्ष लागले नाही. कारण लेस्टरशी झालेली मुलाखत संपवून बाहेर पडण्यापूर्वी लेस्टरने जेम्सला विचारले होते : "जेम्स, आपल्या बायकोचं तू काय केलंस ? पाठवून दिलंस का तिला लिसेस्टरला ?"

"उद्या देतो पाठवून."

"ठीक आहे. पण काय रे काही अडचण वगैरे आली काय तिला समजावताना ?"

"होय. झाला थोडा त्रास. पण आता ती लिसेस्टरला जायला कबूल झाली आहे."

लेस्टरला दिलेले हे आश्वासन कितपत खरे ठरेल याची चिंता घराकडे परतताना जेम्सच्या मनाला लागली होती. विशेष पगारकामाच्या सबबीवर तिचा विश्वास बसेल काय ? आणि विश्वास नाही बसला तर? तर काय करायचं ? बापरे ! आपण अंगीकारलेली कामगिरी किती अवघड आहे याचा प्रत्यय जेम्सला पदोपदी येत होता. ईव्हबरोबर हुज्जत घालण्याची तर त्याची शक्तीच संपली होती.

## इव्ह–जेम्स भेट

घरी गेल्याबरोबर चेहऱ्यावर हास्य धारण करीत जेम्स ईव्हला म्हणाला, "चला. सुटलो एकदाचा. तुझा विश्वास बसेल असं काहीतरी आता मी तुला सांगू शकेन. काय झाले पाहा. सुरुवातीला काही गुप्त चित्रपट करण्यासाठी सैन्याच्या चित्रपट विभागानं मला बोलावून घेतलं. पण सैन्याचा खाक्या तुला माहीत आहेच. चित्रपट करायला त्यांना अजून बराच अवकाश आहे. परंतु हवी तेव्हा माणसं मिळावीत एवढ्यासाठी आमच्यासारख्या काहीजणांना त्यांनी राखून ठेवलं आहे. डेव्हिड निवेननं हे सारं जेव्हा मला सांगितलं तेव्हा फार संताप आला मला या सैनिकी आयुष्याचा."

"अच्छा ?"

"पण मग त्यानं मला पगारखात्यामध्ये मुलाखतीसाठी पाठवलं. मला उगाचच फार भीती वाटली. मला वाटलं, लिसेस्टरमधल्या माझ्या कामात काही भयंकर घोटाळा झाला असावा; आणि त्याकरता हे मला फैलावर घेणार असावेत. पण आज जेव्हा मी तिथं गेलो तेव्हा तिथल्या वरिष्ठांनी मला सांगितलं की जनरलच्या अखत्यारीत असलेल्या विशेष पगारकामखात्यात माझी तात्पुरती बदली झाली आहे, याचा अर्थ मला देशभर भटकावं लागणार. कदाचित परदेशीसुद्धा जावं लागेल."

ईव्ह जेम्सचे बोलणे शांतपणे ऐकत होती. त्यामुळे आपण जिंकली असे जेम्सला वाटू लागले. इतक्यात तिने विचारले, "पण विशेष पगारकाम म्हणजे काय ? ही काय भानगड आहे ?"

ते जेम्सला तरी बिचाऱ्याला कुठे ठाऊक होते ? पण काहीतरी स्पष्टीकरण करणे आवश्यक होते. सयुक्तिक वाटेल अशी सबब शोधता शोधता जेम्स म्हणाला, "या कामात ठिकठिकाणच्या खात्यांचे हिशेब तपासायला लागतात. हीदेखील संरक्षणाचीच एक बाजू आहे. बँकांची खाती नाही का सेनाधिकारी तपासीत ? तसलाच काहीसा मामला आहे हा. तेव्हा आता तुला काळजी करण्याचं काहीच कारण नाही. हां, एक गोष्ट करावी लागेल तुला. आणि ती म्हणजे इथून आपलं लिसेस्टरला जायचं...."

"ठीक आहे. मी जायला तयार आहे." ईव्हने समजूतदारपणे म्हटले.

जेम्सने सुटकेचा निःश्वास टाकला. हे प्रकरण तरी आता मार्गी लागले असे

त्याला वाटले. परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी युद्धखात्याला टेलिफोन करून जेम्स ईव्हचा निरोप घ्यायला गेला तेव्हा ती बिछान्यात पडून हुंदके देत रडत होती.

आता काय झाले ते जेम्सला कळेना. त्याने तिची समजूत घालण्याचा यत्न केला. मग एकदम ईव्ह उठून बसली. तिने आपले रडवेले तोंड पुसले आणि चेहऱ्यावर बळेच हसू आणून काहीशा कडवटपणाने ती म्हणाली, " मला वाटतं ही अखेरचीच भेट ठरणार आहली. कारण आताच मी तुझं फोनवरचं संभाषण ऐकलं. तू फोन पगारखात्याला करीत नव्हतास तर युद्धखात्याला. याचा अर्थ स्पष्ट आहे, तू अजून माझ्यापासून काहीतरी लपवतो आहेस."

" ईव्ह, तुला काही कळत नाही. अग, मला फोन युद्धखात्यालाच केला पाहिजे."

ईव्हने त्याचे वाक्य अर्धेच तोडले, आणि ती त्राग्याने म्हणाली, " असेल कदाचित. मला नाही कळत. पण एक गोष्ट मात्र मला पक्की कळते आहे की तू कसल्यातरी चमत्कारिक भानगडीत सापडला आहेस. परंतु आता मी तुला त्याबद्दल काहीच विचारणार नाही. मी जाते लिसेस्टरला. पण एक गोष्ट लक्षात ठेव की मी तुला कधीच विसरणार नाही....निदान एका गोष्टीचं तरी वचन मला देशील काय ?"

" नक्की देईन."

" आठवड्यातून एकदा तरी खुशालीचं पत्र लिहीन असं वचन दे तू मला."

" अगदी आनंदानं. तू काही काळजी करू नकोस. दर आठवड्याला मी न चुकता तुला पत्र पाठवीन, मग तर झालं ?"

जेम्सला अर्थात निश्चित माहीत होते की एक ओळदेखील कोणाला लिहिण्याची परवानगी त्याला मिळणार नाही. पण ईव्हला तसे वचन न देणे तरी त्याला कसे शक्य होते ?

दोघांनी परस्परांना घट्ट आलिंगन दिले. ईव्हच्या डोळ्यांतून अखंड अश्रू वाहात होते. जेम्सनेदेखील जड अंतःकरणाने तिचा निरोप घेतला. त्या वेळी हा कदाचित अखेरचाच निरोप-प्रसंग असेल असे त्याला वाटल्यावाचून राहिले नाही.

## गुप्ततेच्या सूचना

पण या मोहिमेत गुंतल्यापासून जेम्सवर सतत जोखमीचे काम पडले हे एका दृष्टीने बरेच झाले. कसला म्हणून विचार करायला त्याला फुरसतच मिळाली नाही. प्रत्येक दिवशी चर्चा आणि विचारविनिमय होई आणि त्यात शेकडो लहानसहान गोष्टींचा बारकाईने परामर्ष घेतला जाई. अगदी क्षुल्लक गोष्टदेखील गुप्तहेरखात्याच्या नजरेतून सुटत नसे आणि लहानसहान संभाव्य अडचणींविरुद्ध करावयाच्या वेगवेगळ्या उपाययोजनांचा तपशीलवार खल होई.

गुप्तता राखण्याबाबतची ताकीद तर रोजचीच होती. त्याला पुनःपुन्हा बजावले जायचे : " जेम्स, तुझं तोंड बंद ठेवलं पाहिजेस. या योजनेतलं अक्षरदेखील बाहेर

फुटता कामा नये. तू सतत सावध असलं पाहिजेस. कोणावरही विश्वास टाकू नकोस. अनोळखी माणसावरोबर हॉटेलात जाऊ नकोस. चहापाणी घेऊ नकोस. कोणी तुझी ओळख काढायचा प्रयत्न केला, किंवा कोणा अपरिचित माणसाने फोन केला तर त्याबद्दल काळजी घे. 'लंडनमध्ये तू काय करतो आहेस?' असं कोणी विचारलं तर त्यांना सहजपणं उत्तर दे : सांग की, मी विशेष पगारकाम बघतो आहे. त्याचा तपशील सांगण्याची गरज नाही. आणि एखादा खनपटीलाच बसला तुझ्या, तर त्याचं नाव आम्हांला कळव. त्याचा कायमचा बंदोबस्त करून टाकू आम्ही...पत्र लिहिण्याची तुला अर्थातच मनाई आहे. आणि आपण झोपेत बरळत नाही, याची खात्री करून घे."

या शेवटच्या सूचनेवरून जेम्सला एकदम १९४१ सालच्या एका प्रसंगाची आठवण झाली. त्या वेळी तो राखीव फौजेत असलेल्या सैनिकांच्या पगाराचा हिशेब पाहात असे. त्याबद्दल आत्यंतिक गुप्तता पाळण्याची ताकीद त्याला वरिष्ठांकडून मिळालेली होती. एके दिवशी जेम्सची दाढ अचानक दुखू लागली, म्हणून तो सैनिकी दंतवैद्याकडे गेला. दंतवैद्याने गॅस देऊन त्याची दुसरी दाढ उपटून टाकली. गॅसच्या अंमलातून जेम्स बाहेर आला तेव्हा दंतवैद्य त्याच्याकडे चमत्कारिक नजरेने पाहात असल्याचे त्याला दिसले. प्रथम त्याला वाटले की दाढ उपटताना काही विचित्र अडचण आली असावी. पण जेव्हा दंतवैद्याने त्याला सांगितले की गॅसच्या अमलाखाली असताना तो राखीव सैनिकांची नावे आणि त्यांचा ठावठिकाणा पाढे म्हणावेत तसा घडाघडा म्हणत होता, तेव्हा त्याला दंतवैद्याच्या चमत्कारिक नजरेचा अर्थ उमगला. एखाद्या दुबळ्या माणसाने बेहोषीत असताना ज्याप्रमाणे जहाल शिव्या द्याव्या त्याप्रमाणे गुप्तता राखण्यासंबंधीचे दडपण बाजूला सारून, गॅसच्या अमलाखाली, जेम्सच्या तोंडून नेमका गौप्यस्फोट होत होता.

गुप्ततेबद्दलची आवश्यकता त्याच्या मनावर इतकी बिंबवली होती की सुरुवातीला कोणाशी काहीही बोलण्याचे त्याला भय वाटे. न जाणो नकळत एखादी महत्त्वाची गोष्ट त्याच्या तोंडून बाहेर पडायची. पण लवकरच त्याच्या ध्यानात आले की गुप्ततेचा बाऊ केल्यानेच कोणाला तरी संशय यायचा. नेहमीसारखे, सहजपणे वागणेच योग्य होते. म्हणजे त्याला दोन भूमिका वठवायच्या होत्या. वेळ येईल तेव्हा माँटगोमेरीचा तोतया; आणि एरवी पगारखात्यातील एक मामुली कारकून—ले. क्लिफ्टन-जेम्स !

काही दिवसांनंतर जेम्सला वाटू लागले की अजून त्याची चाचणीच चाललेली असावी. गुप्तहेरखात्याने जरी त्याची अगदी लहानपणापासूनची सगळी माहिती गोळा केलेली असली तरी या महत्त्वाच्या मोहिमेसंबंधी कोणताही अल्पसादेखील धोका पत्करायला ते तयार नव्हते. आणि त्यामुळे जेम्सच्या अंगात मुरलेल्या खास त्याच्या अशा अनेक लकबी आणि सवयी इतक्या थोड्या अवधीत त्यांच्या लक्षात कशा

येणार ?...आणि त्या लक्षात आल्या तर – ?

म्हणूनच दैनंदिन काम संपल्यानंतर उरलेल्या वेळातही आपल्यावर सतत पाळत ठेवण्यात येत असावी, असे जेम्सला वाटत राहिले. त्याने तो फारच अस्वस्थ झाला. कधी तरी बसमध्ये, हॉटेलमध्ये एखादा माणूस दिसायचा, आणि त्याला वाटायचे याला कोठेतरी पाहिले आहे. कोठे बरे ? हां बरोबर. त्याच दिवशी सकाळी तर दिसला होता तो. पण कुठे ? कुठे ? ते काही त्याला नीटसे आठवायचे नाही. मग पुन्हा कधी तरी तो माणूस दिसायचा आणि आपल्यावर पाळत ठेवली जात आहे, अशी त्याची खात्री पटायची. या मोहिमेत सापडल्यापासून जेम्सला वैयक्तिक आणि खाजगी आयुष्य जणू उरलेच नव्हते.

एके दिवशी घरी परतताना वाटेत जेम्स एका बारमध्ये शिरला. थोड्या वेळाने, एक तरुण माणूस त्याच्याकडे रोखून पाहात असल्याचे जेम्सला दिसले. त्यांची नजरानजर होताच तो माणूस पुढे झाला आणि हस्तांदोलन करून जेम्सला म्हणाला, " हॅलो जेम्स, किती दिवसांनी पाहतोय मी तुला. युद्ध सुरू होण्यापूर्वी 'साऊथ सी '...मध्ये भेटलो होतो आपण. त्या मिसेस गाय निकोलनं दिलेल्या मेजवानीच्या वेळी! आठवलं?"

जेम्सला आठवले. १९३९ साली तो आपल्या नाटककंपनीबरोबर खरोखरच 'साऊथ सी 'मध्ये गेला होता. मिसेस गाय निकोलने दिलेल्या मेजवानीलासुद्धा तो हजर होता. पण त्या प्रसंगी या तरुण माणसाला पाहिल्याचे मात्र जेम्सला अजिबात आठवत नव्हते.

इतक्यात त्या माणसाने विचारले, " कसं काय चाललं आहे तुझं जेम्स ? आणि लंडनला काय रजेबिजेवर आला आहेस की काय ?"

चौकशीचा सूर ऐकताच जेम्सला कर्नल लेस्टरने वारंवार दिलेल्या ताकिदीचे स्मरण झाले. त्यामुळे काहीतरी सबब काढून जेम्सने खरे म्हणजे त्या माणसाला टाळायचे. पण कसल्या तरी विकृत जिद्दीने तो त्या अनोळखी माणसाशी मोठ्या खुषीत येऊन बोलू लागला. म्हणाला, " दोस्ता, सुरुवातीला तुझी ओळख पटली नाही ! पण आता मात्र चांगलीच पटली. मला आठवतं, त्या मेजवानीच्या वेळी मिसेस निकोलच्या सगळ्यांत धाकट्या मुलीबरोबर...काय बरं तिचं नाव ?... हं पॅट...त्या पॅटबरोबर तू अगदी रंगात आला होतास, नाही ?"

" हां. असेल असेल. " तो म्हणाला.

" पण ती पोरगी होतीच मोठी मस्त. नाही का ? ती असते कुठं रे हल्ली ? माहीत आहे तुला ?"

" मला वाटतं ती ' रेन्स 'मध्ये असते हल्ली. "

" नाही रे बाबा, नाही. साफ चुकलास तू. ती असते तुझ्या कल्पनेत ! कारण, निकोल दांपत्याला मुळी मूलच नव्हतं. एकसुद्धा. " एवढे बोलून जेम्स पाठ फिरवून निघून गेला.

येणेप्रमाणे गुप्तहेरखात्याने जेम्सला बेसावधपणे बोलता करण्याचा प्रयत्न करून त्याची कसोटीच पाहिली. जेम्स त्या कसोटीला उतरला होता.

एके दिवशी सकाळी कर्नल लेस्टरकडून जेम्सला लंडन सोडून पोर्ट्ससाऊथला जाण्याचा हुकूम मिळाला. गुप्तहेरखात्याच्या सार्जंटचा गणवेष जेम्सच्या अंगावर चढला. पोर्ट्ससाऊथला एका विशिष्ट ठिकाणी पोहोचल्यावर त्याला पुढील हुकूम मिळणार होते.

गुप्तहेरखात्याच्या खाक्यात जेम्स अजून रुळला नव्हता. एखाद्या माणसाला, सर्वस्वी अपरिचित ठिकाणी पाठविणे, ही त्या खात्यात नित्याची बाब होती. त्यामुळे सुरुवातीला जेम्स भांबावून जायचा. नव्या ठिकाणी गेल्यावर आपल्याला कोण ओळखणार ? कोण हुकूम देणार ? असे प्रश्न त्याला हटकून पडायचे. पण कालांतराने जेम्सचा गुप्तहेरखात्याच्या कार्यपद्धतीवर विश्वास बसला.

जर्मनांनी केलेल्या भीषण बॉम्बहल्ल्यामुळे पोर्ट्ससाऊथ शहरावर अवकळा आली होती. जागोजागी उद्‌ध्वस्त इमारती दिसत होत्या. जेम्सने इच्छित जागेचा पत्ता शोधून काढला. तेथे पोहोचल्यावर त्याला आढळले की, खुद्द कर्नल लेस्टरच त्याच्या स्वागतासाठी हजर आहे. जेम्सला सिगारेट देऊन कर्नल लेस्टर बोलू लागला, " जेम्स, या जागी तुला सैन्याच्या विविध दलांतली माणसं दिसतील. शिवाय ती सहज आपला गणवेष बदलतील, दर्जा बदलतील. आज नौदलाचा अधिकारी दिसणारा माणूस उद्या साध्या जवानाचा गणवेष चढवील, तर परवा विमानदलाचा अधिकारी म्हणून वावरेल. पण त्याकडे तू लक्ष देऊ नकोस.

" आता आपल्या मोहिमेबद्दल सांगायचं तर ती फारशी कोणाला माहीतच नाही. आणि असलीच तर ती संपूर्ण नसणार. ती तशी नसणंच बरं, आणि म्हणून तुझ्या तोंडून तिची वाच्यता होऊ नये.

" आता संध्याकाळी सात वाजेपर्यंत तू मोकळा आहेस. सात वाजता मॉंटगोमेरीच्या तळावर तुला नेण्यासाठी जीप येईल. तिथं गुप्तहेरखात्याचा एक अधिकारी तुला भेटेल आणि तो पुढला बेत तुला समजावून सांगेल. "

" तुला कसली अडचण असली तर इथल्या डॉने नावाच्या कर्नलला भेट. तो तुला मदत करील. सार्जंट जेम्स म्हणून तुझे बनावट कागदपत्र तयार केलेले आहेत. शिवाय एका खऱ्याखुऱ्या सार्जंटची मी गाठ घालून देतो. तो त्याच्यासंबंधी जी तपशीलवार हकीकत सांगेल, ती नीट लक्षात ठेव. आणि कोणी काही विचारलं तर ती माहिती तुझीच आहे, असं मानून तिचा उपयोग कर. "

कर्नल लेस्टर गेल्यावर जेम्सला फार एकाकी वाटू लागले. आपल्या आवाक्याबाहेर असलेली ही विलक्षण कामगिरी आपण कशी काय पार पाडणार, या विचारात तो गुंग होऊन गेला.

[ अपूर्ण ]

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## एप्रिल महिन्याचे राशि-भविष्य

**मेष :** मार्च महिन्यातील भयंकर अनिष्ट ग्रहस्थितीतून आपण उजळ माथ्याने बाहेर पडलात यातच आपल्या अंगच्या अनन्यसाधारण कर्तृत्वाचे दर्शन घडते. अजूनही परिस्थिती पूर्णत्वाने निवळलेली नाहीच. पण त्या अनिष्ट समजल्या जाणाऱ्या ग्रहस्थितीचे पितळ आता उघडे पडलेले आहे.

५ एप्रिलच्या रवि-शनी युतीपर्यंतच हे वातावरण थोडेफार जाणवायला लागेल. १५ एप्रिलच्या सूर्य-गुरू त्रिकोणापासून सर्वत्र प्रसन्नतेचे वातावरण दरवळू लागेल. आपल्या योजना येथूनच आकार घेऊ लागतील, मनावरील दडपण दूर झाल्यासारखे वाटेल. दुसरा सर्व पंधरवडा अपेक्षासाफल्याचा जाणवेल.

दि. १० ते १४, १५ ते २३, २७ ते ३० या काली आपले व्यावसायिक कार्य गती घेऊ लागेल.

**वृषभ :** आपली परिस्थिती थोडीफार अनिष्टतेकडे झुकू लागलेली आहे अशी आपणास पदोपदी जाणीव व्हायला लागेल. मंगळ व्ययस्थानी आलेला आहेच. अन्य ग्रहही तेथे यायच्या विचारात आहेत. या ग्रहस्थितीमुळे सांपत्तिक ताण वाढू लागेल. विरोधकांचे चोरटे हल्ले होऊ लागतील. व्यवसायधंद्यातील आडाखे फसू लागतील, अपयश येणार नाही. पण कोणतेही यश पदरी पाडून घेण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल. अशाही अनिष्टकालात १५ एप्रिलच्या सूर्य-गुरू त्रिकोणाची आपणास बरीच मदत होईल. आगामी २० दिवस असे काहीसे तणातणीचे जाणवायला लागतील.

दि. २ ते ४, ८ ते १५, २४ ते २८ एप्रिल या काली आपले प्रयत्न घवघवीत यश घेऊन उठतील.

**मिथुन :** आपल्या लाभस्थानाकडे अनेक समर्थ व संपन्न ग्रहांची वाटचाल सुरू आहे. आणि ही भविष्यकालीन प्रगतीची प्रसादचिन्हेच आहेत.

प्रामुख्याने १५ एप्रिलच्या सूर्य-गुरू त्रिकोणापासून आपल्या अभिनव योजना आकार घेऊ लागतील. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभल्याने व्यावसायिक क्षेत्रात काही भव्यदिव्य करून दाखवण्याची आपली अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल व्हावी.

दुसरा पंधरवडा चिरंतन स्मृतीचा ठरावा. या वेळी तुमच्या वाणीत प्रासादिक

सामर्थ्य प्रकटेल. कृतीत सातत्य जाणवेल, आजवर जिवाचे रान करूनही जे घडू शकले नाही ते या काली सहजासहजी घडून यावे.

कौटुंबिक कटुता मिटेल, सांपत्तिक ताण कमी होईल.

दि. ७ ते १६, २६ ते ३० या कालावरच आपले लक्ष केंद्रित करा.

**कर्क :** जनमनाचे स्वास्थ्य नष्ट करणाऱ्या शनि-मंगळाचा आपल्या जीवनावर तसा काहीच अनिष्ट परिणाम झाला नाही. आणि होणारही नव्हता. पण धास्ती मात्र खूपच वाटत होती. आता ती भीती समूळ नष्ट झाली आहे.

पहिल्या आठवड्यात खूपच धावपळ होईल पण त्या परिश्रमाचे यश अपेक्षेपेक्षा पदरी पडेल. १५ एप्रिलच्या सूर्य-गुरू नवपंचम योगामुळे तर आजवर घडावे म्हणून खूपच धडपड केलीत. पण जे घडू शकले नाही ते या वेळी सहजासहजी घडून येईल.

यांत्रिक, वैद्यकीय व्यवसायात हेवा करण्यासारखे यश मिळवाल, सामाजिक, राजकीय क्षेत्रात तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल. तुमच्यातील कलागुणांना उत्थान मिळेल.

दि. १ ते ५, १० ते १७, २४ ते २९ या कालात असाधारण यशाचे धनी व्हाल.

**सिंह :** मंगळ भाग्यस्थानी आलाच आहे. सूर्याचे तेथे आगमन घडले की, तुमचा सारा अनिष्ट काल इतिहासजमा झाला असे निश्चित समजायला हरकत नाही. या महिन्यात सूर्याचीही तेथे उपस्थिती घडून येणार आहे. या ग्रहस्थितीचा तुमच्या जीवनात कायमचा ठसा उमटेल असे काही अभिनव व अभिजात कार्यक्रम आपण आखाल.

१५ एप्रिलच्या सूर्य-गुरू त्रिकोणातच आपला भविष्यकाल उजळून काढण्याचे सामर्थ्य आहे. या कालापासून तुमचे व्यक्तिमत्त्व विकसेल, सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल, राजकीय कार्यक्रमात आघाडीवर राहावे लागेल.

गेल्या महिन्यातील बऱ्याचशा व्यथाविवंचना मिटून जातील. उत्साही आणि प्रसन्न वातावरण सर्वत्र अनुभवण्यास मिळेल.

दि. २ ते ४, ८ ते १६, २६ ते ३० या कामी सारी कामे यशस्वी ठरू लागतील.

**कन्या :** हा महिनाही काहीसा कमी ताणाचा जाणवला तरी याही महिन्यात स्वास्थ्याची अपेक्षा करायला जागाच नाही.

शनि-राहू सप्तमस्थानी व रवि-मंगळ अष्टमस्थानी मग या अनिष्ट ग्रहस्थितीची झळ बाधल्याशिवाय कशी राहील ?

मार्च महिन्याप्रमाणेच वादविवाद, मतभेद, संघर्ष यांना ऊत येईल. अशाही परि-

स्थितीत मनोधैर्य खचू देऊ नका. या पेचप्रसंगामधूनही मार्ग निघल. सत्यावर अढळ निष्ठा ठेवलीत तर कोणीही तुमचे वाकडे करू शकणार नाही.

नव्या व्यवसायधंद्यात शक्यतो शिरू नका. परिस्थिती अनुकूल नाही म्हणून मनामध्ये नैराश्याला थारा देऊ नका. प्रकृतीला काही काल जपा.

दि. २ ते १०, १५ ते १९, २४ ते २६ या काली अपेक्षा सफल होतील.

**तूळ :** सूर्य–मंगळ तुमचा पक्ष सोडून विरोधी पक्षाला सामील होत असल्यामुळे, एकट्या गुरूच्या साहाय्यावर आपलेच मताधिक्य आहे या भ्रमात राहू नका. परिस्थिती प्रतिकूलतेकडे झुकू लागलेली आहे, याची जाणीव ठेवून सतत जागरूक राहा.

प्रतिक्षणी विरोध वाढू लागेल, व्यावसायिक संघर्ष कोणत्याही क्षणी सुरू होतील. वरिष्ठांची वक्रदृष्टी केव्हाही वळेल. अशा वेळी संयमाशिवाय अन्य उपाय नाही.

गुरु–मंगळ त्रिकोणापासून (२४ मार्च) काही आशादायक घटना भराभर घडून येतीलही. पण मनावर ताण खूपच वाढेल. प्रकृतीही नरमगरम बनेल.

दि. ६ ते १०, १५ ते २३, २६ ते २८ या काली बऱ्याच व्यक्तींचे सहकार्य लाभावे.

**वृश्चिक :** उग्र ग्रहांची संघटना आता विस्कळित झालेली आहे. आता आपणास हायसे वाटू लागेल. वैचारिक संघर्ष आता निर्माण होण्याची शक्यता फारशी नाही. उलट विरोधक नमण्याचीच शक्यता अधिक दिसू लागेल.

१५ एप्रिलपासून नोकरीधंद्यात विशेष प्रगती होण्याची लक्षणे दिसू लागतील. समाजात तुमच्या नेतृत्वाची गरज भासू लागेल. राजकीय क्षेत्रात तर तुमच्या आगमनाची लोक आतुरतेने वाट पाहू लागतील.

आता कोणत्याही क्षेत्रात शिरा. अपयश येण्याची यत्किंचितही भीती नाही. आरोग्य सुधारेल, पैसाही अनेक मार्गांनी हाती येऊ लागेल, स्थावरांची विवंचना मिटेल.

दि. ६ ते १०, १५ ते १९, २४ ते २८ या काली सर्व काही अपेक्षेप्रमाणे घडावे.

**धनू :** चतुर्थातून मंगळ पुढे सरकला म्हणजे अधिकाधिक गड आपण जिंकला असं म्हणण्याला मुळीच हरकत नाही. एप्रिल दुसऱ्या पंधरवड्यात सूर्यही तेथून निघून जाईल तुमच्या अनिष्ट कालाची तीव्रता निश्चितच ओसरली. भाग्यस्थ गुरूला आताच तुमच्यासाठी काही भरीव कार्य करण्याची संधी लाभेल.

१५ एप्रिलपासूनच तुमच्या प्रगतीचा वेग वाढू लागेल. असफल आशाआकांक्षा सफल होण्याची लक्षणे दिसू लागतील. नोकरीधंद्यातील बऱ्याचशा व्यथाविवंचना मिटून जातील.

सभोवारचा सारा आसमंत प्रसन्नतेने, उत्साहाने भारल्यासारखा दिसू लागेल.

विरोधकांच्या कारवाया आता त्यांच्याच अंगाशी यतील. सांपत्तिक अडचणी भराभर दूर व्हायला लागतील.

दि. ९ ते १६, १८ ते २२, २७ ते ३० या कालात बऱ्याचशा अपेक्षा सफल व्हाव्यात.

**मकर :** चौथ्या मंगळाची कारकीर्द सुरू झालेली आहे, म्हणून हताश होऊ नका. पराक्रम, ग्रहांचे सहकार्य अजुन कित्येक दिवस आपणास लाभणार आहे.

आखलेल्या नव्या योजना आकार घ्यायला लागतील. त्यासाठी आवश्यक तो पैसा उभारला जाईल. नोकरीधंद्यासाठी केलेले परिश्रम वाया जाणार नाहीत. नवे स्नेहसंबंध जोडले जातील. राजकीय जबाबदाऱ्या यशस्वी करून दाखवल्या जातील.

परिश्रमांचा ताण मात्र निश्चित बसेल. घवघवीत यश पदरी पडणार असल्यामुळे त्या कष्टांचे काहीच वाटेनासे होईल. या महिन्यात दूरचे प्रवास मात्र शक्यतो टाळाच. आणि मंगल कार्याचे पुढे ढकला.

दि. ७ ते ११, १५ ते १९, २५ ते ३० या काली आपले परिश्रम कारणी लागतील.

**कुंभ :** धनस्थानी अनेक अनिष्ट ग्रहांचा धिंगाणा सुरू असल्यामुळे, गेल्या महिन्यात अनेक प्रसंगांना आपणास तोंड द्यावे लागले. आता मंगळ पराक्रमस्थानी आलेला असल्यामुळे तुम्हाला आता अन्य ग्रहांच्या इष्टानिष्टतेची दखल घ्यायची गरजच भासणार नाही. मंगळासारख्या समर्थ ग्रहांची सहानुभूती मिळवणाऱ्या व्यक्तींना सहसा अशक्यता त्यांच्या वाऱ्यालाही उभी राहू शकत नाही.

या महिन्यापासून तुमची सारी कामे गती घेऊ लागतील, नव्या आशा अंकुरायला लागतील, प्रतिष्ठा उंचावू लागेल. राजकीय क्षेत्रात तर तुमचाच आवाज सर्वत्र उठून दिसू लागेल.

या महिन्यात अनेक वेळा प्रवासाचे प्रस्थान ठेवावे लागेल. दुसरा पंधरवडा तर संस्मरणीय प्रगतीचा जाणवेल.

दि. ७ ते ११, १५ ते २३, २७ ते ३० या काली बऱ्याच अपेक्षा सफल व्हाव्यात.

**मीन :** मंगळाचे तुमच्याच राशीतून उच्चाटन झालेले आहे. गेल्या महिन्यातील तुमच्या अनिष्टतेतील सिंहाचा वाटा त्याचाच होता. आता तुम्हाला पुष्कळसे हायसे वाटायला लागेल. अनारोग्य सुधारेल, मानसिक विवंचना दूर होतील, सांपत्तिक चिंता दूर होईल. प्रामुख्याने दुसरा पंधरवडा तर आपल्या अंगीकृत कार्यात घवघवीत यश देणारा जाणवेल.

उद्योगधंद्याचे नवे तंत्र आचरावे लागेल, अनेकांच्या सहकार्याने तुमचे यश दुणावेल, हुकलेल्या संधी पुन्हा लाभण्याची लक्षणे दिसायला लागतील.

साडेसातीच आहे. थोडेफार परिश्रम करावे लागतीलच.

दि. ६ ते ९, ११ ते १७, २१ ते २६ या कालात आपल्या अनेक समस्या सुटाव्यात.

O

परान्नमुक्ती....

१. येत्या दोन वर्षांत आमच्या संस्थेच्या कार्यक्षेत्रात
परकीय अन्नधान्याचा एक कणही आम्ही येऊ देणार नाही.

२. संस्थेच्या कार्यक्षेत्रातील जनतेची अन्नधान्याची गरज
आम्ही परस्परांच्या सहकार्याने पूर्ण करू.

३. सरकारी धान्यवसूल नियमानुसार भरू
ठराव सर्वानुमते संमत ११–३–६८

कुंदेवाडी, रौळस, दावचवाडी, लोणवाडी, कुंभारी
कारसुळ, देवपूर, पंचकेश्वर, नांदुर्डी, रानवड, नांदूरखुर्द
परान्नमुक्त अकरा गावे
कवी कुसुमाग्रज निफाड तालुक्यातील शिरवाड गावचे.
निफाड तालुक्यात हे काहीतरी घडते आहे हे कळल्यावर
मुद्दाम रात्रीच्या सभेसाठी उपस्थित राहिले,
सभेचे अध्यक्षस्थानही त्यांनी स्वीकारले
'मी निफाड तालुक्याचा आहे, याचा यापूर्वी मला
इतका कधीही अभिमान वाटला नव्हता.' –कुसुमाग्रज
नासिकचे नामवंत काँग्रेस कार्यकर्ते – दादासाहेब बीडकर
नासिक जिल्ह्याचे एक शक्तिस्थान–श्री. काकासाहेब वाघ
विश्व हिंदू परिषदेचे श्री. दादासाहेब आपटे
रा. स्व. संघाचे श्री. मोरोपंत पिंगळे
केवढी जबरदस्त ताकदीची माणसे !
सारी या सभेसाठी उपस्थित होती
या साऱ्यांनी आपल्या शक्ती एकत्रित केल्या तर
अकरा गावेच काय
अकरा जिल्हे, अकरा प्रांतही
सारा भारतवर्षसुद्धा
परान्नमुक्त होऊ शकेल
आमचा एक कलंक तरी धुतला जाईल
पण यासाठी किमान दोन वर्षे तरी

बंधुत्वाचा मंत्र....

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**